
# संयुक्त महाराष्ट्र राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 9932



लेखक - बा. न. राजहंस

पुरस्कार - एस. एम. जोशी

RFFBK-0009753

प्रजा सोशलिस्ट प्रक

# संयुक्त महाराष्ट्र, राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 23333 वि: [illegible]
क्रमांक ... नों दि: [illegible]

दा. क्र. 9753

लेखक

बा. न. राजहंस

REFBK-0009753

प्र जा – सो श लि स्ट प्र का श न

किंमत ५० नये पैसे

मुखपृष्ठ : साथी व्ही. एन्. ओके

प्रकाशक : मधु दंडवते, चिटणीस, प्रजा सोशलिस्ट पार्टी [ महाराष्ट्र ]
२५ भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई २
मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी गिरगांव, मुंबई ४

# पुरस्कार

क्रमांक 23333 दि:
क्रमांक 7932 नों: दि:

माझे सहकारी आणि मित्र श्री. ना. न. राजहंस यांनीं ही पुस्तिका लिहून एक फार महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. भाषावार राज्यरचना हा विषय आतां सर्वांच्या चांगलाच परिचयाचा झालेला आहे. परंतु तो अधिक परिचयाचा म्हणूनच जणूं त्याबद्दल अनेक गैरसमज होत आहेत आणि निर्माण केले जात आहेत. या विषयासंबंधीं प्रासंगिक स्वरूपाचीं भाषणें व लेख पुष्कळच प्रसिद्ध झालेले आहेत. तथापि एकसंध असें लेखन पुरेशा प्रमाणांत उपलब्ध नाहीं. त्यामुळें जसजसा काळ लोटतो तसतसे, भाषिक प्रांतरचनेच्या विरोधकांकडून या विषयाला फाटे फोडण्याचे प्रयत्नालाहि कांहीं प्रमाणांत यश मिळतें. या प्रश्नाची कड लवकर लागेल अशी आज तरी परिस्थिति दिसत नाहीं. बराच दीर्घ स्वरूपाचा लढा जर द्यावा लागणार असेल तर आपल्या मागणीची तात्त्विक आणि व्यावहारीक बाजू जनतेच्या पुढें सुस्पष्टरीत्या मांडली जाणें अत्यंत आवश्यक आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या अथवा महागुजराथच्या मागणीसंबंधीं गैरसमज अन्य प्रांतांत असणें स्वाभाविक आहे; कारण राज्यकर्त्यांनीं आणि त्यांच्या हुकमतीखालीं चालणाऱ्या बहुसंख्य वृत्तपत्रांनीं अपप्रचाराचा धोशा चालूच ठेवला आहे. परंतु आश्चर्य असें कीं मराठी भाषिकांतहि अद्याप या प्रश्नाचें पुरेसे आकलन झालेलें नाहीं. जे लोक आज विरुद्ध भूमिका घेऊन उभे आहेत तेच एकेकाळीं या आंदोलनाचे प्रवर्तक होते या गोष्टीचेंहि कित्येकांना सोइस्कर विस्मरण झालेलें आहे. इतकेंच काय, पण आंदोलनाचे मूळ प्रवर्तकच आतां भाषिक प्रांतांची मागणी करणें म्हणजे कांहीं तरी राष्ट्रविघातक कर्म करण्यासारखें आहे असें भासवीत आहेत. ज्यांनीं एके वेळीं द्विभाषिक राज्य म्हणजे देशी वसाहतवाद असें सांगितलें तेच आमचे कॉंग्रेसचे पुढारी संयुक्त महाराष्ट्र समितीची तुलना दक्षिणेंतील द्राविड काळगमबरोबर आणि शेख अब्दुल्लांच्या भारत विरोधी चळवळीबरोबर करूं लागावेत हा केवढा दैवदुर्विलास !

अशा परिस्थितींत श्री. राजहंस यांच्या या पुस्तिकेचें प्रकाशन होत आहे ही एक समाधानाची गोष्ट म्हटली पाहिजे. या पुस्तिकेंत भाषिक प्रांतरचनेचा तात्त्विक दृष्ट्या उहापोह करण्यांत आला आहे. भाषिक प्रांताची मागणी करणें म्हणजे कांहीं तरी खंत बाळगण्यासारखें आहे असें मानण्याची मुळींच आवश्यकता

नाहीं. उलट राष्ट्राच्या ऐक्यासाठीं भाषिक प्रांतांची किती आवश्यकता आहे हें या पुस्तिकेंत अत्यंत स्पष्टपणें आणि मार्मिक रीत्या दाखविण्यांत आलेलें आहे. राष्ट्राचें ऐक्य केवळ शस्त्रानें किंवा दिल्लीहून काढलेल्या फर्मानांच्या सहाय्यानें कधींच प्रस्थापित झालेलें नाहीं किंवा होणारहि नाहीं. राष्ट्रीय ऐक्याची भावना ही परस्परांच्या भावनात्मक एकात्मतेंतूनच निर्माण झाली पाहिजे, व ती तशी निर्माण होईल तेव्हांच राष्ट्राची इमारत खंबीर ऐक्याच्या पायावर उभी राहील.

ब्रिटिश अमदानीमध्यें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या झगड्याचे वेळीं ही भावनात्मक एकता आपण पुष्कळच दृढ केली होती. भाषा ही एक ऐक्यप्रेरक शक्ति आहे याची जाणीव आमच्या राष्ट्रीय नेत्यांना होती व म्हणूनच त्यांनीं स्वातंत्र्याची चळवळ प्रादेशिक पातळीवर त्या त्या भाषांतून आणि अखिल भारतीय पातळीवर हिंदी भाषेच्या द्वारा प्रामुख्यानें चालवली. मानवाचा विकास निरनिराळ्या साधनांनीं होता असतो. अशा साधनांत भाषेला पहिल्या दर्जाचें स्थान दिलें पाहिजे. एकाद्या लोकसमाजाची भाषा अत्यंत मागासलेली आहे आणि त्या समाजाचे सांस्कृतिक जीवन फार पुढारलेलें आहे असें कोठेंच आढळून येत नाहीं. भाषेच्या द्वारांच विकास आणि संस्कृति प्रगल्भ होते. संस्कृति आणि विकास साधण्यासाठीं जे भागीरथ प्रयत्न सर्वांच्या द्वारां होत राहतील त्यांतूनच भारतीय ऐक्य दृढ होत जाईल. हे भगीरथ प्रयत्न जनतेमार्फतच यशस्वी होऊं शकतील. सामूहिक पुरुषार्थ म्हणूनच हा उपक्रम हातीं घेतला पाहिजे आणि सामुहिक पुरुषार्थ समूहभाषेच्या द्वारांच करणें सुलभ आणि शक्य होईल. भाषावार प्रांतरचनेची जनतेची आकांक्षा या भावनेंतूनच प्रेरित झालेली आहे. या आकांक्षेची कुचेष्टा करण्यानेंच उलट राष्ट्राच्या ऐक्याला बाधा निर्माण होईल.

अन्य भाषिकांना भाषावार राज्यें मिळालीं. परंतु महाराष्ट्र आणि गुजराथ यांच्या-पुरताच अपवाद कां केला? कित्येकांना असें वाटतें कीं हा अपवाद नसून प्रगतीच्या मार्गावरील पुढचें पाऊल आहे. परंतु हा युक्तिवाद फोल आहे. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मुंबई शहरामुळें अवघड झाला ही गोष्ट सर्व जगाला माहीत आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी प्रथमतः ज्यांनीं हिरीरीनें केली त्यांना पूर्वीच्या त्रिभाषिकांत आर्थिक दृष्ट्या अतिशय कटू अनुभव आला. तो तसा आला नसता तर कदाचित् हा प्रश्न इतका तीव्रहि झाला नसता. संयुक्त महाराष्ट्राची मागणी केवळ भाषेपुरती मर्यादित नाहीं. भाषिक राज्याचें स्वरूप जरी या मागणीला आलें असलें तरी त्या मागणीचा मुख्य आशय आर्थिक आहे. गेल्या दहा वर्षांत गरीब जनतेचें आर्थिक जीवन सुधारण्यासाठीं ज्या विकास योजना द्विभाषिक राज्यांत झाल्या त्या सामाजिक

न्यायाच्या दृष्टीनें आक्षेपार्ह होत्या. पैशाची वांटणी किमान पक्षी लोकसंख्येच्या समप्रमाणांत व्हावयास पाहिजे होती; परंतु वस्तुस्थिति याहून अगदींच भिन्न आहे. ६०% लोकसंख्या असलेल्या विभागांत ३०% खर्च आणि ३०% लोकसंख्येच्या विभागांत ६०% खर्च असें व्यस्त प्रमाण पहावयास मिळतें. समाजवादी मूल्यांच्या दृष्टीनें हा व्यवहार अनिष्ट आहे. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राची मागणी आतांपर्यंत डावलण्यांत आली. मुंबई शहराचे अलग राज्य करण्यांतहि हाच हेतू असला पाहिजे. मुंबई शहर केंद्रशासित ठेवण्याची जी कल्पना पुढें मांडण्यांत आली त्यांतील रहस्यहि हेंच असलें पाहिजे. मुंबई शहरांतील उत्पन्न महाराष्ट्राच्या वांट्याला येऊं नये यासाठींच तो पर्याय सुचविण्यांत आलेला असावा. असें करीत असतांना आपण समाजवादांतील मूलभूत सिद्धांतांनाच हरताळ फासीत आहोंत याचा विसर राज्यकर्त्यांना पडला होता असें म्हणणें प्राप्त आहे. कदाचित त्यांचा तो प्रयत्न बुद्धिपुरस्सरहि असण्याचा संभव आहे. देशाची उभारणी भांडवलदारांच्या मदतीशिवाय होऊंच शकत नाहीं अशी जर त्यांची धारणा असेल तर त्यांनीं बड्या भांडवलदारांचे लाड पुरवावे यांत आश्चर्य कोणते? मात्र यामुळें लोकशाहीचीं आणि समाजवादाचीं तत्त्वें पायदळीं तुडवलीं जातात हें विसरून चालणार नाहीं. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही संकुचित तर नाहींच, उलट ज्या नवसमाजाची चित्रें आपण रेखाटीत आहोंत त्या नवसमाजाला पायाभूत अशीच आहे. यांतून नवसमाजनिर्मितीसाठीं जें जनांदोलन सुरू झालें आहे त्याची उपेक्षा केल्यास समाजवाद आणि लोकशाही या ध्येयांचीच उपेक्षा केल्यासारखें होईल. आतांपर्यंत आपण समाजवादी आंदोलनाच्या भरपूर घोषणा केल्या आहेत. लहान लहान संप व सत्याग्रहलढेहि समाजवादाच्या नांवानें चालविण्यांत आले. परंतु ते फुटकळ आणि विखुरलेलेच प्रयत्न होते. एकंदर समाजमानसाची पकड त्यांपैकीं कोणी घेतलेली नसल्यामुळें सामुहिक पुरुषार्थाची ईर्षा ज्यामध्यें प्रतीत होत आहे आणि जें आंदोलन या लहानशा पुस्तिकेंत दाखविल्याप्रमाणें लोकशाही आणि समाजवाद यांवर आधारीत आहे, असें हें भाषिक आंदोलन भारतामधील समाजवादी आंदोलनाची शक्ति वाढविणारेंच आहे. लोकशाही समाजवादाच्या सर्व उपासकांनीं या पुस्तिकेचें परिशीलन काळजीपूर्वक करावें असें मी सुचवितों.

पुणें, ३।२।१९५८ एस्. एम्. जोशी

# संयुक्त महाराष्ट्र, राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही

२५५३

### *प्रास्ताविक*

राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नाला गेलीं दोन वर्षें भारताच्या राजकारणामध्यें फार महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. विशेषतः गुजराथ आणि महाराष्ट्र या दोन्ही प्रदेशांची भाषिक राज्यांची मागणी पुरी न झाल्यामुळें पश्चिम भारतामध्यें या प्रश्नाला विशेषच उग्रस्वरूप आलें. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रांतांची भाषिक तत्त्वावर पुनर्रचना होईल अशी सर्वांची रास्त अपेक्षा होती. पण ती लवकर पुरी न झाल्यामुळें आंध्रमध्यें प्रथम आंदोलन सुरू झालें. तेथील एक पुढारी पोट्टी श्रीरामलु यांनीं आंध्र राज्याची मागणी त्वरित मान्य व्हावी म्हणून प्राणांतिक उपोषण केलें व त्यांत त्यांचें प्राणोत्क्रमण झाल्यामुळें तेलगू जनता खवळली. तेलगू जनतेनें मोठमोठीं निदर्शनें केलीं. परिणामीं सरकारनें आंध्र प्रांत स्वतंत्र करण्याची मागणी मान्य केली. अर्थात् ही मागणी कांहीं आंध्रापुरती मर्यादित नव्हती. कन्नड, मराठी, मल्याळम् वगैरे सर्वच भाषिकांना भारतीय संघराज्यामध्यें आपापलीं स्वायत्त अशीं घटक राज्यें पाहिजे होतीं. म्हणून राज्यपुनर्रचनेच्या या प्रश्नावर सर्व बाजूंनीं विचार करून सरकारला शिफारशी करण्यासाठीं न्यायमूर्ति फाजल अल्ली यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशननें ऑक्टोबर १९५५ मध्यें आपला अहवाल सादर केला. त्यांत हैद्राबाद, मध्यप्रदेश व मद्रास हीं बहुभाषिक राज्यें मोडून तेथें व इतर अनेक ठिकाणीं एक भाषिक राज्यें निर्माण करण्याची शिफारस केली होती. मात्र महाराष्ट्र व गुजराथ यांच्याबाबतींत कमिशननें एक भाषिक राज्याचें तत्त्व लागू न करतां द्विभाषिक राज्य सुचविलें होतें. तेव्हांपासून सरकारनें महाराष्ट्र व गुजराथ यांच्या पुनर्रचनेचे अनेक पर्याय सुचविले. पण प्रत्येक खेपेस या दोनहि भाषिक गटांच्या भाषिक राज्याची मागणी डावलण्यांत आली. त्यामुळें हे दोन्ही भाषिक गट असंतुष्ट राहिले असून आपापल्या भाषिक राज्याची मागणी पदरांत पाडून घेण्यासाठीं या प्रदेशांत फार मोठें आंदोलन चालू आहे. आंदोलनानें लक्षावधि लोकांचीं मनें भारावलीं गेलीं आहेत. सरकारनें आपली सर्व शक्ति पणाला लावून हें आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकारला त्यांत यश आलें नाहीं. या आंदोलनाचा एक भाग म्हणून महाराष्ट्र व गुजराथमध्यें या प्रश्नावर निवडणुका लढविल्या गेल्या व त्यांत कॉंग्रेसला फार मोठें अपयश पदरीं घ्यावें लागलें. निवडणुकानंतर कॉंग्रेसनें असा

प्रचार सुरू केला कीं, संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनीं जनतेच्या भावना चिथावून मतें मिळविलीं. निवडणुकांचा धुरळा खालीं बसल्यानंतर, लोक द्विभाषिक मान्य करतील अशी कॉंग्रेसची अपेक्षा होती. परंतु सार्वत्रिक निवडणुकानंतर महाराष्ट्रामध्यें ज्या स्थानिक स्वराज्य-संस्थांच्या निवडणुका झाल्या त्यांतहि कॉंग्रेसला संयुक्त महाराष्ट्र समितीसमोर हार खावी लागली. गुजराथमध्येंदेखील ८ ऑगस्ट १९५७ रोजीं महागुजराथ परिषदेनें हरताळासाठीं जनतेला जें आवाहन केलें त्याला अपेक्षेपेक्षां अधिक साथ मिळाली. यावरून भाषिक राज्यांची मागणी हा कांहीं तात्पुरत्या भावनांचा उद्रेक नाहीं तर, तो मराठी व गुजराथी जनमानसाचा स्थायी भाव झाला आहे. कारण भाषिक प्रदेशांची मागणी ही जनतेच्या लोकशाही हक्कांशीं निगडित आहे. भारतामध्यें लोकशाही अधिक खोलवर रुजवावयाची असेल तर घटकराज्यांची पुनर्रचना भाषावार तत्त्वावर करणें जरूर आहे. परंतु दुर्दैवानें पंडित नेहरु व कॉंग्रेसचे श्रेष्ठी यांना मान्य नसलेल्या कोणत्याहि मागणीला व त्यासाठीं चाललेल्या आंदोलनाला संकुचित, प्रतिगामी अशा प्रकारचीं नांवें ठेवायची प्रथा पं. नेहरु व त्यांच्या चहात्यांनीं पाडलेली आहे. त्याला अनुसरून भाषिक प्रांतांच्या मागणीची उपेक्षा करण्याचा, ही मागणी संकुचित प्रांतीयवादी स्वरूपाची आहे असें भासविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. आणि याच भूमिकेमधून त्यांनीं गेलीं दोन वर्षं चाललेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या व महागुजरातच्या आंदोलनाला विरोध चालविला आहे. संयुक्त महाराष्ट्राची किंवा महागुजराथची मागणी करणाऱ्यांनीं अनेक वेळां असें निःसंदिग्धपणें जाहीर केलें आहे कीं, आम्हांला भारतीय संघराज्याचे सनदशीर घटक या नात्यानेंच आमचे भाषिक प्रदेश पाहिजेत. असें असूनहि ही मागणी व त्यासाठीं चाललेलें आंदोलन हें फुटीरपणाचें व राष्ट्राच्या ऐक्याला धोका देणारें आहे अशी टीका पं. नेहरूंनीं वारंवार केली आहे. पंडित नेहरूंसारख्या लोकशाही मानणाऱ्या पुढाऱ्यांनीं अशीं विधानें करावींत ही खरोखरच दुःखद गोष्ट आहे. वस्तुतः भाषिक प्रदेशांची मागणी ही इतकी स्वाभाविक आहे कीं, तिची कारणमीमांसा करण्याची जरूरच पडूं नये. परंतु पंडित नेहरूंसारखे मान्यवर नेते जेव्हां अशीं गैरसमज पसरविणारीं विधानें करतात तेव्हां संयुक्त महाराष्ट्र किंवा महागुजराथ अशासारख्या भाषिक प्रदेशांची मागणी करणाऱ्या लोकांची भूमिका काय आहे तें स्पष्ट करणें जरूर होऊन बसतें.

## संघराज्याचे घटक एकजिनसी पाहिजेत

या प्रश्नाची कारणमीमांसा करण्यापूर्वी भाषिक राज्यांच्या मागणीची पार्श्वभूमि

प्रथम समजावून घेतली पाहिजे. भारतीय स्वातंत्र्यासाठीं इंग्रजी साम्राज्यसत्ते-बरोबर जें आंदोलन चालू होतें त्या काळांत देखील स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची पुनर्रचना कशी करावयाची याचा विचार चालू होता. भारत देश हा विशाल असल्यामुळें येथील संस्कृति ही स्थूलमानानें एक असली तरी देशांत राहणाऱ्या विविध लोकगटांच्या परंपरा भिन्न आहेत व हा देश विविधतेनें भरलेला आहे म्हणून या ठिकाणीं लोकशाही पद्धतीनें स्वराज्य स्थापन करावयाचें असेल तर एकमुखी unitary सत्ता स्थापन करून चालणार नाहीं. येथें संघ-राज्यात्मक शासनसंस्था निर्माण केली पाहिजे ही गोष्ट बहुतेक सर्वांनीं मान्य केली आहे. भारतामध्यें लोकशाही यशस्वी करण्यासाठीं भारताची घटना संघराज्यात्मक असली पाहिजे ही गोष्ट एकदां मान्य केल्यावर त्या संघराज्याचे घटक कसे असावेत, हा प्रश्न उपस्थित होतो. अर्थात हे घटक लोकशाहीला जास्तींतजास्त अनुकूल असले पाहिजेत. संघराज्य जर यशस्वी व बळकट करावयाचें असेल, संघराज्याचें ऐक्य टिकाऊ करावयाचें असेल तर संघराज्याचे घटक हे एकात्म व एकजिनसी असले पाहिजेत. या घटकांचें स्वरूप असें असलें पाहिजे कीं त्यामुळें त्या प्रदेशांतील जनतेला त्या घटकराज्याबद्दल आपलेपणा व निष्ठा वाटेल; तेथें जनतेचा राज्यकारभाराशीं अधिक घनिष्ट संबंध निर्माण होईल व त्या प्रदेशांतील जनतेचा सर्वांगीण विकास करणें सोईचें पडेल. राज्यकारभा-राचा व जनतेचा अधिक घनिष्ट संबंध येण्यासाठीं, घटकराज्यांच्या क्षेत्रामधील लोकसमाजांत एकजिनसीपणा असावा व लोकांना राज्याबद्दल निष्ठा व आपुलकी वाटावी यासाठीं प्रत्येक घटक राज्यांतील लोकांना एकत्र आणणारी, त्यांना एका सूत्रांत गोवणारी कांहीं तरी ऐक्यप्रेरक भावना असली पाहिजे. तरच घटकराज्यें लोकशाहीच्या दृष्टीनें यशस्वी होऊं शकतील.

### *भाषा हेंच एकात्मतेचें आधारतत्त्व*

भारतीय संघराज्याचीं घटकराज्यें हीं एकात्म व एकजिनसी बनवावयाचीं असतील तर तीं कोणत्या आधारावर बनवितां येतील? भारतामध्यें गेलीं पन्नास वर्षें या गोष्टीचा विचार चालू आहे व एकात्म अशीं वेगवेगळीं घटकराज्यें बनविण्यासाठीं प्रादेशिक भाषाच आधारभूत धरावीं लागेल ही गोष्ट कोणालाहि तत्त्वतः अमान्य करतां येणार नाहीं. भारतामध्यें जरी नाना प्रकारची विविधता असली तरी हे विविध स्वरूपाचे भाषिक गट आपापल्या परीनें एक जिनसी स्वरूपाचे आहेत. कारण एक भाषा बोलणाऱ्या लोकांचे आचार, रीतीरिवाज,

पेहराव, सामाजिक प्रश्न हे बऱ्याच प्रमाणांत एकाच स्वरूपाचे असतात. त्यामुळें भाषा हें सामाजिक एकात्मतेचें प्रमुख व महत्त्वाचें लक्षण आहे. भारतीय समाजामध्यें जातीव्यवस्था हजारों वर्षें रूढ आहे, परंतु विभिन्न भाषा बोलणाऱ्या एकाच जातीच्या लोकांमध्यें पुष्कळ फरक असल्याचें आपणांस दिसून येईल. उदाहरणार्थ, महाराष्ट्रांतील ब्राह्मणांची राहाणी व त्यांचें मराठी समाजांतील स्थान यांत व उत्तर प्रदेशीय किंवा बिहारी ब्राह्मणांची राहणी व त्यांचें तेथील समाजांतील स्थान यांत फारसें साम्य नाहीं. यामुळें जातीपेक्षां देखील भाषा ही सामाजिक एकतेच्या दृष्टीनें अधिक महत्त्वपूर्ण आहे असें दिसून येतें. म्हणूनच एकभाषी लोकांचें एक घटकराज्य असावें ही मागणी स्वाभाविक ठरते. ही मागणी केवळ त्या त्या भाषिक गटापुरतीच राहात नाहीं तर सर्वच भाषिक गटांचा तिला पाठिंबा मिळतो. याच कारणास्तव लॉर्ड कर्झननें केलेल्या बंगालच्या फाळणीला नुसता बंगाली लोकांचाच नव्हे तर सर्व भारतीयांचा विरोध झाला व तेव्हांपासून भाषिक राज्यांची मागणी ही आपल्या राष्ट्रीय चळवळीमध्यें अंतर्भूत झाली. लोकमान्य टिळकांनीं बंगालच्या फाळणीविरुद्ध देशभर लोकमत तयार केलें. बंगालच्या फाळणीच्या प्रश्नाला आपल्या राष्ट्रीय चळवळीमध्यें महत्त्वाचें जें स्थान प्राप्त झालें होतें तें लक्षांत घेतां भाषावार राज्यरचनेच्या मागणीवर फुटीरपणाचा किंवा अराष्ट्रीयतेचा शिक्का मारणारे लोक इतिहासाकडे पाठ फिरवीत आहेत, असेंच म्हणावें लागेल.

## *भाषावार प्रांतरचनेचें सर्वमान्य तत्त्व*

गेल्या पन्नास वर्षांमध्यें भारताला स्वतंत्र व लोकशाही घटना देण्याचे जे जे प्रयत्न झाले त्या प्रत्येक खेपेस भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य केलें गेलें आहे. पहिल्या महायुद्धानंतर भारताला घटनात्मक सुधारणा देण्यासाठीं नेमलेल्या मॉंटेग्यू–चेंम्सफर्ड कमिशननें या प्रश्नाची चर्चा केली आहे. महात्माजींनीं स्वराज्याच्या आंदोलनाचें नेतृत्व हातीं घेतल्यानंतर १९२१ सालीं राष्ट्रीय कॉंग्रेसनें भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाचा पुरस्कार केला व कॉंग्रेसची पुनर्घटना त्याप्रमाणें करण्याचा प्रयत्न केला. १९२८ सालीं भारतामध्यें आलेल्या सायमन कमिशननेंदेखील आपल्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं, "जेथें एक भाषा बोलणारांचा प्रदेश एक घटकराज्य होण्यासारखी परिस्थिति असेल तेथें त्या प्रदेशांतील लोकांच्या व्यक्तित्वाचा पूर्ण विकास करण्याच्या दृष्टीनें समान भाषा हें एक सामर्थ्यवान व स्वाभाविक असें साधन ठरेल." त्याचप्रमाणें त्याच वर्षी

स्वराज्याच्या घटनेचा खर्डा तयार करण्यासाठीं पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या समितीनेंदेखील भाषावार राज्यरचनेचें तत्त्व मान्य केलें आहे. नेहरू कमिटीचें यासंबंधींचें मत स्पष्ट करण्यासाठीं त्यांच्या अहवाला-मधील कांहीं उतारे येथें उद्धृत करणें युक्त ठरेल. ते म्हणतात :

“ जरी आम्ही हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे असें म्हणतो तरी तो एक मोठा खंडप्राय देश आहे ही गोष्ट आम्हांस नाकारतां येणार नाहीं. त्यांतील निर-निराळ्या प्रांतांची वेगवेगळीं स्वतंत्र भाषा आहे व त्यांची संस्कृतीहि भिन्न आहे. चालीरीति व रिवाज यामध्येंहि पुष्कळ फरक आहे आणि स्थूल अर्थानें हिंदुस्थान हें भौगोलिक व सांस्कृतिक दृष्ट्या एक राष्ट्र मानलें तरी त्यामध्यें बरीच विविधता असल्यामुळें विविधतेंत एकता पाहाण्याचें उद्दिष्ट आम्ही नेहमी बाळगलें आहे. खंडप्राय विस्तार असलेल्या या देशाचें सरकार अवश्येंकरून संघराज्याच्या स्वरूपाचें असलें पाहिजे आणि या संघराज्यांत समाविष्ट झालेल्या निरनिराळ्या एकजिनसी घटक राज्यांना अंतर्गत कारभारांत स्वायत्तता असली पाहिजे...विद्यमान प्रांतपुनर्रचना कोणत्याच शास्त्रशुद्ध पायावर आधारलेली नाहीं हें सर्वांस माहीत आहेच. ब्रिटिशांची सत्ता भारतांत जसजशी वाढत गेली व त्यावेळच्या परिस्थितींत त्यांना सोईस्कर पडेल तसे प्रांत बनविण्यांत आले. एकंदरींत पाहतां कोणत्याहि भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक अगर भाषिक तत्त्वाशीं अगर कारणांशीं त्यांचा कांहींहि संबंध नाहीं. एवढेंच नव्हे तर केवळ राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनेंहि ही प्रांतरचना यशस्वी अगर कार्यक्षम ठरलेली नाहीं. यावरून प्रांतांची फेररचना करणें जरूर आहे ही गोष्ट उघड आहे..........मग कोणत्या तत्त्वावर ही फेरविभागणी व्हावी? थोडी भौगोलिक पायावर, थोडी आर्थिक व जमाखर्चाच्या बाबींचा विचार करून; **पण मुख्यतः त्या प्रदेशांतील लोकांच्या इच्छा व भाषिक एकता हाच प्रांतपुनर्रचनेचा आधार असला पाहिजे...त्या त्या प्रदेशांतील बहुसंख्य लोकांच्या मागणीनुसार प्रांतांची फेररचना करण्यांत यावी.** अर्थात् ती करतांना सरकारी जमाखर्चाच्या बाबींचा व राज्यकारभाराच्या सोईचाहि विचार केला जावा. ”

## *संस्थानांचें विलिनीकरण नि भाषा*

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निरनिराळी देशी संस्थानें भारतांत विलीन करतांनादेखील प्रांतांच्या भाषावार पुनर्रचनेच्या तत्त्वाकडे लक्ष पुरविलें गेलें होतें व संस्थानी मुलुखांत जी भाषा बोलली जात [illegible]

अनुक्रमांक: 23333 दि: [illegible]

करण्याचें तत्त्व सर्वसामान्यपणें अवलंबिण्यांत आलें होतें. इतकेंच काय पण, पूर्वीच्या छोट्या छोट्या संस्थानांचें एकत्रिकरण करून त्यांचें एक राज्य बनवितांना घटकाची भाषिक एकात्मता साधेल या गोष्टीकडे लक्ष पुरविलें होतें. सौराष्ट्राचें एक राज्य बनवितांना किंवा गुजराथ, महाराष्ट्र, ओरिसा, कर्नाटक या मधील देशी संस्थानांचें विलिनीकरण करतांना हेंच धोरण स्वीकारलें गेलें होतें. इतकेंच काय सौराष्ट्राचें घटकराज्य बनवितांना जो करार झाला त्यामध्यें 'या करारांतील कोणतीहि बाब काठेवाड व इतर गुजराथी भाषिक प्रदेश यांचा एक संघ निर्माण करण्याच्या-बाबत काठेवाड सरकारला प्रत्यवाय करूं शकणार नाहीं' असें कलम मुद्दाम घालण्यांत आलें होतें. यावरून भारतामधील प्रांतपुनर्रचनेच्या इतिहासाचा ओघ भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाला अनुकूल आहे हें दिसून येईल.

## *संघराज्याचा एकजिनसीपणा भाषेवर अवलंबून*

भारतीय घटना संघराज्यात्मक असावी व या संघराज्याचे घटक एकजिनसी असावेत या गोष्टीबद्दल कोणाचें दुमत होणार नाहीं. पण हा एकजिनसीपणा भाषेवर कसा काय अवलंबून आहे, असा प्रश्न कांहीं लोक उपस्थित करतात. भाषेचा व मनुष्याचा संबंध मातृसंबंधाइतका अविभाज्य आहे. मनुष्याला आई जन्म देते, व एका आईचीं लेकरें एक कुटुंब म्हणून राहातात. त्यांच्यामध्यें एकमेकांना जोडणारा रक्ताचा दुवा असतो. आई मनुष्याला जन्म देते हें खरें. पण मनुष्याचें मनुष्यत्व कशांत आहे? इतर प्राण्यांत आणि माणसांत फरक हाच कीं, माणूस विचार करतो, चांगल्यावाईटाचा त्याला विवेक असतो. त्याच्या मनावर बऱ्या-वाईट विचारांचे संस्कार होतात. मनुष्याला हे संस्कार किंवा विचार भाषेच्या द्वारें मिळतात. भाषा माणसाला संस्कृति देणारी आहे. व एक भाषा बोलणाऱ्या लोकांचे संस्कार बऱ्याच प्रमाणांत एकाच प्रकारचे असतात. आम्ही महाराष्ट्रीय लोक, मराठी माउलीचीं लेकरें आहोंत, असें आम्ही सांगतोंच ना? ज्ञानेश्वर, शिवाजीमहाराज, टिळक, फुले, आगरकर, डॉ. आंबेडकर वगैरे थोर विचारवंतांची परंपरा व त्यांच्या शिकवणुकींचे संस्कार आमच्यावर झालेले आहेत. मराठी भाषा बोलणारांचें हें एक विशाल कुटुंब बनलें आहे व त्याचीं कांहीं वैशिष्टयें आहेत. आपल्या देशांत निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक आहेत. हे भाषिक गट म्हणजे जणूं वेगवेगळीं अशीं विशाल कुटुंबें आहेत. आपल्या देशांत हे विविध असे प्रादेशिक लोकसमाज आहेत आणि या प्रत्येक लोकसमाजाच्या इतरांपेक्षां वेगळ्या अशा ऐतिहासिक, साहित्यिक व सांस्कृतिक परंपरा आहेत. आपल्या

देशांत जातिव्यवस्था असल्यामुळें संपूर्णपणें एकजिनसी असा कोणताच लोकसमाज अस्तित्वांत नाहीं. आपल्या देशांतील समाज हा जातीव्यवस्थेनें भंगलेला आहे. परंतु एक भाषा बोलणाऱ्या लोकगटामध्यें विविध जातींचे परस्परसंबंध एकाच स्वरूपाचें असल्याचें दिसून येतें. व त्या दृष्टीनें एकभाषिक समाजामध्यें एक-जिनसीपणा आहे. उदाहरणार्थ, मराठी भाषिक मुलखामध्यें ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांचे जसे संबंध आहेत तसे ते गुजराथमध्यें आढळणार नाहींत. किंवा लिंगायत व लिंगायतेतर हा वाद कानडी भाषिक प्रदेशांतच दिसून येईल इतर भाषिक प्रदेशांत तो आढळणार नाहीं. अस्पृश्य समाजाचा प्रश्न सर्व देशभर असला तरी महाराष्ट्रामध्यें बहुसंख्य अस्पृश्यांनीं बौद्ध धर्म स्वीकारण्याचें ठरविलें आहे, तसें इतर भाषिक अस्पृश्यांच्या बाबतींत आपणाला आढळणार नाहीं. त्यामुळें महाराष्ट्रा-मध्यें नवबौद्धांच्या सवलती, खेड्यापाड्यांत त्यांना त्यामुळें होणारा त्रास वगैरे जे प्रश्न उपस्थित झालेले आहेत, किंवा त्यांचें स्वरूप जेवढें तीव्र आहे तेवढें तें गुजराथमध्यें नाहीं. त्यामुळें द्विभाषिक राज्याच्या विधिमंडळांतील गुजराथी आमदारांना किंवा मंत्रिमंडळांतील गुजराथी मंत्र्यांना या प्रश्नाचें यथायोग्य आकलनहि होणार नाहीं. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाच्या दृष्टीनें हा प्रश्न सोडविणें किती निकडीचें आहे हेंहि त्यांना समजणार नाहीं.

### *महाराष्ट्राची सामाजिक समस्या*

महाराष्ट्रामध्यें राजकीय जागृतीबरोबर सामाजिक जागृतिदेखील झाली. येथें टिळकाप्रमाणें फुले व आगरकरहि निर्माण झाले. फुल्यांनीं सामाजिक विषमतेवर व जातीयतेवर हल्ला चढविला. पण कालांतरानें या चळवळीला विकृत स्वरूप आलें. त्यामुळें महाराष्ट्रांतील सामाजिक समस्येची तीव्रता व स्वरूप अन्यभाषिक प्रांतांपेक्षां वेगळें झालें आहे. हिंदी भाषिक प्रदेशामध्यें अद्याप सामाजिक अन्यायाची पुरेशी जाणीव नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. तेथील लोक अद्यापहि जुन्या सरंजामदारी कल्पनांच्या जोखडाखालीं आहेत. याप्रमाणें एकच भाषा बोलणाऱ्या लोकसमाजाचे सामाजिक प्रश्न व तेथील जातिजातींचे परस्पर संबंध यामध्यें एकप्रकारचा सारखे-पणा दिसून येतो. हा सारखेपणा नुसता जातिबद्ध अशा हिंदुधर्मीयांपुरताच मर्यादित नाहीं तर एक भाषा बोलणाऱ्या हिंदू व हिंदुतर समाजामध्येंहि पुष्कळ सारखेपणा (विशेषतः खेड्यापाड्यामध्यें) दिसून येतो. उदाहरणार्थ, मलबारमधले मुसलमान, हिंदू व ख्रिश्चन यांची रहाणी, भाषा व आहार यांत इतका सारखेपणा आहे कीं, बाहेरून त्याचा धर्म ओळखणें कठिणच. त्याचप्रमाणें कोकणांतल्या

मुसलमानांची रहाणी व पेहराव हिंदू लोकांच्याबरोबर पुष्कळच मिळताजुळता दिसेल. भारतामध्यें आपण आतां धर्मातीत लोकशाही कायम करूं इच्छितों. त्यासाठीं धार्मिक भावनेपेक्षां व्यापक अशा दुसऱ्या कोणत्या भावनेवर लोकांची श्रद्धा आहे, तें पाहिलें पाहिजे. राष्ट्रीयत्व ही एक अशी भावना आहे खरी, पण त्यापेक्षांहि लोकांना रोजच्या जीवनांत जवळची वाटणारी अशी आणखी एक श्रद्धा असेल तर तिच्यावर भर दिला पाहिजे. भाषिक श्रद्धा अशा प्रकारची एक प्रभावी श्रद्धा आहे. ती धर्मांचे व जातींचे भेद उल्लंघून जाणारी आहे म्हणून तिच्या आधारावर घटकराज्यें बनविणें राष्ट्रीय ऐक्य आणि धर्मातीत भावनेच्या दृष्टीनें जास्त श्रेयस्कर ठरेल.

### *शासनसंस्थेची जबाबदारी*

घटकराज्यांचें स्वरूप ठरवितांना शासनसंस्थेचें आजच्या समाजांतील स्थान व उद्दिष्ट काय, व तें उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठीं घटकराज्याचें योग्य स्वरूप कोणतें याचाहि थोडा विचार केला पाहिजे. एकोणिसाव्या शतकामध्यें केवळ शांतता व सुव्यवस्था राखणें एवढेंच शासनसंस्थेचें कार्य मानण्यांत येई. परंतु आज शासनसंस्थेच्या कार्याचा व्याप वाढला आहे. शासनसंस्थेला आज देशाच्या सामाजिक उन्नतीचे व आर्थिक विकासाचे प्रश्नहि सोडवावयाचे आहेत. आणि राज्यकारभार खऱ्या अर्थानें जनताभिमुख करावयाचा आहे. ज्या देशाची घटना संघराज्यात्मक असते तेथें विकासकार्य व राज्यकारभार जनताभिमुख बनवून तीं कामें प्रामुख्यानें घटक राज्यांनाच पार पाडावीं लागतात. आणि तीं, कार्यक्षमतेनें आणि लोकांच्या सहकार्यानें पार पाडण्यासाठीं घटकराज्यें एकात्म व एकजिनसी असणें जरूर आहे. त्यासाठीं सामाजिक दृष्ट्या एकजिनसी असलेला भूभाग शक्य तेवढा एकाच घटक राज्यांत समाविष्ट करणें जरूर आहे. या दृष्टीनें घटक राज्य एकभाषिक असणें अधिक श्रेयस्कर ही गोष्ट कोणालाहि नाकारतां येणार नाहीं.

### *सर्वांना समान संधि*

एक भाषा बोलणारे लोक एका घटक राज्यांत असल्यामुळें नुसता राज्यकारभार सोईचा होतो एवढेंच नव्हें तर त्या राज्यांतील जनतेला त्या राज्यकारभाराबद्दल आपुलकी वाटूं लागते. राज्यांतील कायदेकानू व कोर्टकचेऱ्यांतील व्यवहार जर लोकांच्या भाषेंत सुरू झाले तर सामान्य लोकांची अडचण दूर होतेच. पण त्याखेरीज खेड्यांमधील गोरगरिबांच्या हुशार मुलांना राज्यकारभारामध्यें महत्त्वाची

जबाबदारी उचलण्याची संधि मिळते. आज खेड्यांतील शेतकऱ्याचा एकादा मुलगा कितीहि हुशार असला तरी तो फार तर व्ह. फा. होऊन शाळामास्तर नाहीं तर तलाठी होईल. कारण राज्यकारभार परकी भाषेमध्यें चालू असल्यामुळें ज्यांना इंग्रजी ज्ञान प्राप्त करून घेण्याची संधि आहे अशा उच्चवर्गीय लोकांनाच राज्यकारभारांत महत्त्वाचें स्थान प्राप्त होतें. आतां स्वातंत्र्यामध्यें ही मिरासदारी बंद करावयाची असेल तर सर्व ज्ञान प्रादेशिक भाषेमध्यें उपलब्ध करून दिलें पाहिजे. स्वराज्यामध्यें सरकारी नोकरी ही समाजसेवेची संधि आहे व म्हणून सरकारी नोकरीमध्यें योग्य तें स्थान मिळविण्यासाठीं लागणारी पात्रता हस्तगत करण्याची संधि प्रत्येकाला मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. त्याचप्रमाणें राज्यकारभार करणाऱ्यांना जनतेच्या हिताबरोबर समरस होता आलें पाहिजे. राज्यकारभारामध्यें महत्त्वाचें स्थान मिळविण्यासाठीं उच्च शिक्षणाची, निदान विशिष्ट ज्ञान संपादन करण्याची जरूरी असते. हें शिक्षण घेण्याची किंवा ज्ञान संपादण्याची संधि गरीब वर्गातल्या तरुणांनादेखील मिळवून द्यावयाची असेल तर तें शिक्षण मातृभाषेंमधूनच दिलें पाहिजे. पण त्यासाठीं प्रथम आपल्या देशांत ज्या विविध प्रादेशिक भाषा आहेत त्यांचा प्रयत्नपूर्वक विकास केला पाहिजे. हा प्रयत्न योजकतेनें यशस्वी करण्यासाठीं सरकारनेंच त्या कामीं पुढाकार घेतला पाहिजे. उच्च शिक्षणाचें माध्यम हें प्रादेशिक भाषा ठरवून त्या भाषेमध्यें सर्व प्रकारचें शास्त्रीय व अन्य साहित्य प्रकाशित करण्याची व्यवस्था त्या त्या प्रादेशिक सरकारनें केली पाहिजे. पण त्यासाठीं एका राज्यांत एकच भाषा पाहिजे. बहुभाषिक राज्यांत कोणत्याच प्रादेशिक भाषेचा विकास होत नाहीं असा अनुभव आहे. तेथें कोणत्या प्रादेशिक भाषेला किती प्रोत्साहन द्यावें यावरच वाद माजतो. व या वादांतून मार्ग काढण्याच्या भरांत प्रादेशिक भाषांची प्रगतीच खुंटते. जुन्या मुंबई राज्यामध्यें राज्यकारभाराची भाषा हिंदी असावी असें बिल आणलें गेलें होतें. त्याचप्रमाणें त्यावेळच्या शिक्षणमंत्र्यांनीं सरकारी महाविद्यालयांमधून शिक्षणाचें माध्यम हिंदी असावें असा आदेश दिला होता. परंतु हा आदेश लोकविरोधी असल्यामुळें मुंबई राज्यांतील बहुतेक विद्यापीठांनीं तो अमान्य केला. परंतु त्यामुळें बहुभाषिक राज्यांत शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रामध्यें सरकार आणि विद्यापीठें यांच्यामध्येंच मतभेद होता असें दिसून आलें. परिणामीं जनतेच्या शिक्षणाचा खेळखंडोबा होतो आणि प्रादेशिक भाषांची प्रगति कुंठीत होते असें दिसून आलें. या एकंदर अनुभवांचा निष्कर्ष हाच कीं, राज्यांतील सरकारी कामकाजाची भाषा व सर्व शिक्षणाचें माध्यम प्रादेशिक भाषाच असली पाहिजे.

(अगदीं उच्च व खास स्वरूपाचें असें शिक्षणक्षेत्र याबाबतींत अपवादात्मक होऊं शकेल.) सर्व शिक्षणाचें माध्यम प्रादेशिक भाषा केल्यानें अन्य भाषेमधील प्राध्यापकांचा किंवा ज्ञानाचा उपयोग करून घेतां येणार नाहीं असा आक्षेप येण्याचा संभव आहे. पण प्रादेशिक भाषेला शिक्षणाचें माध्यम करावयाचें म्हणजे अन्य भाषांचें शिक्षण बंद करावयाचें असा हेतू नाहीं. किंबहुना प्रत्येक प्रादेशिक भाषेचा विकास करण्यासाठीं अन्य भारतीयच काय परंतु परदेशी भाषांमध्यें देखील उपलब्ध असलेलें ज्ञान व साहित्य त्या प्रादेशिक भाषेमध्यें आणलें पाहिजे. शिक्षणाचें माध्यम मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा केल्यानें गरीब वर्गांतील होतकरू तरुणांना उच्च ज्ञान प्राप्त करून घेणें सोपें जाईल व त्यांना राज्यकारभारांत योग्य तें महत्त्वाचें स्थान मिळवितां येईल. अशा तऱ्हेनें सामान्य व गरीब वर्गांतील लोक राज्यकारभारांत आले म्हणजेच राज्यकारभार जनताभिमुख होईल. अर्थात हें सर्व घडवून आणण्यासाठीं एक भाषिक घटक राज्यांची निर्मिति हाच एकमेव उपाय आहे.

### *बहुभाषिक राज्यांतील अडचणी*

बहुभाषिक राज्यामध्यें अनेक अडचणी निर्माण होतात. भिन्न भाषिक गट त्यांच्या इच्छेविरुद्ध एका राज्यांत समाविष्ट केल्यानें त्या राज्यांत एकात्मता तर निर्माण होत नाहींच, पण परस्परकटुता व संघर्ष वाढण्याचा धोका असतो. हैद्राबाद या बहुभाषिक राज्यामध्यें आपल्याकडे दुर्लक्ष होतें अशी मराठवाड्याची नेहमीं तक्रार असे. मुंबई राज्यामध्यें विकासकार्यासाठीं कोणत्या भागावर किती पैसा खर्च करावा, कोणत्या योजनांना प्राधान्य द्यावें या प्रश्नावर नेहमीं मराठी आणि गुजराथी मंत्र्यांमध्यें मतभेद असत व मंत्रिमंडळामध्यें ज्या मंत्र्याचें वजन अधिक त्या भाषिक प्रदेशाला अधिक सवलती मिळत. या वादामुळेंच कोयना योजना हातीं घेण्याला इतका अवधि लागला. आजदेखील मुळा, कुकडी, गिरणा वगैरे धरण योजना महाराष्ट्रासाठीं मान्य झाल्या असून अद्यापहि त्यांचें काम हातीं घेतलें गेलें नाहीं. काकरापारा धरण योजना गुजराथच्या फायद्यासाठीं महाराष्ट्रांतील चांगली सकस जमीन पायाखालीं बुडवून हातीं घेण्यांत आली आहे असा आक्षेप घेतला जातो. एकभाषिक राज्यांतहि निरनिराळ्या विभागामध्यें विकासाच्या कामीं मतभेद होणार नाहींत असें नाहीं. पण त्या मतभेदांना भाषिक तेढीचें स्वरूप येणार नाहीं.

त्याचप्रमाणें द्विभाषिक राज्यामध्यें एकभाषिक गटाच्या जोरावर दुसऱ्या भाषिक

गटावर राज्य करणें एकाद्या पक्षाला सोपें जातें व हें राज्य टिकविण्यासाठीं गटबाजी व कारवाया यांना ऊत येतो. आजच गुजराथ व विदर्भ येथील बहुमताच्या जोरावर काँग्रेसपक्षाचें राज्य कायम राखलें गेलें आहे. या पश्चिम महाराष्ट्रामधील सर्व जिल्हा विकासमंडळामध्यें जनतेचें प्रतिनिधित्व करण्यास अपात्र ठरलेले काँग्रेसवाले भरले आहेत. अशा तऱ्हेनें महाराष्ट्रांतील विकासकार्यामध्यें जनतेला नको असलेल्या लोकांचा भरणा करणें केवळ द्विभाषिक राज्यामुळेंच शक्य झालें आहे. याचा परिणाम येथील विकासकार्यावर प्रतिकूल झाल्याशिवाय राहाणार नाहीं. यावरून घटकराज्यें जर एकजिनसी नसतील तर त्या राज्यामध्यें राजकीय गटबाजी व कारवायांना ऊत येतो व आर्थिक विकासाच्या कामांतदेखील लोकांचें सहकार्य मिळणें कठीण जातें, असें दिसून येईल.

## *नियोजन आणि भाषिक राज्यें*

आज भारत सरकारनें देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठीं नियोजनाचें तत्त्व स्वीकारलें आहे. परंतु आजचे राज्यकर्ते या नियोजनाकडे वरिष्ठ व हितसंबंधीं लोकांच्या दृष्टिकोनांमधून पाहत आहेत. वस्तुतः सरकारी घोषणेप्रमाणें देशांतील दारिद्र्य, विषमता, बेकारी इत्यादि अडचणी दूर करून समाजवादी व लोकशाही भारत निर्माण करणें हें नियोजनाचें उद्दिष्ट आहे. पण आज बेकारी व विषमता यांच्याकडे दुर्लक्ष होत असून केवळ ताबडतोबीनें उत्पादन वाढविण्यावर भर देण्यांत येत आहे. याचा अर्थ सरकारच्या, नियोजनाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनावर हितसंबंधीं वर्गाच्या विचारसरणीचा प्रभाव आहे. आज समाजामध्यें ज्यांचें वर्चस्व आहे त्यांच्या वर्चस्वाला विशेष धक्का न लावतां नियोजन करण्याचा सध्यांच्या राज्यकर्त्यांचा प्रयत्न आहे. भांडवलदारांच्या सहाय्यानें आपण उत्पादनवाढ करूं शकूं असें सरकारला वाटतें म्हणून सरकारनें भांडवलदारांचा हट्ट पुरविण्यासाठीं महाराष्ट्राला मुंबई देण्याचें नाकारलें. परंतु सरकारच्या या नियोजनविषयक धोरणा-मुळें ज्या जनतेसाठीं हें नियोजन करावयाचें त्या जनतेच्या भावनेला योग्य तें स्थान किंवा किंमत मिळत नाहीं. व त्यामुळें योजनेचें उद्दिष्ट साध्य होणें अशक्य झालें आहे. भारतासारख्या अप्रगत व दरिद्री देशामध्यें नियोजन यशस्वी व्हावयाचें असेल व देशाचा विकास घडवून आणावयाचा असेल तर त्यासाठीं आपली सारी साधनसामुग्री वापरली पाहिजे. योजनेला भांडवल कमी पडणार म्हणून आमचे अर्थमंत्री देशोदेशीं भिक्षांदेही करीत फिरून आले. परंतु आपल्या देशांतलें सर्वांत मोठें भांडवल जी मनुष्यशक्ति–कोट्यवधि लोकांची

श्रमशक्ति–तिचा आमच्या राज्यकर्त्यांना विसर पडलेला दिसतो. किंवा तिचा वापर करण्याचा त्यांच्याजवळ कोणताहि मार्ग दिसत नाहीं. कोणत्याहि देशांतील योजनेचा आराखडा हा त्या देशांतील उत्पादनसाधनांच्या स्वरूपावर व तंत्रावर, अवलंबून असतो. अमेरिका किंवा रशिया वा पश्चिम युरोप या राष्ट्रांमध्यें उत्पादनसाधनें प्रगतावस्थेला पोंहचलीं आहेत, तेथें उत्पादन तंत्राचा फार विकास झाला आहे. केंद्रीकरणावर आधारलेलें नियोजन अनिष्ट असलें तरी अशा राष्ट्रांमध्यें तें अंमलांत आणणें शक्य असतें. त्यासाठीं त्यांना राजकीय सत्तेचेंहि केंद्रीकरण करावें लागतें. चीनसारख्या मागासलेल्या देशानें ही गोष्ट साध्य करण्यासाठीं राजकीय सत्तेचें केंद्रीकरण तर केलेंच; पण त्याचबरोबर दडपशाहीचा व हुकूमशाहीचा स्वीकार करून सरकारी धोरणाला विरोध करणाऱ्या लक्षावधि लोकांचे बळी घेतले. परंतु भारतानें लोकशाही व सत्तेचें विकेंद्रीकरण या तत्त्वांचा जाहीरपणें स्वीकार केला आहे. आपण नियोजन करीत असतांना लोकशाहीचा विकास कसा होईल व सत्तेचें विकेंद्रीकरण कसें साधतां येईल, या गोष्टींकडेहि लक्ष दिलें पाहिजे.

## *जनतेच्या श्रमशक्तीकडे दुर्लक्ष*

आपणाला केवळ भांडवलदारांच्या उत्पादनसाधनांवर अवलंबून असें नियोजन करावयाचें नाहीं, तर देशामध्यें लोकांची जी श्रमशक्ति आहे तिचा वापर करावयाचा आहे. तिचा वापर प्रभावीपणें करण्यासाठीं योजनेच्या बांधणींत जनतेला योग्य हिस्सा दिला पाहिजे व तिच्या अंमलबजावणीच्या कामांत लोकांचें पुरेपूर सहकार्य मिळविलें पाहिजे. अर्थात् यासाठीं जनतेचा सरकारवर विश्वास पाहिजे, जनतेला सरकारबद्दल आपलेपणा वाटावयास पाहिजे. आज आपली योजना राष्ट्रीय स्वरूपाची आहे व ती दिल्लीमध्यें बसून तयार केली जाते. हें धोरण बदललें पाहिजे. संघराज्यानें योजनेचें सर्वसाधारण धोरण व तत्त्वें ठरवून द्यावीं पण त्यामधील तपशील भरण्याचें व त्याची अंमलबजावणी करण्याचें काम घटकराज्यावर व त्या राज्यामध्यें असलेल्या विविध स्थानिक संस्थांवर सोपविलें पाहिजे. या दृष्टीनें देशाच्या एकूण व्यवहारामध्यें घटकराज्याना फार महत्त्व आहे. इतकेंच काय, एकंदर राष्ट्रीय पुनर्रचनेचा एक भाग या दृष्टीनें नव्या घटकराज्यांच्या निर्मितीकडे पाहिलें पाहिजे. नवा भारत निर्माण करण्यासाठीं ही योजना आहे, असें सांगण्यांत येतें. पण हा नवा भारत कांहीं केवळ नवे कारखाने, धरणें किंवा खाणी उभारून होणार नाहीं. त्यासाठीं आपल्या हक्कांची

व जबाबदारीची जाणीव असलेला नवा नागरिक निर्माण झाला पाहिजे. प्रत्येक भारतीयाला संपूर्ण नागरिक बनविल्याशिवाय तो विकास कार्यामधील आपली जबाबदारी कशी उचलेल? आज तर मराठी व गुजराथी लोकांना एक प्रकारचें दुय्यम नागरिकत्व दिलें गेलें आहे. देशांतल्या इतर सर्व भाषिकगटांना आपापलीं भाषिक राज्यें देऊन महाराष्ट्र व गुजराथमधील लोकांवर अन्याय केल्यामुळें, विशेषतः महाराष्ट्रीय लोक राज्याचा विकास करण्यास अपात्र आहेत असा आक्षेप त्यांच्यावर घेतल्यामुळें, ते पूर्ण नागरिकत्वाच्या हक्कापासून वंचित झाले आहेत. इतर भारतीयांना एक न्याय व आपल्याला दुसरा या भावनेमुळें पांच कोटी मराठी व गुजराथी लोक असंतुष्ट आहेत. त्यांना हें दुय्यम नागरिकत्व देणाऱ्या द्विभाषिकाबद्दल प्रेम किंवा आपुलकी वाटणें शक्य नाहीं. आणि शासनसंस्थेच्या ज्या घटकामार्फत नागरिकांनीं देशाचा विकास करावयाचा त्या घटकाबद्दल नागरिकांना जर कसलेंच प्रेम किंवा आपुलकी वाटली नाहीं तर ते विकासकार्याशीं समरस कसे होणार? तें विकासकार्यामध्यें सहकार्य करण्यास उद्युक्त कसे होणार? आणि लोकांनीं विकासकार्याच्या कामीं हार्दिक सहकार्य केल्याशिवाय, आपली श्रमशक्ति वापरल्याशिवाय, विकासकार्य यशस्वी होणार नाहीं. तेव्हां लोकांचें हार्दिक सहकार्य मिळविण्यासाठीं त्यांच्या रास्त राजकीय आकांक्षा पुऱ्या केल्या पाहिजेत. आजच्या द्विभाषिक मुंबई राज्यामध्यें जनतेचें सर्व लक्ष त्यांच्यावर झालेल्या राजकीय अन्यायावर केंद्रित झालें आहे. तो अन्याय दूर केल्याशिवाय येथें खरा विकास होणें शक्य नाहीं. अशा परिस्थितींत घटकराज्य हें त्या प्रदेशांतील सामान्य नागरिकांच्या इच्छेनुसार बनविलें नाहीं तर त्या प्रदेशांत नुसता राजकीय असंतोष धुमसत राहातो. एवढेंच नव्हे, तर त्या प्रदेशाचा विकासहि अडून बसतो.

## *द्विभाषिक कां नको?*

द्विभाषिक किंवा बहुभाषिक प्रदेशामधील नागरिकांना एकत्र गोवणारी कोणतीच समान गोष्ट नसल्यामुळें त्यांना त्या राज्याबद्दल आपलेपणा किंवा निष्ठा (loyalty) वाटत नाहीं. राज्यपुनर्रचना मंडळानें देखील आपल्या अहवालांत ही गोष्ट कबुल केली आहे. शासनसंस्थेचे किंवा समाजवादाचे निरनिराळे घटक असतात. पण कोणतीहि व्यवस्था नीट टिकून तिचा विकास व्हावयाचा असेल तर प्रत्येक घटकामधील नागरिकांना एकत्र गोवणारी कांहीं श्रद्धा किंवा भावना पाहिजे. सर्व भारतीय नागरिकांना एकत्र गोवणारी राष्ट्रीयत्वाची भावना आहे. कुटुंबांतील

सर्व माणसें रक्ताच्या नात्यानें एकत्र बांधलेलीं असतात. त्याप्रमाणें एकभाषिक राज्यांतील नागरिक समान भाषेमुळें एकत्र बांधले जातात. त्यांच्यामध्यें ऐक्याची भावना जोपासली जाते. कुटुंबाला जशी रक्ताची निष्ठा तशी एकभाषिक राज्याला भाषेची निष्ठा असते. पण द्विभाषिक किंवा बहुभाषिक राज्यामध्यें असें निष्ठेचें कोणतेंच अधिष्ठान नसल्यामुळें लोकशाही आणि राष्ट्रीय विकास यांच्या दृष्टीनें देखील द्विभाषिक राज्यें अपयशींच ठरतील.

आज महाराष्ट्र व गुजराथमधील पांच कोटी लोकांच्या रास्त व न्याय्य आकांक्षा दडपल्या गेल्या आहेत. द्विभाषिक राज्यामध्यें प्रत्येक भाषिक गटाची आपणांवर दुसऱ्याकडून अन्याय होतो अशी समजूत होते. अन्यायाचे व पक्षपाताचे हे आरोप खरे असोत वा नसोत, तेथें संशयाचें व परस्पर-अविश्वासाचें वातावरण नेहमीं कायम राहातें. या संशयाच्या वातावरणामुळें सतत तंटेबखेडे व हेवेदावे वाढत जातात. लोकांची भाषिक राज्याची मूलभूत मागणी अमान्य केल्यामुळें जनतेचा शासनसंस्थेवरचा विश्वासच कमी होतो. शिवाय लोकांच्या इच्छेविरुद्ध द्विभाषिकासारखी घटना लादावयाची असल्यामुळें सरकारला व अधिकाऱ्यांना आपलीं कामें दडपशाहीच्या जोरावर करून घेण्याची संवय लागते. व त्यामुळें जनतेमधील अविश्वासाची भावना आणखीनच वाढीला लागते.

## *विकासमंडळांबाबत सरकारी पक्षपात*

याचें साधें उदाहरण म्हणून महाराष्ट्रामध्यें सरकारनें आज ज्या तऱ्हेनें जिल्हा विकास मंडळाची उभारणी केली आहे त्याकडे बोट दाखवितां येईल. महाराष्ट्रांत गेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्यें कॉंग्रेसचा सपशेल पराभव झाला. कॉंग्रेसला केवळ ३५% मतें मिळालीं तर संयुक्त महाराष्ट्र समितीला ६५% मतें मिळालीं. असें असतांना सरकारनें महाराष्ट्रांतल्या जिल्हा विकासमंडळामध्यें ७५% कॉंग्रेसजनांचा भरणा केला आहे. इतकेंच काय, पराभूत अशा कॉंग्रेस नेत्यांना प्रत्येक ठिकाणीं जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष किंवा चिटणीस अशा महत्त्वाच्या जागेवर नेऊन बसविलें आहे. अशा तऱ्हेनें जनतेनें आपलें प्रतिनिधित्व करण्यास अपात्र ठरविलेल्या लोकांच्या हातीं विकासाचीं कामें दिलीं तर त्या कामांत जनतेचें सहकार्य कसें मिळणार? उलट, कामाचा उठाव होतो असा देखावा करण्यासाठीं वशिल्याचीं माणसें पुढें सरसावतात व मग भ्रष्टाचार अधिकच वाढतो.

भारतासारख्या मागासलेल्या देशांत तर विकासाच्या कामीं जनतेचें सहकार्य

मिळविणें अत्यंत आवश्यक आहे. अमेरिका किंवा युरोपमध्यें लोकांच्या भावनांची कदर न करतां केवळ पैशाच्या व सरकारच्या हातीं असलेल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर सरकारला वाटेल तीं कामें पार पाडून घेतां येतात. पण आपल्या देशामध्यें खेडोपाडीं विकासाच्या योजना आंखणें व त्या पार पाडणें यासाठीं जनतेचें स्वयंस्फूर्त सहकार्य पाहिजे. आणि महाराष्ट्र व गुजराथमध्यें हें सहकार्य मिळवावयाचें असेल तर त्यांच्या भाषिक राज्यांची मागणी अगोदर मान्य केली पाहिजे. येथें कोणी असा प्रश्न करतील कीं, एकभाषिक राज्यामध्यें जनतेचें सहकार्य वाढलें आहे काय? इतर एकभाषिक राज्यांत तें वाढलें असेल किंवा नसेल, पण एकभाषिक राज्यें बनविल्याशिवाय जनतेचें सहकार्य मिळविणें शक्य नाहीं हा द्विभाषिक मुंबई राज्याचा अनुभव आहे.

८७५३०

## *सरकारचें भांडवलशाहीधार्जिणें धोरण*

नियोजनाचा आणि विकासाचा लोकशाहीवादी दृष्टिकोन आजच्या राज्यकर्त्यांनीं अंगिकारलेला नाहीं. तोंडानें ते समाजवादाचा कितीहि जप करीत असले तरी त्यांचे सर्व व्यवहार भांडवलदारांच्या कलानें चालतात. व्यवहारांत, आजच्या सरकारचें धोरण भांडवलशाहीला अनुकूल असेंच आहे. इतकेंच काय, पण आजच्या राज्यकर्त्यांच्या व्यवहारावर भांडवलदारांचें जें दडपण आहे त्यामुळेंच आजचें हें द्विभाषिक राज्य अंमलांत आलें आहे. राज्यपुनर्रचना मंडळानें किंवा सरकारनें मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी नाकारण्याचें जें मुख्य कारण सांगितलें आहे तें म्हणजे, मुंबईसारखें महत्त्वाचें आर्थिक केंद्र व बंदर एका भाषिक राज्यामध्यें घातल्यामुळें भांडवलदारांच्या हितसंबंधाला धोका पोहोंचेल असें त्यांना वाटतें. देशांतील इतर सर्व भाषिक घटकांना आपापलीं भाषिक राज्यें देऊन महाराष्ट्राच्या बाबतींत वेगळा न्याय लागू करण्याचें कारण म्हणजे मुंबई शहराबद्दल निर्माण केला गेलेला वाद. आजच्या सरकारचा मराठी भाषिक लोकांच्या राज्याला विरोध नाहीं. त्यांचा खरा विरोध आहे मुंबई शहर या राज्यामध्यें समाविष्ट करण्याला. राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर सरकारनें महाराष्ट्राच्या पुनर्रचनेसंबंधीं अनेक पर्याय सुचविले. तीन राज्यांची कल्पना सुचविली. मुंबई शहर मध्यवर्ति सरकारच्या नियंत्रणाखालीं ठेवण्याचा तोडगा काढला. मुंबईखेरीज बाकीच्या मराठी मुलुखाचें एक राज्य बनविण्यास त्यांनीं मंजुरी दिली. या प्रत्येक पर्यायामध्यें एकच सूत्र होतें. तें म्हणजे मुंबई शहर महाराष्ट्राच्या भाषिक राज्यामध्यें सामील होऊं द्यावयाचें नाहीं.

## *मुंबई आणि संयुक्त महाराष्ट्र*

मुंबई महाराष्ट्रांत न घालण्याचा सरकारचा एवढा हट्ट कां? महाराष्ट्रावर एवढा मोठा अन्याय करण्यास सरकार प्रवृत्त कां झालें? मुंबई महाराष्ट्रांत घालावी म्हणून जनतेनें एवढें मोठें आंदोलन केलें. पण तें निर्घृणपणानें दडपून टाकण्याचा प्रयत्न करून सरकारनें एवढा मोठा अन्याय करण्याचें काय कारण? एवढ्या मोठ्या सामाजिक घटना जेव्हां घडतात तेव्हां त्यामागें कांहीतरी वर्गीय हितसंबंधांचा संघर्ष संभवतो. मुंबई महाराष्ट्रामध्यें न घालण्याचीं जीं कारणें सरकारनें दिलीं आहेत त्यावरून या वर्गीय संघर्षाचें स्वरूप थोड्याफार प्रमाणांत लक्षांत येईल. सरकारनें यासंबंधानें प्रामुख्यानें तीन कारणें सांगितलीं आहेत. (१) मुंबई शहरामध्यें मराठी भाषिकांचें निखालस बहुमत नाहीं व इतर भाषिकांचें प्रमाण पुष्कळ आहे. (२) **मुंबईच्या विकासाचें कामीं अन्य भाषिकांनीं फार मोठा वांटा उचलला आहे.** (३) मुंबई हें देशांतील एक अत्यंत महत्त्वाचें आर्थिक केंद्र व बंदर असल्यामुळें त्याचा एक भाषिक राज्यामध्यें समावेश करणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें बरोबर ठरणार नाहीं.

## *लढ्याचें वर्गीय स्वरूप*

या सर्व कारणांची नीट छाननी केली म्हणजे या संघर्षाचें वर्गीय स्वरूपहि समजून येईल. मुंबईसारख्या सर्वच मोठ्या औद्योगिक शहरामध्यें अन्य भाषिकांची संख्या मोठी आहे. बंगलोरमध्यें तर कन्नड भाषिकांपेक्षा तामीळ भाषिकांची संख्या जास्त आहे. असें असतांना बंगलोर किंवा कलकत्ता हे जर त्या त्या भाषिक प्रदेशाचे अविभाज्य भाग होऊं शकतात तर मुंबईच्या बाबतींत ही अडचण कां यावी? बंगलोर किंवा कलकत्ता यांना कर्नाटक किंवा बंगालपासून अलग करण्याचा कधीं प्रश्नदेखील उपस्थित झाला नाहीं आणि मुंबईच्या बाबतींत अन्य भाषिकांच्या अस्तित्वाचा एवढा बाऊ करण्यांत येत आहे याचें कारण काय? याचें खरें कारण राज्यकर्त्यांनीं मुंबई महाराष्ट्रामध्यें न घालण्यासंबंधीं जे इतर दोन आक्षेप घेतले आहेत त्यांत आपणांस सांपडेल. मुंबईचा विकास करण्याच्या कामीं अन्यभाषिकांचा फार मोठा हात आहे व म्हणून मुंबई महाराष्ट्रांत सामील करावयाची नाहीं, असें सांगण्यांत येतें. परंतु विकास म्हणजे काय? व अन्यभाषिकांचा हिस्सा कोणता? मुंबईमध्यें आज जी कारखानदारी आहे, ज्या मोठमोठ्या टोलेजंग इमारती उठविल्या आहेत त्यांमध्ये महाराष्ट्रीयेतरांचें व विशेषतः गुजराती व्यापारी आणि भांडवलदार यांचें भांडवल गुंतलें आहे. त्यांच्या पैशानें मुंबईला

सध्यांचें वैभव प्राप्त झालें आहे, असें सांगण्यांत येतें. या तर्कवादामध्यें भांडवलदारांची वर्गभावना आहे. आमच्या पैशानें व व्यवसायकौशल्यानें आम्हीं मुंबई उभी केली तेव्हां हा दागिना आमच्याच अंगावर शोभला पाहिजे, असें भांडवलदार मानतात. भाडवलदारांच्या या हट्टापुढें सरकार नमलें आहे. पण मुंबईचा विकास घडवून आणण्याच्या कामीं भाडवलदारांच्या पैशाप्रमाणें मराठी माणसांचे श्रम कारणीभूत झाले नाहींत काय? त्यांच्या श्रमाला कांहींच किंमत नाहीं काय? ज्यांचें भांडवल गुंतवलें असेल त्यांचाच त्या वैभवावर हक्क हें तत्त्व पं. नेहरूंना मान्य आहे काय? मग या न्यायानें कलकत्त्यावर ब्रिटिश भांडवलदार आपला हक्क सांगतील. उद्यां जर मराठी लोकांनीं असें सांगण्यास सुरुवात केली कीं, बडोदा, ग्वाल्हेर, इंदोर वगैरे शहरांचा विकास मराठी सरदारांनीं केला आहे व म्हणून तीं शहरें गुजराथ किंवा मध्यप्रदेशांत समाविष्ट करूं नयेत तर तें चालेल कां? बंगलोर शहरामध्येंच २०% पेक्षां अधिक तामीळ लोक राहातात तरी देखील बंगलोरचा म्हैसूरमध्यें समावेश करण्यास तामीळ जनतेनें विरोध केला नाहीं. मराठी किंवा तामीळ लोकांचा हा समंजसपणा लोकशाहीला पूरक आहे. त्याचें पं. नेहरूंनीं कौतुक करावयास पाहिजे व गुजराथी लोकांनीं मुंबईच्या बाबत घेतलेल्या हट्टी व लोकशाहीविरोधी भूमिकेचा त्यांनीं निषेध करावयास पाहिजे. सुवेझ कालव्यावरहि ब्रिटिश लोक याच न्यायानें आपला हक्क सांगत होते. पण त्या बाबतींत पं. नेहरूंनीं कर्नल नासेरचा पाठपुरावा केला. ज्या न्यायानें सुवेझ कालवा इजिप्तचा त्याच न्यायानें मुंबई महाराष्ट्राची नाहीं का? पण वर सांगितल्याप्रमाणें पं. नेहरू व त्यांचें सरकार हें जरी समाजवादाच्या गोष्टी व घोषणा करीत असले तरी त्याचे सर्व व्यवहार मात्र भांडवलदाराच्या कलानेंच चालतात. आणि म्हणूनच मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याला त्यांनीं त्यावेळीं संमति दिली.

## *सरकारवर भांडवलदारांचें दडपण*

मुंबई हें देशाचें एक महत्त्वाचें बंदर व आर्थिक केंद्र आहे; म्हणून तें एक-भाषिक राज्यांत घालूं नये ही मागणी देखील भांडवलशाही दडपणाचीच द्योतक आहे. कलकत्ता, बंगलोर, कानपूर किंवा जमशेटपूर हीं काय कमी महत्त्वाचीं आर्थिक केंद्रें आहेत? मग तीं जर त्या त्या भाषिक प्रदेशामध्यें राहूं शकतात तर मुंबईच्या बाबतींत वेगळा हट्ट कां? शिवाय मुंबईमध्यें ज्यांचें आर्थिक वर्चस्व आहे किंवा मुंबईचा विकास करण्याच्या कामीं ज्यांचें भांडवल खर्चीं पडलें आहे त्यांच्याच सांगण्यावरून मुंबईचें राजकीय भवितव्य ठरवावें हा दृष्टिकोन लोकशाही आणि समाजवाद

यांच्या सर्वस्वी विरुद्ध आहे. मुंबईची आर्थिक वाढ करण्याच्या कामीं कोणाचा किती भाग आहे या गोष्टीचा मुंबईवर राजकीय सत्ता कोणाची असावी किंवा ज्या भाषिक प्रदेशांत नैसर्गिकरीत्या तें शहर आहे तेथून तें वेगळें करावें किंवा काय या प्रश्नाशीं कांहीं संबंध नाहीं. पण केवळ मुंबईमधले बडे भांडवलदार व व्यापारी यांच्या हट्टास्तव सरकारनें मुंबई महाराष्ट्रांत घालण्याचें नाकारून हें द्विभाषिक राज्य लादलें आहे. याचा अर्थ आर्थिक शक्तीच्या जोरावर देशाचा राजकीय नकाशाहि आपल्या मनाप्रमाणें बनविण्याचा भांडवलदारांचा हेतू आहे व सरकारनें भांडवलदारांपुढें शरणागति पत्करली आहे. यावरून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही नुसती लोकशाहीचीच मागणी आहे असें नव्हे तर त्यामुळें या देशांतील भांडवलदारांच्या शक्तीलादेखील मोठा धक्का मिळणार आहे.

### *मुंबईशिवाय महाराष्ट्र कां नको ?*

कांहीं लोक असें म्हणतात कीं, मुंबईचें वेगळें राज्य केलें तर बाकीचा महाराष्ट्र घेण्यास काय हरकत आहे? या प्रश्नाचें उत्तर असें कीं, राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या दोन दृष्टिकोनांत मूलभूत असा फरक आहे. केवळ मराठी भाषिक लोकांच्या हातांत त्या घटकराज्याची सत्ता यावी एवढाच ज्यांचा हेतू असेल त्यांनीं मुंबईशिवाय महाराष्ट्र स्वीकारावयास हरकत नाहीं. पण आम्ही जी भाषिक राज्यांची मागणी करतों ती त्या भाषिक लोकसमाजाची सर्वांगीण प्रगति व्हावी म्हणून मराठी लोकसमाजाची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय प्रगति करण्याचें एक साधन म्हणून आम्ही मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राकडे पहातों व त्या दृष्टीनें मुंबई शहर महाराष्ट्रामध्यें असणें अनिवार्य आहे. मुंबई हें मराठी भाषिकांच्या जीवनाचें व कर्तृत्वाचें केंद्र बनलें आहे. महाराष्ट्राच्या बहुतेक सांस्कृतिक हालचालींचें, विशेषतः वृत्तपत्रें, प्रकाशनें, कला वगैरेंचें संचलन मुंबईमधून होतें. त्याचप्रमाणें महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीसाठीं मराठी समाजांतल्या जुन्या सरंजामशाहींतल्या जातिभेदावर आधारलेल्या मूल्यांचें विसर्जन करावयाचें असेल तर मुंबई व महाराष्ट्राचा नित्य सवंकप संबंध राहिला पाहिजे महाराष्ट्राच्या खेडोपाड्यांमधून जे लाखों कामगार व कारकून मुंबईमध्यें गेले आहेत त्यांनीं आधुनिक औद्योगिक संस्कृतीचीं मूल्यें थोड्याफार प्रमाणांत आत्मसात केलीं आहेत. मराठी समाज दुभंगणाऱ्या दोन प्रवृत्ति आहेत. एक जातीयतेच्या कल्पना व दुसरी पांढरपेशा व बहुजनसमाज यांमधील सांस्कृतिक अंतर. या दोन्ही प्रवृत्ति मुंबईमध्यें हळू हळू लयाला जात आहेत व तेथें मराठी समाज खऱ्या अर्थानें एकजिनसी बनत

चालला आहे. हें लोण महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांमध्यें नेणें जरूर आहे व त्यासाठीं मुंबईचा समावेश महाराष्ट्रांतच करणें आवश्यक आहे.

## *महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा आधार : मुंबई*

मुंबई हा महाराष्ट्राचा सलग भाग आहे ही गोष्ट कोणालाच नाकारतां येणार नाहीं. पण केवळ मुंबई हा भौगोलिक दृष्टया महाराष्ट्राचा सलग भाग आहे एवढेंच मुंबईचें महाराष्ट्राच्या दृष्टीनें महत्त्व नाहीं तर महाराष्ट्रांतील रेल्वेमार्गांचें व सडकांचें तें मीलन केंद्र आहे, त्यामुळें सभोंवतालीं पसरलेल्या सर्व प्रदेशांतील व्यापारास मुंबई हीच एक उतारपेठ आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील सर्व व्यावसाइक व व्यापारी हितसंबंध मुंबईत केंद्रीभूत झाले आहेत. इतकेंच नव्हे तर, कोकणांतील व घाटावरील शेतकरी कुटुंबांतील लाखों लोकांचें मुंबई हेंच उपजीविकेचें साधन आहे. मुंबईमधील या लोकांचें राहाणीचें मान, त्यांच्या घरांचा प्रश्न, त्यांच्या शिक्षणाची सोय याचा परिणाम साऱ्या महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर झाल्याखेरीज राहात नाहीं. मुंबई हा केवळ महाराष्ट्राचा भौगोलिक भाग आहे एवढ्याच्र कारणास्तव तिचा समावेश महाराष्ट्रांत करावा असें नाहीं. तर, महाराष्ट्राची सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक प्रगति मुंबईशीं असलेल्या घनिष्ठ संबंधांवर अवलंबून आहे. म्हणून मुंबई महाराष्ट्रांत हवी. आजच्या युगांत राजकारणाची, व सामाजिक आणि आर्थिक बाबींची फारकत करतां येत नाहीं. लोकांची सामाजिक व आर्थिक प्रगति करणें हें राज्यसत्तेचें उद्दिष्ट मानलें जातें आणि म्हणून महाराष्ट्राच्या समाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठीं मुंबई व महाराष्ट्र यांचे राजकीय संबंधहि अविभाज्य राहिले पाहिजेत.

## *स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचें प्यादें*

मुंबईप्रमाणें विदर्भाचा प्रश्नहि कांहीं लोक उपस्थित करतात. त्यांचें म्हणणें असें आहे कीं विदर्भामधल्या लोकांना संयुक्त महाराष्ट्रांत जर सामील व्हावयाचें नसेल व त्यांना स्वतंत्र विदर्भ हवा असेल तर सर्व मराठी लोकांचें एकत्र राज्य असावें असा आग्रह धरण्याचें कारण काय ? विदर्भाचें स्वतंत्र राज्य करून मराठी भाषिक लोकांचीं दोन राज्यें केलीं म्हणून काय बिघडतें ? नाग विदर्भाचा एक स्वतंत्र प्रांत बनवावा म्हणून कांहीं लोकांनीं एक आंदोलनहि सुरू केलें आहे. अशा परिस्थितींत स्वतंत्र विदर्भाची मागणी करणारे लोक कोणत्या हितसंबंधाचे आहेत व त्या मागणीचा अर्थ काय हें नीट तपासून पाहिलें पाहिजे. स्वतंत्र

विदर्भामुळें विदर्भांतील जनतेचा फायदा होईल किंवा नाहीं, तेथील लोकशाही चळवळ वाढीला लागेल का तिच्यावर कांहीं प्रतिकूल परिणाम होतील या गोष्टींचाहि नीट विचार केला पाहिजे.

विदर्भाचें स्वतंत्र राज्य करावें व नागपूर राजधानी बनवून नागपूरचें वैभव वाढवावें अशी या नागविदर्भ आंदोलन समितीची भूमिका आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आतां शिगेला पोहोंचली असून महागुजराथ परिषद व संयुक्त महाराष्ट्र समिति या दोन संस्थांनीं वाटाघाटी करून सध्यांच्या द्विभाषिक राज्याचे दोन तुकडे करून एक मुंबईसह महाराष्ट्र व दुसरें महागुजराथ अशीं दोन भाषिक राज्यें करावीत याबद्दल त्यांचें मतैक्य झालें. द्विभाषिक आतां तुटणार व संयुक्त महाराष्ट्र स्थापन होणार अशी आशा सर्वसामान्य लोकांना वाटूं लागली आहे. अशा परिस्थितींत नाग-विदर्भाची चळवळ पुन्हां सुरू करण्याचा डाव रचला गेला आहे. ही गोष्ट मोठी अर्थपूर्ण आहे.

विदर्भामध्यें अजून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महाराष्ट्राइतकी खोलवर गेलेली नाहीं. तसेंच विदर्भाचा द्विभाषिकामध्यें समावेश केल्यानंतर तेथील राज्यकारभारामध्यें कांहीं गैरसोई निर्माण झाल्या आहेत व नागपूरची राजधानी गेल्यामुळें नागपूरचें महत्त्व फार कमी झालें आहे, या गोष्टींचा बाऊ करून विदर्भामधील जनतेमध्यें संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबद्दल गैरसमज निर्माण करण्याचें काम महाविदर्भवाद्यांनीं सुरू केलें आहे. महाविदर्भवाद्यांचा दावा असा आहे कीं, महाविदर्भाचें राज्य छोटें व सुटसुटीत होईल, हें राज्य आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी राहील व त्यामुळें या राज्यांत जनतेचा फायदा होऊन शिवाय नागपूर राजधानी झाल्यामुळें त्या शहराला आपलें पूर्वीचें महत्त्व पुन्हां प्राप्त होईल. विदर्भामधल्या बहुसंख्य जनतेच्या या भावना आहेत असें ते सांगतात व म्हणून त्यांनीं पुन्हां नागविदर्भाच्या मागणीचा पुरस्कार चालविला आहे.

### *नागविदर्भवाद्यांच्या कोलांटच्या उड्या*

महाविदर्भाची किंवा नागविदर्भाची मागणी करणाऱ्या लोकांना जनतेच्या नांवानें बोलण्याचा काय हक्क आहे तें समजणें मात्र कठीण आहे. राज्यपुनर्रचना मंडळापुढें या लोकांनीं महाविदर्भाची बाजू मांडली व त्याप्रमाणें महाविदर्भाच्या स्वतंत्र राज्याची शिफारस पुनर्रचना मंडळानें केली. पण कॉंग्रेसश्रेष्ठींच्या आग्रहाखातर हे लोक प्रथम मुंबईशिवाय महाराष्ट्रांत (तीन राज्यांच्या कल्पनेस पाठिंबा देऊन) जाण्यास तयार झाले. त्यांनीं ही तयारी दर्शवितांना कधीं

विदर्भांतल्या जनतेला विचारलें देखील नाहीं. नंतर काँग्रेसश्रेष्टींनीं तीन राज्यांची कल्पना सोडून महाद्विभाषिकाची सूचना आणली तेव्हांहि हे लोक महाद्विभाषिकांत जाण्यास तयार झाले. तेव्हांहि विदर्भाच्या जनतेला कोणी विचारलें देखील नाहीं. जर खरोखर विदर्भांतील जनतेचा विदर्भाच्या मागणीला प्रचंड पाठिंबा असता तर महागुजराथ नाकारल्याबरोबर गुजराथी जनतेनें जसा उठाव केला तसा विदर्भाच्या लोकांनीं केला असता. पण विदर्भाच्या सामान्य जनतेला महाविदर्भाच्या मागणीबद्दल कधींच आपलेपणा किंवा प्रेम वाटलेलें नाहीं. उलट विदर्भामध्यें जे बडे व्यापारी व भांडवलदार आहेत आणि ज्यांचें आज विदर्भ काँग्रेसमध्यें प्रस्थ आहे त्याच लोकांनीं आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठीं महाविदर्भाचा पुरस्कार चालविला आहे. ज्यावेळीं त्यांना वाटलें कीं, द्विभाषिक राज्यांत भांडवलदारांच्या हिताचें रक्षण होईल तेव्हां त्यांनीं द्विभाषिक मुकाट्यानें मान्य केलें, एवढेंच नव्हे तर त्याचें मोठ्या थाटामाटानें स्वागत केलें. पण आतां द्विभाषिक बुडणार, असें दिसूं लागतांच त्यांनीं पुन्हां विदर्भाच्या स्वतंत्र राज्याची कोल्हेकुई सुरू केली आहे.

### *विदर्भाच्या स्वयंपूर्णतेचें स्वरूप*

विदर्भाचें स्वतंत्र राज्य हें आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होणार, विदर्भाच्या लोकांचा मुंबईशीं कांहीं संबंध नाहीं, या वल्गनादेखील तेथील वरिष्ठ हितसंबंधी लोकाच्याच आहेत. विदर्भाचें राज्य आज स्वावलंबी आहे असें सांगण्यांत येतें याचा अर्थ काय? याचा अर्थ एवढाच कीं, आज विदर्भाचें उत्पन्न हें तेथें होणाऱ्या खर्चापेक्षां जास्त आहे. परंतु ही शिल्लक राहाण्याचें मुख्य कारण म्हणजे विदर्भांत समाजकल्याणाच्या योजना कमी आहेत. तेथील प्राथमिक शिक्षकाला फक्त रु. ६२ पगार मिळत असे, सार्वजनिक बांधकाम खात्यांतील मजुरांची रोजंदारीहि फक्त रु. १–२ आणे, सरकारी कारकुनाचा पगार द. म. रु. १०० पेक्षां कमी. सर्वत्र सक्तीचें प्राथमिक शिक्षण नाहीं. सध्यांच्या मुंबई राज्याप्रमाणें सरकारी नोकरांचें वेतनप्रमाण द्यावयाचें व शिक्षण, आरोग्य वगैरे बाबतींत जनतेला अधिक सवलती द्यावयाच्या म्हटलें तर छोट्याशा विदर्भाचें राज्य शिलकीचें राहील काय? पण स्वतंत्र विदर्भवाद्यांना गरीब नोकरवर्गाचे पगार, मजुरांची रोजंदारी किंवा जनतेचें हित यापेक्षां आपल्या खास हितसंबंधांच्या रक्षणाचें महत्त्व जास्त वाटतें व म्हणून ते विदर्भ हा स्वावलंबी राहील असें सांगतात. त्यांचा दृष्टिकोन स्थितिप्रिय आहे. तो पुरोगामी नाहीं.

### नागपूरचें महत्त्व

नागपूरला राजधानी केल्यामुळें विदर्भवासियांच्या अडचणी दूर होतील, ही कल्पनादेखील अशीच फसवी आहे. मध्यप्रदेशामध्यें शुक्ला व मिश्रा यांचें राज्य चालू असतां मंत्र्यांच्या मित्रांना थेट त्यांच्याकडे जातां येत असे व आपली व आपल्या मित्रांचीं कामें करून घेतां येत असत. हा वशिलेबाजीचा व्यवहार बंद झाल्यामुळें नागपूरमधल्या लोकांची गैरसोय झाली आहे. ते आज जनतेच्या नांवानें ओरडत आहेत. सामान्य जनतेच्या दृष्टीनें राजधानी कोठें आहे, यापेक्षां राजसत्ता कोणाच्या हातीं आहे याच गोष्टीला अधिक महत्त्व दिलें पाहिजे. आजहि मुंबई राजधानी असून मुंबईत हजारों गिरणी कामगार बेकार होत आहेत, सालीना शेकडों तरुण पदवी घेऊन बाहेर पडत आहेत; पण मुंबईमधील बेकारांना काम किंवा नव्या पदवीधरांना नोकऱ्या मिळत नाहींत. याचें कारण राज्यकर्त्यांचें धोरण भांडवलदारधार्जिणें असल्यामुळें त्यांना बेकारांच्या दुःखाची पर्वा नाहीं. म्हणून नागपूर राजधानी झाल्यामुळें तेथील लोकांना नोकऱ्या मिळतील किंवा विदर्भाच्या जनतेच्या अडचणी सुटतील असा कोणाचा समज असेल तर तो साफ चुकीचा आहे. मुंबई शहरांतील म्युनिसिपल कामगारांचें उदाहरण या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखें आहे. गेलीं पंचवीस वर्षें मुंबई कॉर्पोरेशनचा कारभार कॉंग्रेसच्या हातीं होता. त्यावेळीं कामगारांनीं अनेक वेळां आपल्या मागण्या अधिकारीवर्गापुढें मांडल्या. एकदां तर संपहि केला. पण कॉंग्रेसवाल्यांनीं तो संप मोडून काढला. त्याच कॉर्पोरेशनचा कारभार संयुक्त महाराष्ट्र समितीच्या हातीं आल्याबरोबर कामगारांच्या वेतनश्रेणीचें प्रमाण वाढविणें, निम्मा महागाईभत्ता पगारांत सामील करणें, घरभाडें भत्ता वाढवून देणें वगैरे मागण्या ताबडतोब मान्य करण्यांत आल्या. यावरून जनतेच्या मागण्या मान्य होण्यासाठीं राजसत्ता कोठें आहे इकडेच जनतेनें लक्ष दिलें पाहिजे. विदर्भाची चळवळ करणारे जे लोक आहेत ते सर्व व्यापारी व भांडवलदारांचे प्रतिनिधि आहेत. त्यांना वियाणी व कन्नमवार यांचा गुप्त पाठिंबा आहे. यावरून यदाकदाचित् महाविदर्भ झालाच तर तेथें जनतेचे काय हाल होतील याची कोणालाहि कल्पना करतां येईल.

नागपूर शहराच्या महत्त्वाचा प्रश्न देखील जनतेची दिशाभूल करण्यासाठींच उकरून काढण्यांत आला आहे. खरोखर नाग–विदर्भवाद्यांना नागपूरच्या महत्त्वाची कळकळ असती तर त्यांनीं द्विभाषिक राज्याला मान्यताच दिली नसती. कारण द्विभाषिकामुळें नागपूरचें महत्त्व अजिबात नष्ट झालें आहे. याच्या उलट संयुक्त महाराष्ट्रामध्यें नागपूरला उपराजधानी राहील. तेथें वर्षांतून कांहीं महिने

मंत्रिमंडळाचा मुक्काम राहील व विधानसभेचें एक अधिवेशन भरेल. संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें केलेला नागपूर करार समितीनें मान्य केला आहे. या करारान्वयें नागपूरला उपराजधानी राहील व विदर्भांतील लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणांत सरकारी नोकऱ्या मिळतील. विकासखर्चहि लोकसंख्येच्या प्रमाणांत होईल. नागपूरच्या महत्त्वाच्या दृष्टीनें किंवा विदर्भांतील जनतेच्या हिताच्या दृष्टीनें ही हमी पुरेशी आहे.

## *हाहि भांडवलदारांचा डाव*

वस्तुस्थिति अशी असतांना नाग-विदर्भवादी असें सांगतात कीं, आम्हांला द्विभाषिक चालेल, पण संयुक्त महाराष्ट्र नको. आज विदर्भाची मागणी करणाऱ्यांनीं गेल्या वर्षी द्विभाषिकाचें मोठ्या थाटानें स्वागत केलें होतें. पण आतां द्विभाषिक तुटणार अशी भीति वाटूं लागतांच त्यांनीं स्वतंत्र विदर्भाची मागणी पुन्हां सुरूं केली आहे. यावरून ही मागणी मुख्यतः संयुक्त महाराष्ट्राला विरोध करण्यासाठींच आहे हें उघड दिसून येतें. आज ही मागणी पुढें आली आहे ती विदर्भांतील जनतेच्या प्रेरणेमुळें आलेली नसून द्विभाषिकाचा पुरस्कार करणाऱ्या भांडवलदारांचा तो डाव आहे. जनतेच्या निरनिराळ्या विभागांत भेद पाडून जनतेच्या रास्त मागण्या डावलण्याचा भांडवलदार वर्गाचा बेत आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी नाकरतांना प्रथम या लोकांनीं गुजराथी लोकांच्या विरोधाची सबब पुढें केली. पण महागुजराथ जनता परिषदेनें संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा दिल्यामुळें ती सबब आतां उपयोगी पडणार नाहीं. प्रथम महागुजराथ परिषद व संयुक्त महाराष्ट्र समिति यांच्यामध्यें एकजूट होऊं नये म्हणून काँग्रेसवाल्यांनीं त्रिराज्याचें पिल्लूं पुन्हां एकदां सोडण्याचा प्रयत्न केला. पण तो डाव फसल्यावर आतां विदर्भांतले लोक संयुक्त महाराष्ट्राला राजी नाहींत असें दाखविण्याचा प्रयत्न चालूं आहे व या प्रयत्नाची प्रेरणादेखील भांडवलदारांचीच आहे.

## *विदर्भवाद्यांना सरकारची फूस*

महागुजराथ परिषद व संयुक्त महाराष्ट्र समिति यांच्यामध्यें मतैक्य झालें आहे, तेव्हां तुम्ही हा प्रश्न मिटवून टाकण्याच्या कामीं पुढाकार कां घेत नाहीं असा प्रश्न श्री. मुरारजीभाई देसाईंना विचारला असतां महागुजराथ परिषदेनें संयुक्त महाराष्ट्राला मान्यता दिली असली तरी विदर्भाची मान्यता कोठें आहे असें उत्तर मोरारजीभाईंनीं दिलें. प्रतापगडाच्या निदर्शनानंतर पुण्याच्या एका सभेंत

भाषण करतांना पं. नेहरूंनीं असें सांगितलें कीं, इतर मराठी मुलखांत सामील होण्यासाठीं आपण विदर्भीय नेत्यांवर दडपण आणलें. नेहरू व मुरारजींचे हे उद्‌गार स्वतंत्र विदर्भवाद्यांना चिथावणी देणारे असेच आहेत. आणि संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुटण्याच्या मार्गांत आणखी एक अडथळा आणण्यासाठींच ही नाग–विदर्भाची चळवळ सुरू करण्यांत आलेली आहे, हें यावरून उघड दिसतें.

## नागविदर्भाचे नेते कोण?

जर यदाकदाचित् नाग–विदर्भाचें राज्य झालेंच तर त्याचें स्वरूप किती प्रतिगामी राहील हें त्या चळवळीचे जे आजचे नेते आहेत त्यांच्यावरून लक्षांत येईल. नाग–विदर्भामध्यें कामगारांच्या पगारांचें प्रमाण कमी. सक्तीचें शिक्षण नाहीं व पुरोगामी कारभाराचा अभाव आहे. तेथें प्रबल असा विरोधी पक्ष नाहीं व त्यामुळें लोकशाहीदेखील प्रभावी होणार नाहीं. मुंबई व पश्चिम महाराष्ट्रामध्यें जी पुरोगामी चळवळ फोफावते आहे, तेथील जनशक्तीचा विदर्भातील जनतेशीं संबंध येऊं नये व तेथें जागृति वाढूं नये म्हणून महाराष्ट्रा-पासून विदर्भाला अलग करण्याचा भांडवलदारांचा डाव आहे. याच्या उलट, संयुक्त महाराष्ट्रांत सामील होण्यांतच विदर्भातील जनतेचें हित आहे. कारण महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या जागृतीचा व पुरोगामी चळवळीचा फायदा घेऊन विदर्भातील शेतकरी आज जो कापूस पिकावितो त्याचा भाव देखील मुंबईच्या बाजारांत ठरतो. म्हणून मुंबईमध्यें कोणाचें राज्य आहे, तेथील कापसाच्या बाजारावर कोणाचें नियंत्रण असावें या गोष्टी शेतकऱ्यांच्या दृष्टीनें महत्वाच्या आहेत. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून सहकारी पद्धतीनें खरेदी विक्रीचें तत्त्व अंमलांत आणणें जरूर आहे. पण नाग-विदर्भाचें आंदोलन चालविणारे पुढारी हे आज मुख्यतः विदर्भात कापूस, धान्य वगैरेंचा घाऊक व्यापार करणाऱ्या वर्गांतील लोक आहेत व त्यामुळें त्यांच्या हातीं सत्ता देण्यानें विदर्भातील शेतकऱ्यांचें दैन्य आणखी वाढणार आहे.

विदर्भाच्या मागणीचें फसवें व जनताविरोधी स्वरूप उघड केल्यानंतर नाग–विदर्भवादी असें म्हणतात कीं, तें कांहीं असलें तरी विदर्भातील जनतेला स्वतंत्र विदर्भ पाहिजे व तुम्ही त्यांच्या मनाविरुद्ध संयुक्त महाराष्ट्र कसा लादणार? एक तर विदर्भाच्या जनतेच्या नावानें बोलणाऱ्या या लोकांनीं जनतेच्या मताची कधींच कदर केली नाहीं. दुसरें असें कीं, स्वतंत्र विदर्भाच्या प्रश्नावर लोकमत कधींच घेतलें गेलें नाहीं. गेल्या सार्वत्रिक निवडणुकींत विदर्भामध्यें काँग्रेसचे

जास्त आमदार निवडून आले ते केवळ संयुक्तमहाराष्ट्रवादी उमेदवारांची एकजूट होऊं शकली नाहीं म्हणून. पण विदर्भात देखील संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करणाऱ्या उमेदवारांना पडलेलीं मतें काँग्रेसच्या मतांपेक्षां अधिक आहेत.

शिवाय राज्यपुनर्रचनेच्या दृष्टीनें जनतेचें मत अजमावयाचेंच म्हटलें तर तो घटक कोणत्या आधारावर ठरवावयाचा हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. विदर्भामध्येंच जर उद्यां कांहीं जिल्ह्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूनें कौल दिला तर बाकीचे जिल्हे त्यांच्यावर स्वतंत्र विदर्भ सक्तीनें लादणार काय? व या जिल्ह्यांना संयुक्त महाराष्ट्रामध्यें सामील केल्यानंतर राहिलेला विदर्भ हा अधिकच तोटका होईल. तेव्हां भाषा हीच राज्यपुनर्रचना करतांना आधारभूत गोष्ट धरली पाहिजे. विदर्भ असा स्वतंत्र घटक कल्पिणें हें कृत्रिमपणाचें ठरेल. उलट सर्व मराठी भाषिकांचा एक घटक मानणें हेंच अधिक शास्त्रीय व पुरोगामी तत्त्व ठरेल.

## *महाराष्ट्राच्या उपेक्षेचें कारण*

भांडवलदारांच्या आहारीं जाऊन पं. नेहरू व त्यांच्या सरकारनें मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति करण्यास नकार दिला ही गोष्ट जरी खरी असली तरी महाराष्ट्रावर एवढा मोठा अन्याय करण्याची भारत सरकारची हिंमत कशी झाली? सरकारला आज तात्बडतोबीची उत्पादनवाढ हवी आहे. आणि महाराष्ट्र हा दरिद्री प्रांत असल्यामुळें त्याच्याकडून तात्बडतोब उत्पादनवाढीची अपेक्षा करतां येत नाहीं व त्या कारणासाठीं तो प्रदेश उपेक्षीत राहीला तरी चालेल असा सरकारी धोरणाचा अर्थ आहे. महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वामधील दौर्बल्य भारत सरकारनें ओळखलें. महाराष्ट्राला प्रभावी एकजिनसी नेतृत्व नाहीं. त्यामुळें येथें अन्याय खपून जाईल अशी सरकारची अटकळ होती. दुर्बल नेतृत्वाचा दोष महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक इतिहासांत शोधला असतां आपणाला असें दिसून येईल कीं, महाराष्ट्रामध्यें जे जातिभेद आहेत व परिणामीं समाजांत ज्या फुटीर वृत्ति निर्माण झाल्या त्यामुळें येथें प्रभावी व एकजिनसी नेतृत्व निर्माण झालें नाहीं. या फुटीरपणामुळें व जातीय संकुचिततेमुळें नेतृत्वांत दुबळेपणा निर्माण झाला. आमच्याकडे जे नेते निर्माण झाले ते कोणत्याहि तात्त्विक अधिष्ठानापेक्षां किंवा विशिष्ट कार्यक्रमापेक्षां जातीच्या पाठिंब्यावर पुढें आले. गेल्या कित्येक वर्षांत महाराष्ट्रांत 'आपला कोण' याचें उत्तर, 'आपल्या मताचा कोण' असें न येतां 'आपल्या जातीचा कोण' असें येत असें. त्यामुळें विशिष्ट तत्त्वाच्या वा कार्यक्रमाच्या आधारें सर्व महाराष्ट्राचें नेतृत्व करणारे नेते येथें निर्माण होणें कठीण झालें. हा

अमक्या जातीचा पुढारी असेंच होऊं लागलें. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा कर्तृत्ववान व विद्वान पुढारी सर्व देशाचा किंवा समाजाचा पुढारी म्हणून ओळखला न जातां अस्पृश्य जमातीचा व त्यांतल्या त्यांत महारजातीचा पुढारी म्हणून ओळखला जातो व त्यांच्या अनुयायांना देखील तसेंच वाटत रहातें. महाराष्ट्र जोंपर्यंत द्विभाषिक किंवा बहुभाषिक राज्यामध्यें आहे तोंपर्यंत जातीपातींचे छोटे पुढारी इतरांच्या सहाय्यानें 'मोठे' होऊन सत्ता मिळवीत राहातील. सर्व महाराष्ट्रांत एकजिनसी नेतृत्व निर्माण करावें असें त्यांना कधींच वाटणार नाहीं. तेव्हां महाराष्ट्र समाजामध्यें अधिक एकात्मता निर्माण करण्यासाठीं, येथील जातीयतेच्या संकुचित मर्यादा ओलांडून सर्व महाराष्ट्राचें एकजिनसी नेतृत्व निर्माण करण्यासाठीं देखील संयुक्त महाराष्ट्राची गरज आहे.

### *भाषिक राज्यें व राष्ट्रीय ऐक्य*

संयुक्त महाराष्ट्र किंवा महागुजराथ यांची मागणी करणें ही गोष्ट संकुचित प्रांतीयवादाची द्योतक आहे, भाषिक राज्यांच्या मागणीमुळें राष्ट्रीय ऐक्याला धोका निर्माण होईल, असे आक्षेप एवढ्यांपुरतेच सतत घेण्यांत येतात. प्रथम ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं, भाषिक राज्यांची मागणी ही भारताच्या राज्य-घटनेच्या चौकटींत बसेल अशा प्रकारची पुनर्रचना करण्याची मागणी आहे. भारतीय संघराज्याचा एक सनदशीर घटक याच दृष्टीनें संयुक्त महाराष्ट्र किंवा महागुजराथ यांची मागणी आहे. शिवाय या भाषिक राज्याला इतर घटक राज्यांपेक्षां कांहीं जादा अधिकार पाहिजेत, असेंहि कोणी म्हटलेलें नाहीं. मग त्यांत धोका काय आहे ? भाषिक राज्य म्हणजे उपराष्ट्र असावें, असें कोणीहि म्हणत नाहीं. किंवा संघराज्यामधून फुटून निघण्याची कल्पनाहि कोणाला अभिप्रेत नाहीं. पूर्वी कम्युनिस्टांनीं भाषिक राज्यांचा पुरस्कार करतांना उपराष्ट्राच्या कल्पनेला उचलून धरलें होतें व श्री. डांगे यांनीं संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे झालेल्या निवडणुकांचा अहवाल मांडतांना महाराष्ट्रीय 'राष्ट्र' असा किंवा 'मराठी भाषिक राष्ट्रीयत्व' असा कांहींसा उल्लेख केला होता. पण अशा उल्लेखाबद्दल सर्व महाराष्ट्रानें नापसंति व्यक्त केली व शेवटीं स्वतः श्री. डांगे यांनीं देखील आपण वापरलेल्या शब्दामध्यें सार्वभौमत्वाची किंवा भारतीय संघराज्यामधून फुटून निघण्याची कल्पना नाहीं. तसा अर्थ कोणी काढला असेल तर आपणाला तो मान्य नाहीं व आपण महाराष्ट्रीय परंपरा, मऱ्हाटमोळा संस्कृति वगैरे कल्पना एका शब्दानें सूचित करण्यासाठीं तो शब्द योजला होता, असा खुलासा केला. संयुक्त महाराष्ट्राची

मागणी ही फुटीरपणाची नाहीं. महाराष्ट्राच्या मागणीवर फुटीरपणाचा किंवा देशाची फाळणी करण्याचा आक्षेप जे लोक घेतात ते केवळ या मागणीची व महाराष्ट्रीयांची बदनामी करण्याच्या हेतूनेंच ती गोष्ट करीत असतात.

*एकराष्ट्रीय निष्ठा*

भाषिक राज्याच्या पूर्तीनें राष्ट्राच्या ऐक्याला धोका तर येणार नाहींच. उलट त्यामुळें राष्ट्रीय ऐक्य अधिक बळकट होईल. चार वर्षांपूर्वी आंध्र प्रांत निर्माण केला. मग काय, आंध्रप्रांतीयांनीं भारतविरोधी भावना निर्माण केली? का भारतांमधून फुटून जाण्याची तयारी चालविली आहे? भारत हा खंडप्राय देश आहे व त्यामध्यें विविध विभागांत राहाणाऱ्या विविध लोकांच्या वेगवेगळ्या अपेक्षा व आकांक्षा आहेत. यापैकीं ज्या रास्त आकांक्षा असतील त्या पुऱ्या केल्या पाहिजेत. भाषिक राज्यांची आकांक्षा ही अशीच एक रास्त व लोकशाही आकांक्षा आहे. ती पुरी केल्यानें हिंदी समाजाचा उच्छेद होईल, असें जे लोक सांगतात त्यांच्या लोकशाहीच्या कल्पना व हिंदी समाजाविषयीचें ज्ञान अपुरें आहे, असेंच म्हणावें लागेल. कारण भारतामध्यें आज दोन प्रकारच्या व दोन वेगवेगळ्या पातळीवर असलेल्या अशा निष्ठा आहेत. अखिल भारतीय एकत्वाची किंवा भारतीय राष्ट्रीयत्वाची भावना ही प्रादेशिक भावनेला उल्लंघून जाणारी आहे. आज संयुक्त महाराष्ट्रासाठीं भारत सरकारशीं भांडणारे महाराष्ट्रांतील लोक इतर भाषिक लोकांच्या खांद्याला खांदा लावून शत्रूशीं लढल्याखेरीज राहाणार नाहींत. तसेंच संयुक्त महाराष्ट्रासाठीं लढणाऱ्या लोकांचें कांहीं गुजराती लोकांबरोबर वैर नाहीं. महाराष्ट्राची मागणी ही गुजराथ्यांच्या किंवा कोणाच्याहि द्वेषावर आधारलेली नाहीं. गुजराथमधील जनता व महाराष्ट्रांमधील जनता यांच्यामध्यें कसलेंहि भांडण नाहीं, ही गोष्ट महागुजराथ परिषद व संयुक्त महाराष्ट्र समिति यांच्यामध्यें झालेल्या वाटाघाटींनीं सिद्ध झालेली आहे. या वाटाघाटीमुळें मराठी जनता व गुजराथी जनता यांच्यामध्यें खरेखुरें ऐक्य निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. द्विभाषिकाच्या रूपानें पांच कोटी मराठी व गुजराथी लोकांच्यावर जो अन्याय झाला आहे त्याच्याविरुद्ध मराठी व गुजराथी लोकांनीं हातांत हात घालून लढण्याचें ठरविलें आहे. द्विभाषिक राज्यामध्यें गुजराथी व मराठी लोकांत नेहमीं कुरबूर व संशय यांचें वातावरण राहील. उलट संयुक्त महाराष्ट्र व महागुजराथ यांचीं दोन स्वतंत्र घटकराज्यें बनविलीं तर हे दोन्ही भाषिक लोक परस्परसहकार्यानें एकमेकांचा व अखिल भारताचा विकास करण्यासाठीं प्रयत्नशील होतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २२३३३ दि:

आपला भारत हा विविधतेनें नटलेला देश आहे. आज भारतीय राष्ट्र जरी संस्कृतीनें एक असलें तरी भाषा आणि परिस्थिति यांच्या भिन्नत्वामुळें त्या संस्कृतीचे आविष्कार निरनिराळे आहेत. देशांतील सर्व समाज एकजिनसी नाहीं. म्हणून राष्ट्रीय ऐक्याचा विचार विधायक दृष्टीनें केला पाहिजे. इंग्रजी अंमलाविरुद्ध जेव्हां आम्ही लढत होतों तेव्हां भारतामध्यें जी ऐक्याची भावना निर्माण झाली होती ती नकारात्मक स्वरूपाची होती. इंग्रजापासून सर्वांना स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे, अशी ती राजकीय स्वातंत्र्याच्या कल्पनेवर आधारलेली भावना होती. आतां राजकीय स्वातंत्र्य मिळालें आहे व देशामध्यें राजकीय एकसूत्रीपणादेखील निर्माण झाला आहे. आतां हें राष्ट्राचें ऐक्य एका नव्या पातळीवर दृढ केलें पाहिजे.

### *सामाजिक विकास आणि समानता*

ही नवी पातळी कोणती? ही नवी पातळी म्हणजे सामाजिक विकासाची व समानतेची. देशाचा सर्वांगीण व समानतेवर आधारलेला असा विकास आपणांस साधावयाचा आहे व हें विकासकार्य सर्व राष्ट्रानें एकदिलानें करावें, अशीच आपली इच्छा आहे. विकासकार्यांत राष्ट्रांतील सर्व घटकांनीं एकदिलानें भाग घ्यावा असें वाटत असेल तर सध्यांच्या राष्ट्रीय घडवणुकीमध्यें अन्याय होणार नाहीं, आपल्याला त्यांत पूर्ण संधि मिळेल अशी शाश्वति प्रत्येक प्रादेशिक घटकाला वाटली पाहिजे. म्हणून एखाद्या प्रादेशिक गटानें आपली विशिष्ट मागणी पुढें केली तर फुटीरपणाची मागणी म्हणून तिची अवहेलना करतां कामां नये. आज महाराष्ट्र किंवा गुजराथमध्यें भाषिक राज्याची मागणी आहे. तसेंच आसाममध्यें तेल कारखान्याची मागणी आहे. या मागण्या कांहीं राष्ट्रविरोधी नाहींत. उलट जर त्या त्या गटांच्या या मागण्या मान्य केल्या तर तेथील लोक राष्ट्रीय विकासाच्या कामामध्यें अधिक उत्साहानें व आपलेपणानें भाग घेतील. आसामी लोकांनीं तेलाच्या कारखान्याची मागणी केली तेव्हां ही प्रांतीय संकुचितता आहे, जर तज्ञांच्या मतें तेल कारखाना बिहारमध्यें काढणें सोईचें असेल तर आसामी लोकांनीं प्रांतीय अभिमानाला बळी पडून राष्ट्राचें नुकसान करूं नये, असाहि सल्ला त्यांना देण्यांत येतो. पण या प्रश्नाचा असा अलग व केवळ आर्थिक दृष्टिकोनांतून विचार करणें बरोबर ठरणार नाहीं. आसामी लोकांनीं तेलकारखान्याची जी मागणी केली ती तेथें विकासाचीं कामें पाहिजेत व तेथील लोकांना रोजगार मिळावा या

उद्देशानें. तज्ञ लोक अनेक वेळां केवळ पैशांचा व खर्चाचा विचार करून आपलीं मतें देतात. परंतु आसाममध्यें तेलकारखाना बांधण्यास बिहारपेक्षां एक कोटी रुपये जादा खर्च होईल असें मानलें तरी देशांतील सर्व भागामध्यें विकासाची पातळी समान रहावी म्हणून, तसेंच आसामला औद्योगिक प्रगतीची संधि देण्यासाठीं व आपल्या विकासाकडे दुर्लक्ष होतें, आपण उपेक्षित आहोंत यामुळें आसामी जनतेच्या मनांत जो असंतोष आहे तो दूर करण्यासाठीं तेवढे जादा पैसे खर्च करण्यानें राष्ट्राचें नुकसान न होतां फायदाच होणार आहे. बेकारी टाळण्यासाठीं आपण अंबर चरख्याला, हातमागाच्या धंद्याला व खादीला करोडो रुपयांची मदत देतों. मग आसामच्या औद्योगीकरणासाठीं एक कोटी रुपयांची मदत दिली म्हणून बिघडलें कोठें ? तेलकारखान्याची मागणी ही त्या प्रदेशाची प्रादेशिक विकासाची मागणी आहे व ती राष्ट्रीय विकासाशीं सुसंगत आहे. विरोधी मुळींच नाहीं.

## *प्रादेशिक आकांक्षा आणि राष्ट्रीय ऐक्य यांची सांगड*

तेव्हां प्रादेशिक आकांक्षा व राष्ट्रीय ऐक्य यांचा विवेक नीट केला पाहिजे. प्रत्येक प्रादेशिक मागणी किंवा आकांक्षा राष्ट्रीय ऐक्याला धोका देणारी म्हणून तिची अवहेलना केल्यानें राष्ट्रीय ऐक्य बळकट होण्याऐवजीं त्या त्या प्रदेशांतील लोक दुखावले जातील. आज आपण सबंध राष्ट्राचा सर्वांगीण विकास करावयाचें ध्येय डोळ्यांसमोर ठेवलें आहे. मग या विकासामध्यें रास्त अशा प्रादेशिक भावनांना योग्य स्थान द्यावयाला नको का ?

खरोखर राष्ट्रीय ऐक्य जर पक्कें सांधावयाचें असेल तर एका प्रदेशांतल्या लोकांच्या रास्त आकांक्षांना अन्य प्रदेशांतल्या लोकांनीं मनापासून पाठिंबा दिला पाहिजे. सर्व प्रादेशिक घटक हे एका राष्ट्रशरीराचे विविध अवयव आहेत व या सर्वांच्या विकासानें राष्ट्राचा एकूण विकास साधणार आहे अशी भूमिका घेतली तरच खरोखर राष्ट्रैक्य वाढीला लागेल. याऐवजीं सत्तेच्या जोरावर प्रादेशिक भावना दडपून टाकावयाच्या किंवा त्यांच्या रास्त मागण्या द्यावयाच्या नाहींत असें कोणी ठरविलें तर त्या त्या प्रदेशांमधील लोकांच्या मनांतील कटुता व संशय वाढीला लागेल. राष्ट्रीय ऐक्य व प्रादेशिक आकांक्षा यांचें सामंजस्य आपण साधलें पाहिजे. तें न साधतां न्याय व उचित प्रादेशिक भावनांचीहि अवहेलना केली तर मात्र त्या त्या प्रदेशामध्यें फुटीरपणाच्या भावना घर करून राहाण्याचा धोका निर्माण होईल.

# आंदोलनाचें सिंहावलोकन

### *काँग्रेसनें केलेला विश्वासघात*

संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही न्याय्य, लोकशाही स्वरूपाची आणि राष्ट्रीय एक्याला पूरक कशी आहे या गोष्टीचा येथवर विचार झाला. परंतु ही मागणी अशा स्वरूपाची असली तरी ती पदरांत पाडून घेण्यासाठीं केवळ वाटाघाटींचाच मार्ग वापरावा; चळवळ, सत्याग्रह वगैरे प्रकारांचा अवलंब करूं नये; कारण त्यामुळें प्रक्षोभक वातावरण निर्माण होतें असा कांहीं लोकांचा आक्षेप आहे. गेल्या दोन वर्षांमध्यें महाराष्ट्रांत संयुक्त महाराष्ट्राच्या सिद्धीसाठीं जे भगीरथ प्रयत्न झाले त्यांचें थोडें सिंहावलोकन करून या आक्षेपांत कितपत तथ्य आहे तें तपासून पाहिलें तर असें दिसून येईल कीं गेल्या दोन वर्षांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामुळें महाराष्ट्रामध्यें पुरोगामी विचारांची व सामाजिक ऐक्याच्या भावनेची वाढ झाली आहे व त्यामुळें संयुक्त महाराष्ट्राचें उद्दिष्टहि अधिक जवळ आलें आहे.

आज संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर महाराष्ट्रांत काँग्रेस विरुद्ध सं. महाराष्ट्र समिति असे दोन तट पडले असले तरी थोड्या वर्षांपूर्वीं महाराष्ट्रामध्यें अशी परिस्थिति नव्हती. भारतामधील निरनिराळ्या राज्यांत व संस्थानामध्यें विभागलेल्या सर्व मराठी मुलखाचें एकीकरण करून संयुक्त महाराष्ट्राचें एक घटक राज्य बनवावें या मागणीचा पुरस्कार महाराष्ट्रांतील काँग्रेससहित सर्व पक्षांनीं केला होता. किंबहुना इतर पक्षांपेक्षां महाराष्ट्र काँग्रेसचा आग्रहच अधिक तीव्र होता. या कामासाठीं सर्वपक्षीय अशी संयुक्त महाराष्ट्र परिषद संघटित करण्याच्या कामीं महाराष्ट्रांतील श्री शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे प्रभृति काँग्रेस पुढारीच अग्रेसर होते. राज्यपुनर्रचना कमिशनसमोर महाराष्ट्राची बाजू या परिषदेमार्फत सर्वांनीं एकमुखानें मांडली होती. म्हणजे प्रथमपासून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचें स्वरूप सर्वपक्षीय असें होतें. त्यामध्यें पक्षभेदांना कोणत्याहि प्रकारचें स्थान नव्हतें. परंतु राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर काँग्रेस पुढाऱ्यांनीं हा प्रश्न जणूं आपल्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे अशी भूमिका घेऊन संयुक्त महाराष्ट्राची फळीं प्रथम ढिली केली.

राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध होण्याचे अगोदर कांहीं दिवस मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी मंजूर होणार नाहीं या गोष्टीचा सुगावा लागलेला होता. वस्तुतः अशा परिस्थितींत महाराष्ट्र काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं ज्या

कांहीं हालचाली करावयाच्या त्या सर्वपक्षीय परिषदेमार्फत करावयास पाहिजे होत्या. पण तसें न करतां कॉंग्रेसनें आपला स्वतंत्र पवित्रा टाकण्यास सुरवात केली. राज्यपुनर्रचना मंडळाच्या अहवालाविरुद्ध महाराष्ट्रामध्यें साहजिकच फार असंतोष होता व सभा, मोर्चे वगैरेंच्या मार्गानें हा असंतोष व्यक्त होत होता. परंतु अ. भा. कॉंग्रेसनें फाजलअलि अहवालाला मान्यता दिल्यामुळें महाराष्ट्रांतील कॉंग्रेसजनांनीं या प्रश्नावर सभा मोर्चे वगैरे कोणत्याहि प्रकारचें आंदोलन करतां कामा नये असा फतवा महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीनें काढला. त्याचप्रमाणें या प्रश्नासंबंधीं विचार करण्यासाठीं कॉंग्रेसश्रेष्ठींनीं अन्यपक्षीयांना डावलून महाराष्ट्र, गुजराथ व मुंबईमधील कॉंग्रेस पुढाऱ्यांचीच एक बैठक ता. १७ आक्टो. १९५५ रोजीं दिल्ली येथें बोलावली. व मुंबईच्या प्रश्नावर या तीनहि ठिकाणच्या कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं सर्वमान्य योजना तयार करावी असें सुचविलें. वास्तविक ही सूचना किंवा बैठक हा केवळ काळकाढूपणाचाच डाव होता. वस्तुतः मुंबईचा महाराष्ट्रांत समावेश करण्यास गुजराथी कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं विरोध करण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण त्यांचा स्पष्ट विरोध असतांना सर्वसामान्य योजना करणें म्हणजे महाराष्ट्रानें मुंबईवरचा हक्क सोडून देणें असाच होता. व महाराष्ट्रीय कॉंग्रेस पुढाऱ्यांना हा हक्क सोडून देण्यास राजी करण्यासाठीं दिल्लीची बैठक बोलाविण्यांत आली होती.

दिल्लीच्या या बैठकींमध्यें काय वाटाघाटी झाल्या याची कांहीं कल्पना नाहीं. पण दिल्लीहून परत आल्यावर महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीची सभा भरवून महाराष्ट्र कॉंग्रेसनें संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीपासून पहिली माघार घेतली. या सभेंत महाराष्ट्र कॉंग्रेसनें तडजोड या नात्यानें का होईना विदर्भासह महाद्विभाषिकाची सूचना केली. परंतु महाराष्ट्र कॉंग्रेसच्या या सूचनेला अन्य कोणीहि पाठिंबा दिला नाहीं. कॉंग्रेसची ही भूमिका संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न झाला. ता. २३ ऑक्टोबरला झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या बैठकींत श्री. शंकरराव देवांच्या तडजोड मसुद्याला पाठिंबा द्यावा अशी सूचना आली होती. पण श्री. एस्. एम्. जोशी, महामहोपाध्याय द. वा. पोतदार वगैरेंनीं ती हाणून पाडली. याच सभेंत श्री. एस्. एम्. जोशी यांनीं परिषदेतर्फें एक दिन पाळून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पुनरुच्चार करावा अशी सूचना आणली होती. पण परिषदेमधील कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं ती आमान्य केल्यामुळें कॉंग्रेसखेरीज इतर पक्षांचे पुढारी व अन्य कांहीं स्वतंत्र महाराष्ट्रीय नेते यांनीं स्वतंत्रपणें ता. ६ नोव्हेंबर रोजीं संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा करावा अशी

महाराष्ट्रीय जनतेला विनंति केली. त्याचप्रमाणें या बैठकींत श्री. शंकरराव देव यांना, जरी त्यांनीं परिषदेची मूळ भूमिका सोडली होती तरी, परिषदेचें ऐक्य टिकविण्यासाठीं सर्वाधिकारी नेमण्यांत आलें.

राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्रांतील कॉंग्रेस पुढारी व दिल्लीचे कॉंग्रेसश्रेष्ठी आणि गुजराथ व मुंबई येथील कॉंग्रेस नेते यांनीं वाटाघाटींचा घोळ एक महिनाभर घातला. व शेवटीं १२-१३ नोव्हेंबरला भरलेल्या कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें विदर्भासह महाराष्ट्राचें एक राज्य, मुंबईचें स्वतंत्र राज्य व महागुजराथ अशी त्रिराज्य योजना सुचविली. आणि ता. १८ नोव्हेंबर रोजीं मुंबई विधान सभेचें एक खास अधिवेशन बोलवून तेथें या त्रिराज्य योजनेला संमति मिळविण्याचें ठरविलें. सरकारच्या या लोकशाहीविरोधी धोरणाचा निषेध करण्यासाठीं व मुंबईच्या जनतेचें मत विधिमंडळ सदस्यांना कळविण्यासाठीं कौन्सिल हॉलवर नागरिकांचा एक मोर्चा न्यावा अशी सूचना परिषदेचे सर्वाधिकारी श्री. शंकरराव देव यांना करण्यांत आली. पण श्री. देवांनीं या गोष्टीस नकार दिला. तेव्हां मुंबईतील अन्य पक्षीयांनीं ता. १८ नोव्हेंबरचें निदर्शन व एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्यासाठीं एक तात्पुरती कृति समिति नेमली.

मुंबई विधानसभेंत त्रिराज्य योजनेचा ठराव येणार व महाराष्ट्रांतले कॉंग्रेसवाले त्यांच्या श्रेष्ठींच्या निर्णयाला मान तुकवून पक्षाच्या शिस्तच्या नांवाखालीं त्या ठरावास पाठिंबा देणार हें उघड दिसत होतें. म्हणून जनतेचें मत या आमदारांच्या कानावर घालण्यासाठीं ता. १८ नोव्हेंबर रोजीं पू. सेनापति बापट यांच्या नेतृत्वाखालीं मुंबईच्या जनतेचा एक प्रचंड मोर्चा विधानसभेवर नेण्याचें ठरलें. परंतु श्री. मोरारजीभाईंनीं या मोर्चावर बंदी घातली. मराठी जनतेच्या न्याय्य मागण्या शांततेनें व्यक्त करणेंहि सरकारनें अशक्य करून टाकलें. उलट फ्लोरा फाउंटनजवळ हजारों पोलीस आणून श्री. मोरारजीभाईंनीं आपल्या पाशवी शक्तीचें प्रदर्शन केलें. परंतु पाशवी शक्तीच्या या प्रदर्शनाला दाद न देतां हजारों कामगारांनीं ता. १८ नोव्हेंबरच्या मोर्चामध्यें भाग घेतला. एवढा प्रचंड जनसमुदाय, पण कोणीहि अत्याचारी किंवा हिंसक वृत्ति दाखविली नाहीं. फ्लोरा फाऊंटनजवळ येऊन ते एकच मागणी मागत होते: "मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे." जनतेचें म्हणणें ऐकून घेण्यासाठीं श्री. मोरारजीभाई किंवा स्वतःला संयुक्त महाराष्ट्रवादी म्हणविणारे श्री. भाऊसाहेब हिरे हे बाहेर तर आले नाहींतच, उलट या शांत जमावावर लाठीहल्ला करण्यांत आला, अश्रूधूर सोडण्यांत आला. पण लोकांनीं शांततेचा भंग मुळींच केला नाहीं.

या मोर्चानंतर ता. २१ रोजीं त्रिराज्य–योजनेच्या निषेधार्थ मुंबईमध्यें एक दिवसाचा सार्वत्रिक संप पुकारण्यांत आला. या दिवशीं सकाळपासूनच वातावरण बरेंच प्रक्षुब्ध होतें. तरीहि मुंबईमधील गिरण्या, मोठमोठे कारखाने, व्यापारी-कंपन्या व बरेचसे सरकारी नोकर अशा सुमारें ४ ते ५ लाख लोकांनीं त्रिराज्य योजनेच्या निषेधार्थ संप केला. संप जवळ जवळ शांततापूर्ण होता. पण कांहीं ठिकाणीं पोलीसांच्या पहाऱ्यांत बसेस चालविण्याचा अट्टाहास केल्यामुळें बसेसवर दगडफेंक करण्यांत आली. पण एवढें गालबोट सोडल्यास सर्व लोक दुपारीं ३ वाजतां शांतपणें फ्लोरा फाऊंटनजवळ जमा झाले. तेथें तर पोलिसांचें राज्य होतें. जमावाला हटविण्यासाठीं गोळीबार करण्यांत आला. हा गोळीबार नुसता जनतेला घाबरविण्यासाठीं नव्हता. कारण येथें पोलिसांच्या नेहमीच्या संकेताप्रमाणें कमरे-खालीं गोळ्या न मारतां रिव्हॉल्व्हरनें गोळ्या झाडून माणसें टिपून काढलीं. हा 'पराक्रम' करण्याच्या कामीं मुंबईतले महाराष्ट्रीय पोलीस कुचराई करतील या शंकेनें २१ नोव्हेंबर रोजीं श्री. मुरारजीभाईंनीं खास अहमदाबादचे पोलीस व होमगार्डस् मागविले होते. व त्यांच्या पराक्रमानें २१ नोव्हेंबर रोजीं ९ महाराष्ट्री-यांना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं आपलें प्राणार्पण करावें लागलें.

परंतु या खास पोलिसांच्या खास गोळीबारापुढेंदेखील जनता दबली नाहीं. जमाव सारखा वाढतच होता व त्याची मागणी एकच होती, 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' अखेर विधानसभेंतून साथी एस्. एम्. जोशी, डॉ. अमूल देसाई व श्री. नौशेर भरुचा हे बाहेर आले. आणि जेथें पोलिसांच्या गोळ्या असमर्थ ठरल्या तेथें या पुढाऱ्यांचे शब्द प्रभावी ठरले व त्यांनीं सर्व जमाव चौपाटीवर नेला. चौपाटीवर लाखों लोकांची जाहीर सभा झाली. या सभेंत सेनापति बापट व साथी एस्. एम्. जोशी यांनीं जनतेला शांततेनें लढा करण्याचा आदेश दिला. 'आम्ही आत्मक्लेश भोगूं पण कोणताहि क्लेश भोगा-वयास लावणार नाहीं' अशी शपथ सेनापतींनीं जनतेकडून घेववली.

ता. २१ नोव्हेंबरच्या घटनेचे पडसाद महाराष्ट्रभर उमटले. पुणें, सोलापूर, कोल्हापूर वगैरे ठिकाणीं जनतेनें ता. २२ रोजीं स्वयंस्फूर्त हरताळ व संप केले. हजारोंच्या सभा झाल्या व संयुक्त महाराष्ट्रांच्या मागणीचा पुनरुच्चार केला. या सर्व घटनांचें दडपण मुंबई विधानसभेंतील कॉंग्रेस आमदारावरहि पडलें व त्यांच्यापैकीं कांहींनीं राजिनामे देण्याची तयारी दर्शविली. त्यामुळें कॉंग्रेस श्रेष्ठींनीं या प्रश्नाचा पुन्हां एकदां विचार करण्याचें ठरविलें व ता. २३ रोजीं त्रिराज्य योजनेचा ठराव मागें घेऊन मुंबई विधानसभेचें अधिवेशन तहकूब करण्यांत आलें.

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचें व्यासपीठ प्रथमपासूनच सर्वपक्षीय राहिलें होतें. व हें ऐक्य जितकें अधिक व्यापक प्रमाणांत टिकवितां येईल तितकें टिकवावें असें प्रजा सोशलिस्ट पक्षाचें धोरण होतें. म्हणूनच ता. २१ नोव्हेंबरच्या संपासाठीं नेमलेल्या कृति समितीलाच कायम स्वरूप देण्यास किंवा पुण्यास लोहियावादी व कम्युनिस्टांनीं बनविलेल्या नागरिक मोर्चास प्रजा सोशालिस्ट पक्षानें पाठिंबा दिला नाहीं. लढ्याच्या दोन अवस्थांमध्यें ज्याप्रमाणें संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें नेतृत्व केलें होतें त्याचप्रमाणें प्रत्यक्ष प्रतिकाराच्या तिसऱ्या अवस्थेंत देखील लढ्याचें मार्गदर्शन परिषदेनें करावें अशीच प्रजा सोशलिस्ट पक्षाची इच्छा होती. त्याचप्रमाणें जनतेच्या दडपणाखालीं राजिनामे देण्यास तयार झालेल्या कॉंग्रेस आमदारांना लढ्यांतून फुटून जाण्याची संधि मिळूं नये म्हणून इतक्यांत नवी कृतिसमिति बनविण्याला प्रजा सोशलिस्ट पक्षाचा विरोध होता. व त्या दृष्टीनें साथी एस्. एम्. जोशी हे श्री. शंकरराव देवांचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत होते. तें नच जमलें तर संयुक्त महाराष्ट्र परिषदेमधील जे सदस्य लोकशाही व शांततामय मार्गांनीं लढ्याला तयार असतील अशांची एक समिति बनवून हा लढा चालवावा अशी प्र. सो. पक्षाची भूमिका होती. विधानसभेचें अधिवेशन तहकूब झाल्यावर कॉंग्रेसचे नेते वाटाघाटी करण्यासाठीं पुन्हां दिल्लीस गेले होते. दिल्लीस जातांना श्री. हिरे व श्री. गाडगीळ यांनीं मुंबईला मोठमोठ्या जाहीर सभांतून पुन्हां संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा केल्या होत्या. या सर्व परिस्थितीचा विचार करून महाराष्ट्र प्रजा सोशलिस्ट पक्षानें ठाणें येथें ता. २, ३ व ४ डिसेंबर १९५५ रोजीं आपलें खास अधिवेशन भरवून संयुक्त महाराष्ट्र परिषदेनेंच हा लढा पुढें चालवावा असें आवाहन केलें व तें नच जमल्यास सर्व संयुक्त महाराष्ट्र-वादी शक्तींना एकत्र करण्याच्या कामीं पुढाकार घेण्याचा आदेश साथी एस्. एम्. जोशी यांना देणारा ठराव मंजूर केला.

महाराष्ट्रांतील कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर लोकनिष्ठेपेक्षां पक्षनिष्ठा श्रेष्ठ न मानतां विधिमंडळाचे राजिनामे द्यावे व जनतेच्या बाजूनें उभे राहावें अशी सर्व मराठी जनतेची इच्छा होती. उलट कॉंग्रेसश्रेष्ठी त्यांना शिस्तीचा बडगा दाखवून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पुरस्कार करूं नका असें सांगत होते. मुंबईमध्यें मुख्यमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई यांनीं दारूबंदी खात्याचे उपमंत्री डॉ. नरवणे यांच्याकडे संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार केल्याबद्दल राजिनाम्याची मागणी केली. वस्तुतः श्री. नरवणे यांच्याकडे राजिनामा मागितल्या-बरोबर श्री. हिरे यांनीं स्वतः राजिनामा द्यावयास पाहिजे होता. पण श्री. हिरे

यांनीं अवसानघातकीपणा दाखविला. तरीदेखील डॉ. नरवणे यांनीं पक्षनिष्ठेपेक्षां लोकनिष्ठा श्रेष्ठ मानून उपमंत्रीपदाचा राजिनामा दिला. त्याचप्रमाणें मुंबई कॉर्पो-रेशनमधील त्यांच्या अनुयायांनींदेखील असाच बाणेदारपणा दाखविला. मुंबई शहर कॉंग्रेस कमिटीनें त्रिराज्य योजनेला पाठिंबा देणारा प्रस्ताव पास केला होता व मुंबईच्या नागरिकांचा संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा नाहीं असा आभास श्री. स. का. पाटील यांनीं निर्माण केला होता. श्री. पाटलांचा हा डाव हाणून पाडण्यासाठीं मुंबई कॉर्पोरेशनमधील एक प्रजासोशलिस्ट नगरपिते प्रा. राम जोशी यांनीं संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करणारा ठराव कॉर्पोरेशनमध्यें आणला. या ठरावावर प्रदीर्घ चर्चा करून व मतदान होऊं नये म्हणून अनेक तांत्रिक अडचणी आणून मुंबई कॉर्पोरेशनचें मत व्यक्त होऊं नये यासाठीं कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं व विशेषतः श्री. सदोबा पाटलांनीं पुष्कळ खटपटी केल्या. पण या सर्व खटपटी निष्फळ ठरल्या. मुंबई कॉर्पोरेशनमधील प्रजा सोशलिस्ट, शे. का. फे. आणि कॉंग्रेसजन परिषदेच्या नगरपित्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूनें मत देऊन मुंबई शहरांतील जनतेचा संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूनें कौल आहे असें जाहीर केलें.

### *निर्नायकीमधून नवें नेतृत्व*

मराठी जनतेनें त्रिराज्य योजनेसंबंधीं सर्वत्र व्यक्त केलेली नापसंति किंवा मुंबई कॉर्पोरेशननें संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूनें दिलेला कौल यांपैकीं कशाचाहि परिणाम कॉंग्रेसश्रेष्ठींवर झाला नाहीं. त्रिराज्य योजनेचा ठराव मुंबई विधानसभेंत मागें घेतल्यावर महाराष्ट्र कॉंग्रेसचे पुढारी पं. नेहरूप्रभृतींना भेटावयास गेले. पण पं. नेहरू व त्यांचे अन्य सहकारी मुंबईचा महाराष्ट्रांत समावेश करण्यास तयार होईनात. मुंबईचें स्वतंत्र राज्य करण्याऐवजीं मुंबई शहरावर मध्य सरकारचें अधिपत्य ठेवण्याची पर्यायी योजना कॉंग्रेसश्रेष्ठींनीं मांडली.

आपल्या या निर्णयामुळें मुंबई व महाराष्ट्रामध्यें प्रक्षोभ निर्माण होईल याची सरकारला अटकळ असावी. कारण ज्या दिवशीं रात्रीं रेडिओवर पं. नेहरूंनीं ही घोषणा केली त्याच दिवशीं मुंबईमध्यें सुमारें २५० ते ३०० संयुक्त महाराष्ट्रवादी कार्यकर्त्यांची धरपकड करून त्यांना तुरुंगामध्यें डांबण्यांत आलें. पण त्यामुळें मुंबईची जनता अधिकच खवळली. सरकारच्या या दडपशाहीचा निषेध म्हणून त्या दिवशीं मुंबईच्या कामगारांनीं संप पुकारला. त्याच रात्रौ मुंबई शहरावर मध्यवर्ती सरकारची हुकुमत लादण्याचा लोकशाहीविरोधी निर्णय जाहीर झाला. या निर्णयाचा निषेध म्हणून पुन्हां दुसऱ्या दिवशीं ता. १७ जानेवारीं रोजीं

मुंबईंतले कामगार संपावर गेले. मुंबईप्रमाणें महाराष्ट्रांतदेखील बेळगांव, पुणें, कोल्हापूर, नाशिक वगैरे अनेक ठिकाणीं संप व हरताळ झाले व सरकारनें बंदुकीच्या गोळ्यांनीं या निदर्शनांना उत्तर दिलें. मुंबई, नाशिक व बेळगांव या ठिकाणीं गोळीबार करण्यांत आला. पहिल्या दोन दिवसांत २० लोकांचे बळी पडले. जनतेवर एवढा मोठा अन्याय झालेला असतांना व सरकार बेजबाबदारपणें व बेछूटपणें वागत असतांना श्री. मामा देवगिरीकरांसारखे कॉंग्रेसचे पुढारी जनतेला निर्विकारपणें विचार करावा असा सल्ला देत होते. प्रक्षुब्ध जनतेला निर्विकारपणें वागण्यास सांगणें म्हणजे मूर्खपणाच होय. एकीकडे श्री. मामांचा हा सल्ला तर दुसरीकडे मुंबई शहरामध्यें कम्युनिस्ट व डॉ. लोहिया यांच्या अनुयायांनीं बेमुदत संपाची घोषणा केली होती.

वस्तुतः १६ जानेवारीनंतर महाराष्ट्रांत जें वातावरण निर्माण झालें होतें, त्यामधून मार्ग काढणें हें फार कठिण काम होतें. याप्रसंगीं घिसाडघाई करून ठरीव ठशाच्या घोषणा करणाऱ्यांनीं आपल्या राजकीय अदूरदृष्टीचेंच प्रदर्शन केलें. कारण मुंबईला जो संप सुरू झाला त्याचें स्वरूप नेहमीप्रमाणें सामान्य राहिलें नाहीं. या संपाच्या वातावरणाचा फायदा घेऊन कांहीं गुंडांनीं लुटालूट व जाळपोळ सुरू केली. प्रामुख्यानें गुजराथी लोकांच्या दुकानांवर हल्ले झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या आड मुंबईमधील बडे भांडवलदार येत आहेत व ते प्रामुख्यानें गुजराथी आहेत म्हणून या लढ्याला मराठी विरुद्ध गुजराथी असें विकृत स्वरूप येण्याचा धोका होता. त्यांत श्री. ल. ग. थत्ते यांच्यासारख्या अतिरेकी लोकांनीं तसा प्रचारहि केला होता. शिवाय कॉंग्रेसचे कांहीं पुढारी व मुंबईमधील भांडवलदारी वृत्तपत्रें महाराष्ट्राची मुद्दाम बदनामी करण्यासाठीं खोट्यानाट्या बातम्या प्रसृत करीत होती. मराठी लोक हे गुंड व बदमाश आहेत, त्यांनीं गुजराथी स्त्रियांच्यावर अत्याचार केले असा धादांत खोटा प्रचार या वृत्तपत्रांनीं चालविला होता. तेव्हां या विरोधी प्रचारापासून महाराष्ट्राची चळवळ शांततेनें व शिस्तीनें चालली पाहिजे आणि कोणत्याहि परिस्थितींत तिला गुजराथी लोकांच्या द्वेषाचें स्वरूप येतां कामा नये असा प्रजा सोशलिस्ट पक्षाचा प्रथमपासून आग्रह होता. म्हणून त्यांनीं कम्युनिस्ट व लोहियावादी लोकांनीं केलेल्या बेमुदत सार्वत्रिक संपाच्या घोषणेला पाठिंबा दिला नाहीं. अशा संपामुळें मुंबईमधील गुंडांचें फावेल व ते हिंसेचा व लुटालुटीचा आश्रय घेतील, गुजराथी लोकांत घबराट निर्माण होईल व म्हणून सार्वत्रिक संपाचा आग्रह धरतां कामा नये असें प्रजा सोशालिस्ट पक्षाचें म्हणणें होतें. पण दुर्दैवानें कम्युनिस्ट व

लोहियावादी लोकांना हा सल्ला मानवला नाहीं. परिणामतः ता. १६ जानेवारीपासून कांहीं दिवस मुंबईतलें वातावरण अत्यंत प्रक्षुब्ध झालें. १६ जानेवारी नंतर मुंबई शहरांत जिकडे तिकडे पोलिसांचा सुळसुळाट झाला. बेछूटपणें गोळीबार सुरू झाले. एकूण आठ दहा दिवसांत ४५० चे वर गोळीबार झाले व त्यांत १०० च्या वर माणसें मृत्यूमुखीं पडलीं. हे गोळीबार आकसानें व सूड्बुद्धीनें केले होतें असें म्हणण्यास भरपूर जागा आहे. केवळ जमावाला पांगविण्यासाठीं पोलीस जेव्हां गोळीबाराचा उपयोग करतात तेव्हां ते कमरेखालीं गोळ्या मारतात; पण मुंबईच्या या गोळीबारांत तर कित्येक ठिकाणीं लोकांच्या छातींत व डोक्यावर गोळ्या मारण्यांत आल्या. गॅलरीमधून पहाणाऱ्या लोकांना, घरांत जेवत बसलेल्यांना, वृद्धांना व अर्भकांनाहि या बेछूट गोळीबाराचा प्रसाद मिळाला. या दडपशाहीमुळें परिस्थिति कांबूत येण्याऐवजीं अधिकच प्रक्षुब्ध झाली. पोलिसांवर कांहीं ठिकाणीं लोकांनीं हल्ले केले. कित्येक ठिकाणीं बसेसवर हल्ले झाले व कांहीं ठिकाणीं लुटालुटीचे व जाळपोळीचे अनिष्ट प्रकार घडले. मुंबईमधील सार्वत्रिक संपाला जरी प्रजा सोशालिस्ट पक्षाचा विरोध होता तरी महाराष्ट्रावर झालेला अन्याय मुकाट्यानें सहन करण्यास ते तयार नव्हते. उलट जनतेमधील असंतोषाला व प्रक्षोभाला योग्य वळण लावावें अशी प्रजा सोशालिस्ट पक्षाची इच्छा होती. संयुक्त महाराष्ट्र परिषदेकडून ती अपेक्षा पुरी होणें आतां अशक्य होतें. कॉंग्रेसनें महाराष्ट्राचा विश्वासघात केल्यामुळें कॉंग्रेसपुढाऱ्यांना व मंत्र्यांना जनतेसमोर येणें अशक्य झालें होतें. लोहियावादी व कम्युनिस्टांनीं सार्वत्रिक संपाचा डोंब उसळून दिला. पण नंतर ते जनतेला समजावण्यास पुढें येईनात. अशा वेळीं या परिस्थितीचा विचार करण्यासाठीं ता. १७ व १८ जानेवारी रोजीं मुंबई, महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या चारहि मराठी विभागांतील प्रजासोशालिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांची एक बैठक मुंबईला भरली. या बैठकींत संयुक्त महाराष्ट्राचें ध्येय साध्य करण्यासाठीं व आंदोलनाला योग्य वळण देण्यासाठीं पुढील पांच कलमी योजना आंखण्यांत आली:

(१) सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यासाठीं सर्व संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनीं विधिमंडळ, पार्लमेंट, स्थानिक स्वराज्य संस्था वगैरे ठिकाणच्या आपापल्या जागांचे राजिनामे द्यावेत.

(२) असहकाराची चळवळ हातीं घ्यावी.

(३) शांततामय सत्याग्रह.

(४) योग्य वेळीं संप व हरताळ.

(५) मुंबई व महाराष्ट्रांतील अल्पभाषिक नागरिकांना संपूर्ण संरक्षण देण्याचे प्रयत्न व आश्वासन.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेची बैठक ता. २० जानेवारी रोजीं भरणार होती. परिषदेनें हा कार्यक्रम स्वीकारावा म्हणून प्रजा सोशालिस्ट पक्षानें खटपट करावी व तें न जमल्यास पक्षानें इतरांच्या सहकार्यानें हा कार्यक्रम पार पाडावा असें ठरलें. या निर्णयानुसार साथी एस्. एम्. जोशी आदि मुंबई विधानसभेंतील नऊ प्रजा सोशालिस्ट सदस्यांनीं आपापल्या जागांचे राजिनामे दिले.

एका बाजूला राजिनामे देऊन प्रजा सोशालिस्ट पक्षाच्या लोकांनीं असहकाराच्या चळवळीला प्रारंभ केला तर त्याबरोबर दुसऱ्या बाजूला मुंबई शहरामधलें प्रक्षुब्ध वातावरण शांत करण्याचें व गुजराथी आणि मराठी लोकांमधील कटुपणा नाहींसा करून तेथें सलोख्याचें वातावरण निर्माण करण्याचें काम त्यांनीं अंगावर घेतलें. साथी एस्. एम्. जोशी यांच्या नेतृत्वाखालीं पक्षाचे कार्यकर्ते व राष्ट्र सेवा दलाचे सैनिक सर्व मुंबई शहरभर तसा प्रयत्न करूं लागले. साथी एस्. एम्. नीं तर यासाठीं आपल्या प्राणाची देखील पर्वा केली नाहीं. ता. १८ जानेवारी रोजीं प्रक्षुब्ध जमाव एका पोलिस अधिकाऱ्यावर चाल करून जात होता तेव्हां त्यांनीं आपलें प्राण धोक्यांत घालून या अधिकाऱ्याचें रक्षण केलें. दादरला गुजराथी व्यापाऱ्याचें दुकान लुटण्यासाठीं जमलेल्या एका खवळलेल्या समुदायापुढें ते निर्भयपणें उभे राहिले व त्यांनीं जमावाला बजावलें कीं, "तुम्हांला दुकान लुटण्यापूर्वीं माझ्या प्रेतावरून जावें लागेल." वरील उद्गार ऐकतांच जादूची कांडी फिरावी त्याप्रमाणें बेफाम झालेला जमाव शांत झाला व तेथून परतला. साथी एसेमच्या या अग्निदिव्यानें संयुक्त महाराष्ट्र चळवळींतील निदर्शकांना मार्गदर्शन तर केलेंच पण अपप्रचार करणाऱ्या विरोधकांनाहि चोख उत्तर दिलें. साथी एस्. एम्. जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनीं यावेळीं गुजराथी वस्तीमध्यें फिरून अनेक ठिकाणीं सभा घेऊन त्यांच्यामध्यें विश्वासाचें वातावरण निर्माण करण्याचा प्रय-न केला.

महाराष्ट्रांतील वातावरण इतकें प्रक्षुब्ध असतांना पुण्याला ता. १९ जानेवारी रोजीं महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची बैठक भरली होती. या बैठकीवर सुमारें १०,००० नागरिकांचा एक प्रचंड मोर्चा नेण्यांत आला व महाराष्ट्रांतील कॉंग्रेस आमदारांनीं विधिमंडळाचे राजिनामे द्यावेत अशी मागणी करण्यांत आली. श्री. भाऊसाहेब हिरे व श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं, आम्ही जनतेच्या भावना लक्षांत घेऊन योग्य तो निर्णय घेऊं असें अभिवचन दिल्यावर मोर्चा परत गेला.

कॉंग्रेस कमिटीनें राजिनामे देण्यास वर्किंग कमिटीनें परवानगी द्यावी, अशा आशयाचा ठराव पास केला. या बैठकीमध्येंदेखील कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं मोठी वीरश्रीयुक्त भाषणें केलीं. श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं देशी वसाहतवादाविरुद्ध लढण्याचा आपला निर्धार जाहीर केला. पण हा त्यांचा निर्धार म्हणजे नुसती तोंडची वाफच ठरली. वर्किंग कमिटीकडे तिच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठीं राजिनामे देण्याची परवानगी मागण्याचा हा कॉंग्रेसवाल्यांचा पवित्रा म्हणजे शुद्ध फसवणूक होती. अर्थातच वर्किंग कमिटीनें राजिनामे देण्यास परवानगी नाकारली व ता. २८ जानेवारी रोजीं महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें वर्किंग कमिटीचा हा निर्णय शिरसावंद्य मानून सर्व कॉंग्रेसजनाना संयुक्त महाराष्ट्र परिषदेमधून बाहेर पडण्याचा आदेश दिला.

मध्यंतरींच्या काळांत साथी एस्. एम्. जोशी यांनीं राजिनामे देण्यासंबंधीं केलेल्या आवाहनाला पुष्कळच पाठिंबा मिळाला. मुंबई विधानसभेंतील डॉ. नरवणे व त्यांच्या पांच सहकाऱ्यांनीं राजिनामे दिले. शे. का. पक्षाच्या व श्री. नौशेर भरूचासारख्या स्वतंत्र आमदारांनीं राजिनामे दिले. मुंबई कॉर्पोरेशनमधील प्रजा सोशालिस्ट पक्षाच्या व कॉंग्रेस-जन परिषदेच्या सदस्यांनीं राजिनामे दिले. पुणें कॉर्पोरेशनच्या सर्व सदस्यांनीं राजिनामे दिले. महाराष्ट्रांतील अनेक नगर-पालिका, ग्रामपंचायती व लोकलबोर्डांतील संयुक्त महाराष्ट्रवादी सदस्यांनीं राजिनामे देऊन असहकाराच्या चळवळीला धार आणली.

१९५६ च्या जानेवारी महिन्यांतला शेवटच्या पंधरवड्यांत महाराष्ट्रांत एक प्रकारच्या निर्नायकीचें व भयानक प्रक्षुब्धतेचें वातावरण पसरलें होतें. कॉंग्रेसनें संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामधून अंग काढून घेतलें. त्यामुळें त्यांचें जनते-मधील स्थान जवळ जवळ नष्ट झालें. कम्युनिस्ट व लोहियावादी यांनीं सार्वत्रिक संपाची घोषणा केली; पण परिस्थिति कांबूत ठेवण्याची किंवा तिला योग्य वळण देण्याची शक्ति त्यांच्यांत राहिली नाहीं. प्रजा सोशलिस्ट पक्षानें असहकाराचा मार्ग दाखविला होता. पण सर्व महाराष्ट्रीय जनतेला संघटित करण्याची किंवा एकट्यानें आंदोलन चालविण्याइतकी शक्ति या पक्षाजवळ नव्हती. शिवाय विरोधकांनीं जनतेला प्रक्षुब्ध करण्याचें धोरण चालूच ठेवलें होतें पोलिसाच्या गोळीबाराच्या जोडीला श्री. स. का. पाटील यांनीं 'शांति सेना' नांवाची एक संघटना उभारली होती. या संघटनेचा व शांततेचा काहींच संबंध नव्हता. शांतिसेनेच्या नांवाखाली श्री. स. का. पाटलांनीं गुंडाची टोळी संघटित केली होती. याच शांतिसेनेपैकीं कुप्रसिद्ध वाडीलाल पांचाळ यानें आत्मरक्षणाच्या

नांवाखालीं एका तरुणावर गोळीबार केला. शांतिसेनेप्रमाणें काँग्रेस पुढाऱ्यांपैकीं कांहीं लोकदेखील चिथावणीची भाषा वापरीत होते. श्री. के. के. शहा यांनीं एका गुजराथी लोकांच्या सभेंत असें सांगितल्याचें समजतें कीं, 'गुंडगिरीला तोंड त्याच मार्गानें दिलें पाहिजे'. कांहीं गुजराथी वृत्तपत्रांनीं खोट्या बातम्या प्रसृत करून मराठी व गुजराथी लोकांमधील वितुष्ट अधिकच वाढविण्याचा प्रयत्न केला. असल्या विपर्यस्त बातम्या प्रसृत करणाऱ्या वृत्तपत्रांची सरकारनें कोणतीहि दखल घेतली नाहीं. उलट श्री. मोरारजी देसाई यांच्यासारख्या जबाबदार काँग्रेस पुढाऱ्यांनीं, 'महाराष्ट्रीयांनीं गुजराथी स्त्रियांवर अत्याचार केले' असे खोटेनाटे आरोप केले. मुंबईविधानसभेमध्यें श्री. बी. सी. कांबळे यांनीं अत्याचारासंबंधीं सविस्तर माहिती द्या अशी जेव्हां मागणी केली तेव्हां श्री. मोरारजीभाईंना कांहींच उत्तर देतां आलें नाहीं. साथी एस्. एम्. जोशी यांनीं या आरोपांची चौकशी करा व एकाहि महाराष्ट्रीयानें या आंदोलनामध्यें गुजराथी स्त्रियांवर अत्याचार केले आहेत असें सिद्ध झाल्यास आपण स्वतः फासावर जाण्यास तयार आहोंत असें आव्हान दिलें. पण ही चौकशी करण्यास किंवा तें आव्हान स्वीकारण्यास सरकारनें नकार दिला. तरीहि मुंबई विधान-सभेच्या सभापतींच्या पत्नी सौ. वत्सलाबाई कुंटे व मुंबई उपनगरांतील एक सुप्रसिद्ध डॉक्टर सौ. काशीताई अवसरे यांनीं अनेक गुजराथी स्त्रियांच्या व कुटुंबांच्या मुलाखती घेऊन असें सिद्ध केलें कीं, हे आरोप संपूर्णपणें निराधार व खोडसाळपणाचे आहेत.

### *संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना*

जानेवारी महिन्यांत झालेल्या या घटनांचें व प्रचारतंत्राचें थोड्या विस्तारानें अशासाठीं वर्णन केलें आहे कीं, या परिस्थितींत महाराष्ट्राला मार्गदर्शन करणें किंवा आंदोलनाला योग्य वळण लावणें हें किती कठिण काम होतें तें वाचकांच्या लक्षांत यावें. विशेषतः साथी एस्. एम्. जोशी यांच्याकडे नेतृत्वासाठीं सर्वांचे डोळे लागून राहिले होते. ता. २८ जानेवारी रोजीं महाराष्ट्र प्रजा सोशालिस्ट पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक भरली होती. या बैठकींत एकमतानें श्री. एस्. एम्. जोशी यांना अशी आग्रहाची विनंति केली गेली कीं, त्यांनीं पुढाकार घेऊन सर्व संयुक्त महाराष्ट्रवाद्यांची एक बैठक बोलाविण्यासंबंधींचा टाणें अधिवे-शनांतील ठराव अंमलांत आणावा. दुसऱ्याच दिवशीं म्हणजे ता. २९ जानेवारी रोजीं पुणें येथें भरलेल्या एका संयुक्त महाराष्ट्रवादी नागरिकांच्या परिषदेनें-

देखील साथी एस्. एम्. जोशी यांना हीच विनंति केली व त्या विनंतीला मान देऊन साथी एस्. एम्. जोशी यांनीं ६ फेब्रुवारी रोजीं महाराष्ट्रांतल्या सर्व संयुक्त महाराष्ट्रवादी पक्षांची व स्वतंत्र व्यक्तींची एक परिषद बोलाविली.

६ फेब्रुवारी १९५६ रोजीं भरलेल्या या परिषदेचें संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्यें फार महत्त्वाचें स्थान आहे. संयुक्त महाराष्ट्राचें आंदोलन आतापर्यंत दोन अवस्थेमधून गेलें होतें. पहिली अवस्था होती निवेदनाची व यासाठीं सर्व पक्षीय संयुक्त महाराष्ट्र परिषद भरविली होती व तिचें नेतृत्व श्री. शंकरराव देव व श्री. भाऊसाहेब हिरे यांचेकडे होतें. दुसऱ्या अवस्थेमध्यें महाराष्ट्रांत सर्वत्र सरकारी धोरणाचा निषेध झाला. पण तो संघटित नव्हता. कॉंग्रेसनें महाराष्ट्राचा घात केल्यामुळें एक प्रकारची निर्नायकी महाराष्ट्रामध्यें निर्माण झाली होती. महाराष्ट्राच्या अस्मितेला तडाखा बसला होता. लोकांमध्यें एक प्रकारचें हवालदील-पणाचें वातावरण निर्माण झालें होतें. ज्या कॉंग्रेस पुढाऱ्यांवर आपण विश्वास ठेवला त्यांनीं ऐनवेळीं आपल्याला धोका दिला, आतां महाराष्ट्रावरील अन्यायाचें निराकरण कसें होणार, महाराष्ट्रापुढें कांहीं रस्ता आहे किंवा नाहीं या भावनेनें महाराष्ट्राला ग्रासलें होतें. अशा बिकट परिस्थितींत ता. ६ फेब्रुवारीची परिषद भरली होती. या परिषदेला महाराष्ट्रांतून सुमारे ५०० प्रतिनिधि आले होते. प्र. सो. पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, लाल निशाण गट, लोहियावादी गट, शे. का. पक्ष, हिंदू सभा, जनसंघ वगैरे पक्षांचे प्रतिनिधि तसेंच नौशेर भरुचा, विजयसिंहराव डफळे, बाबूराव गोखले, वगैरे स्वतंत्र प्रवृत्तीचे अनेक पुढारी आले होते. श्री. केशवराव जेधे हे कॉंग्रेसमध्यें असूनहि त्यांनीं या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचा बाणेदारपणा दाखविला होता. श्री. धनंजयराव गाडगीळांनीं परिषदेला आपला पाठिंबा व्यक्त केला होता.

या परिषदेपुढें मुख्य कार्य होतें तें संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्यें एक-सूत्रीपणा निर्माण करण्याचें; या आंदोलनामध्यें शिस्त व मध्यवर्ती नियंत्रण आणण्याचें. या परिषदेच्याअगोदर महाराष्ट्रांतले विविध गट व पक्ष आपापल्या परीनें चळवळ करीत होते. कांहीं लोक भूमिगत झाले होते. तर लोहियावादी व कम्युनिस्ट यांनीं मिळून पुण्यास एक सत्याग्रही मोर्चा उभारला होता. ता. ३० जानेवारी रोजीं या मोर्चाच्या पहिल्या तुकडीनें सत्याग्रह केला होता. अशा परि-स्थितींत पुढें पाऊल कसें टाकावयाचें तें ठरविणें मोठें अवघड काम होतें. या परिषदेंत विभिन्न पक्षांचे लोक आपल्याच धोरणाचा हेका धरून बसले होते. लोहियावादी व कम्युनिस्ट हे तावडतोब ‘ प्रचंड ’ प्रमाणावर सत्याग्रह करावा असें

म्हणत होते. परंतु साथी एस्. एम्. जोशी व त्यांचे प्रजासमाजवादी सहकारी यांची भूमिका थोडी वेगळी होती. सत्याग्रहाला त्यांचा विरोध नव्हता. पण सत्याग्रहाच्या तंत्राप्रमाणें आपला प्रश्न सोडविण्याचा मार्ग आपण प्रतिपक्षास दाखविला पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. राज्यपुनर्रचनेचा हा प्रश्न राष्ट्रीय स्वरूपाचा आहे व म्हणून त्या प्रश्नाचा विचार करून त्यामधून मार्ग काढण्यासाठीं पंतप्रधान पं. नेहरू यांनीं विविध दृष्टिकोन धारण करणाऱ्या पक्षांची, गटांची व प्रमुख व्यक्तींची एक परिषद बोलवावी असा आपण आग्रह धरावा व ठराविक मुदतींत पं. नेहरूंनीं अशी परिषद न बोलाविल्यास आपण सत्याग्रह करावा असा साथी एस्. एम्. जोशी यांचा दृष्टिकोन होता. लोहियावाद्यांना व कम्युनिस्टांना तो पसंत नव्हता. त्यांच्या मतें हें धोरण मिळमिळीतपणाचें होतें. पण आपल्या मागणीची न्याय्यता अपक्ष लोकांना पटविण्यासाठीं हेंच धोरण योग्य होतें असा एस्. एम्. जोशी यांचा आग्रह होता. शेवटीं इतरांनीं त्यांचा दृष्टिकोन कबूल केला. या परिषदेनें मंजूर केलेले महत्त्वाचे निर्णय हा संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा पाया आहे. म्हणून त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें पाहिजे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची तीन मुख्य पथ्यें असल्याचें साथी एस्. एम्. जोशी यांनीं जाहीर केलें. (१) या आंदोलनामध्यें राष्ट्रीय ऐक्याला विघातक असें कोणतेंहि कृत्य होतां कामा नये. (२) हें आंदोलन गुजराथी लोकांच्या विरुद्ध नाहीं व महाराष्ट्रांत सर्व अल्पभाषिक गटांना संपूर्ण संरक्षणाची हमी दिली पाहिजे. (३) आंदोलन पूर्णपणें उघड रीतीनें, शांततेनें व लोकशाही मार्गानें चालविलें पाहिजे. हीं तीन पथ्यें जाहीर करून जे कोणी भूमिगत गेले होते त्यांना बाहेर येण्याचें त्यांनीं आवाहन केलें. या परिषदेमध्यें मुंबईच्या गोळीबारांत निधन पावलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजलि अर्पण करणाऱ्या ठरावाबरो-बरच आंदोलनामध्यें झालेल्या हिंसेबद्दल नापसंति व्यक्त करणारा व कोणत्याहि परिस्थितींत हिंसक कृत्यें समर्थनीय ठरणार नाहींत व पोलिसांनीं कितीहि प्रक्षुब्ध केलें तरी जनतेनें हिंसा करतां कामा नये असा स्पष्ट नीतिनियम घालून देणारा ठरावहि मंजूर केला. परिषदेनें मुख्य ठरावान्वयें संयुक्त महाराष्ट्राची मागणी करून त्यासाठीं गोलमेज परिषद बोलविण्याची विनंति पं. नेहरूंना केली व ती विनंति मान्य न केल्यास सत्याग्रहाचें आंदोलन सुरू करण्याचा पुकारा केला. लढ्याला एकमुखी नेतृत्व व मार्गदर्शन करण्यासाठीं साथी एस्. एम्. जोशी यांच्या नेतृत्वाखालीं एक कृति समिति नेमण्यांत आली.

या परिषदेमध्यें निर्माण झालेल्या संघटनेला काय नांव द्यावें यासंबंधीं थोडें

बादळ माजलेंच. श्री. शंकरराव देव हे संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे सर्वाधिकारी होते व त्यांनीं परिषदेचें नांव वापरण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं असा एक फतवा काढला. कांहीं लोक असें म्हणत होतें कीं, तेंच नांव आपण घ्यावें. तें नांव कांहीं श्री. शंकरराव देवांच्या मालकीचें नाहीं, पण श्री. एस्. एम्. जोशी यांनीं आपल्या सौजन्यशील स्वभावाला धरून त्याच नांवाबद्दल खळखळ न करतां आपल्या संघटनेला संयुक्त महाराष्ट्र समिति असें नांव सुचविलें व अशा रीतीनें संयुक्त महाराष्ट्र समितीचा जन्म झाला.

### *सत्याग्रहाचा लढा*

समितीची स्थापना झाल्यानंतर थोड्याच दिवसांत म्हणजे ता. १२ व १३ फेब्रुवारी रोजीं कोइमतूर येथें आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखालीं प्रजा सोशालिस्ट पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. प्रजा सोशालिस्ट पार्टी-मधील कांहीं पुढारी भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला संकुचित मानणारे होते. पण आचार्यजींनीं या बैठकीमध्यें भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाचा व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा शास्त्रशुद्ध रीतीनें पुरस्कार केला. राष्ट्रीय कार्य-कारिणीनें देखील पं. नेहरूंना या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठीं एक गोलमेज परिषद भरविण्याची विनंति केली. तोपर्यंत या प्रश्नावर कोणीहि प्रत्यक्ष प्रतिका-राची मोहीम सुरूं करूं नये असें सर्व पक्षांना आवाहन केलें. समितीनें घेतलेल्या भूमिकेंत व या ठरावांत पुष्कळच साम्य होतें. समितीनें देखील पं. नेहरूंना पत्र पाठवून एक महिन्याच्या आंत गोलमेज परिषद भरविण्याची सूचना केली होती. आचार्य नरेंद्र देव यांची स्वतःची या प्रश्नांत जातीनें लक्ष घालण्याची इच्छा होती. पण ते स्वतः आजारी असल्यामुळें त्यांनीं साथी जयप्रकाश नारायण यांना एक पत्र पाठवून पंडितजींना भेटण्याची व गोलमेज परिषद बोलविण्यासाठीं त्यांचें मन वळविण्याची विनंति केली होती.

मध्यंतरीं दुर्दैवानें आचार्यजींचा अंत झाला. तरीदेखील त्याच्या इच्छेला मान देऊन श्री. जयप्रकाशजींनीं पं. नेहरूंची भेट घेण्याचें ठरविलें व ता. १२ मार्च १९५६ रोजीं ते नेहरूंना भेटले. आपल्या भेटींत त्यांनीं महाराष्ट्राच्या मागणीची न्याय्यता पं. नेहरूंना पटवून देण्याचा प्रयत्न केला व या प्रश्नासाठीं गोलमेज परिषद बोलाविण्याची सूचना केली. पण पं. नेहरूंनीं ती सूचना अमान्य केली. तेव्हां निदान महाराष्ट्रांतल्या विरोधी पक्षांच्या लोकांना बोलावून त्यांची बाजू पं. नेहरूंनीं समजावून घ्यावी असें साथी जयप्रकाशजींनीं सुचविलें. पं. नेहरूंनीं

ही सूचना मान्य केल्याचें कळतें. पण प्रत्यक्षांत मात्र त्यांनीं हें आश्वासन कधींच अंमलांत आणलें नाहीं. अशा तऱ्हेनें वाटाघाटीनें किंवा परस्परविचारविनिमयानें हा प्रश्न सुटण्याचे सर्व मार्ग खुंटले तेव्हां समितीसमोर सत्याग्रहाखेरीज अन्य रस्ताच राहिला नाहीं.

## *बेळगांवची आघाडी*

संयुक्त महाराष्ट्राच्या सत्याग्रहाचें पहिलें रणशिंग बेळगांव येथें फुंकलें गेलें. बेळगांव, कारवार, निपाणी वगैरे मुलूख महाराष्ट्रांत सामील व्हावा म्हणून तेथें महाराष्ट्र एकीकरण समिति नांवाची संघटना बरेच दिवसांपासून काम करीत आहे. या संघटनेमार्फत सरकारकडे शिष्टमंडळें पाठविण्यांत आलीं. भाषा, इतिहास, भूगोल वगैरे सर्व दृष्टीनें हा भाग महाराष्ट्रांत घातला गेला पाहिजे ही गोष्ट त्यांनीं सिद्ध केली. पण मध्यवर्ति सरकारला तर्कापेक्षा किंवा न्यायापेक्षां आपले हेतु साध्य करावयाचे होते. मुंबईच्या भांडवलदारांच्या दडपणामुळें मुंबई शहराचा महाराष्ट्रांत समावेश करण्याचें त्यांनीं नाकारलें होतें व हा प्रश्न मुंबई विधानसभेमध्यें चर्चेला येईल तेव्हां कानडी आमदारांचा सरकारी धोरणाला पाठिंबा मिळविण्यासाठीं बेळगांवची जणूं लांचच त्यांना देण्यांत आली. एरवीं मुंबईच्या भवितव्यासंबंधीं कानडी लोकांनीं चिंता वाहण्याचें कांहीं कारण नव्हतें. अशा तऱ्हेनें इंग्रजांची साम्राज्यशाही नीति वापरून कॉंग्रेसश्रेष्ठींनीं बेळगांव कारवार वगैरे भाग अन्यायानें महाराष्ट्रापासून तोडून तो कर्नाटकांत सामील केला होता. पण बेळगांवच्या जनतेनें या अन्यायाला विरोध करण्याचें ठरविलें होतें. या अन्यायाचा निषेध म्हणून बेळगांव नगरपालिकेवर काळें निशाण लावण्याचा निर्णय घेण्यांत आला होता. हजारों लोक सत्याग्रह करण्यास तयार होते व ९ मार्च रोजीं केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखालीं पहिल्या तुकडीनें बेळगांव येथें सत्याग्रह केला. या सत्याग्रहाचें वेळीं शहरामध्यें १४४ कलम व सभाबंदी जारी केली होती; तरी शहराचे बाहेर चार मैलावर झालेल्या सभेला दहा हजारांच्यावर लोक हजर होते.

## *महाराष्ट्रांतील अभूतपूर्व संग्राम*

बेळगांवच्या पहिल्या सत्याग्रहानंतर महाराष्ट्रभर सत्याग्रहाचें आंदोलन ता. १६ मार्च १९५६ रोजीं सुरू झालें. या दिवशीं महाराष्ट्रभर अनेक ठिकाणीं निरनिराळ्या तुकड्यांनीं सत्याग्रह केला. बेळगांवच्या व पुण्याच्या पहिल्या तुकड्यांना

दोन किंवा तीन महिन्यांच्या शिक्षा ठोठावण्यांस आल्या. पण जबर शिक्षा दिल्यानें कांहीं सत्याग्रहाची तीव्रता कमी झाली नाहीं. दररोज नवनवे सत्याग्रही पुढें येऊं लागले. शेतीच्या मशागतीचे दिवस असतांना खेडोपाडीचे शेतकरी देखील मोठ्या संख्येनें पुढें येऊ लागले. राष्ट्रीय चळवळीपेक्षांहि अभूतपूर्व व व्यापक प्रमाणावर हा सत्याग्रह झाला. मराठवाड्यांत व विदर्भांतहि सत्याग्रहाचें लोण पोहोंचलें. परंतु पश्चिम महाराष्ट्राच्या बारा जिल्ह्यांत सत्याग्रहाची तीव्रता जितकी प्रखर होती व हा लढा जितका खेडोपाडीं पोहोंचला होता. त्यामानानें मराठवाडा व विदर्भ या भागांतील लढ्याचें स्वरूप कमी होतें. महाराष्ट्रामध्यें १६ मार्चपासून १ ऑगस्टपर्यंत सत्याग्रहाचा जोर सारखा वाढतच होता. या साडेचार महिन्यांच्या काळांत सुमारें ७५००० लोकांनीं सत्याग्रहामध्यें भाग घेतला. एकेका तालुक्यांतून ५०० चे वर सत्याग्रही आले. असे कितीतरी तालुके होते. ज्या भागांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचे चळवळींत देखील फारसे सत्याग्रही गेले नव्हते अशा भागांतूनदेखील शेकडों सत्याग्रही आले होते. या सत्याग्रहाचें वैशिष्ट्य म्हणजे स्त्रियांनीं या लढ्यांत बजाविलेली कामगिरी. पांढरपेशा स्त्रियांप्रमाणें श्रमजीवि व शेतकरी वर्गांतील स्त्रियांनींहि मोठ्या संख्येनें सत्याग्रहांमध्यें भाग घेतला. इतकेंच काय पण सातारा कोल्हापूरकडील घरंदाज घराण्यांतील स्त्रिया—ज्यांचें नखहि एरवी कोणास दिसत नाहीं—महाराष्ट्राच्या आस्थेनें रक्षण करण्यासाटीं पुढें सरसावल्या.

६५४३

### *सत्याग्रहाचे विरोधक*

महाराष्ट्रीय जनतेनें सत्याग्रहाला एवढा व्यापक पाठिंबा दिला तरी या सत्याग्रहाला विविध भूमिकेवरून विरोध करणारे अनेक विरोधक होते. महाराष्ट्रांतले कॉंग्रेस पुढारी, नेहरूंवर विश्वास ठेऊन राहा म्हणजे सर्व कांहीं होईल असा दैववादी हवाला देत होते. तर श्री. यशवंतराव चव्हाणासारखे मुत्सद्दी लोकशाहीमध्यें सत्याग्रहाला स्थान नाहीं असा 'तात्त्विक' विरोध करीत होते. श्री. शंकरराव देव हे स्वतःला सत्याग्रह शास्त्राचे आचार्य समजत असल्यामुळें व ते या सत्याग्रहामध्यें नसल्यामुळें त्यांचा या सत्याग्रहाला विरोध होता. तर श्री. रावसाहेब पटवर्धनांसारखे कांहीं मित्र या लढ्यांतून मराठी विरुद्ध गुजराथी अशा भाषिक विद्वेषाच्या भावना भडकतील म्हणून विरोध करीत होते. परंतु या सर्वांचा विरोध निराधार होता. सत्याग्रहाला किंबहुना महाराष्ट्राच्या आंदोलनाला गुजराथी विरोधाचें स्वरूप येऊं नये म्हणून समितीचे नेते व विशेषतः साथी एस्. एम्.

जोशी हे विशेष जपत होते. उलट त्यांचें म्हणणें असें होतें कीं, मराठी जनतेच्या मनांतील असंतोषाला व प्रक्षोभाला योग्य वळण लावण्याचें सामर्थ्य सत्याग्रहाखेरीज अन्य कशांतहि नाहीं व या गोष्टीचें प्रत्यंतर मुंबई शहरांत आलें. जानेवारी महिन्यांत मुंबई शहरांत जे प्रकार झाले होते ते लक्षांत घेतां, मुंबईमध्यें सत्याग्रह सुरू करावा किंवा नाहीं याबद्दल समितीच्या नेत्यांचीं मनें शंकाकुल होती. पण ता. २७ मार्चपासून मुंबईमध्यें सत्याग्रहाच्या वेळची शिस्त व शांतता पाहून या सर्व शंका नष्ट झाल्या. या सत्याग्रहामुळें मराठी जनतेमध्यें एक नवचैतन्य निर्माण झालें. मध्यंतरीं आलेली हवालदीलपणाची भावना नष्ट झाली. आपण अन्यायाचा प्रतिकार करूं शकतों ही स्वाभिमानाची व पौरुषाची भावना दृढ झाली. या सत्याग्रहामुळें महाराष्ट्रामधील प्रतिकारशक्तीचें व अस्मितेचें रक्षण करून सुदृढ लोकशाहीचा पाया घातला. आणि सत्याग्रहासंबंधीं विरोधकांच्या सर्व शंका पार खोट्या पाडल्या.

## *आंदोलनाचीं वैशिष्ट्यें*

सत्याग्रह आंदोलनामधील दोन तीन ठळक घटनांचें थोडक्यांत वर्णन करणें जरूर आहे. सत्याग्रह सुरूं झाल्यापासून पहिल्या पंधरा दिवसांतच नुसत्या बेळगांव जिल्ह्यांत ५०० चे वर व महाराष्ट्रांमधून २०,०० चे वर स्वयंसेवकांनीं सत्याग्रहांत भाग घेतला. सत्याग्रहाचें आंदोलन सुरूं झाल्यावर राज्यपुर्नरचना बिल ता. २७ मार्च रोजीं मुंबई विधानसभेमध्यें मांडण्यांत आलें व तेथें तीन घटकांची योजना मंजूर करून घेण्यांत आली. या वेळेस श्री. भाऊसाहेब हिरे यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूनें भाषण केलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मात्र कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील १६ आमदारांनीं बिलाच्या विरोधी मतदान केलें. ता. २७ एप्रिल रोजीं हें बिल लोकसभेंत चर्चेसाठीं आलें पण दुर्दैवानें महाराष्ट्राची न्याय्य बाजू मांडणारे तेथें कोणीच नव्हते. परंतु आंत जरी कोणी नसले तरी महाराष्ट्रांमधून ५० सत्याग्रहींचा एक जथा लोकसभेसमोर सत्याग्रह करण्यासाठीं गेला होता. लोकशाहीमध्यें सत्याचा झेंडा फडकावीत ठेवण्यासाठीं महाराष्ट्राला आत्मक्लेशाचा मार्ग स्वीकारावा लागला. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, अन्यायाचें निवारण करण्यासाठीं गांधीजींनीं भारतीयांच्या हातीं दिलेल्या या अमोल अस्त्राचा पंडित पंतांनीं उपहास केला. सत्तेनें विवेकबुद्धि नष्ट होते म्हणतात तेंच खरें.

महाराष्ट्रावर कॉंग्रेसश्रेष्ठींनीं एवढा मोठा अन्याय केल्यानंतर महाराष्ट्रामध्यें

साहजिकच काँग्रेससंबंधीं लोकमत प्रक्षुब्ध झालें होतें. असें असूनहि ता. २ व ३ जून रोजीं अ. भा. काँग्रेस कमिटीचें अधिवेशन मुंबईमध्यें घेण्याचा निर्णय काँग्रेस पुढाऱ्यांनीं घेतला. वस्तुतः मुंबईसंबंधीं काँग्रेस पुढाऱ्यांनीं जो निर्णय घेतला होता त्यामुळें महाराष्ट्रांतलें वातावरण अगोदरच प्रक्षुब्ध झालें होतें. तशांत ए. आय. सी. सी. ची बैठक मुंबईला घेऊन आगींत तेल ओतण्याचें हें काम काँग्रेस पुढाऱ्यांनीं कां केलें तें समजत नाहीं. ए. आय्. सी. सी. च्या बैठकीच्या वेळीं महाराष्ट्रीय लोक गोंधळ करतील, कदाचित् दंगाधोपाहि करतील व मग सर्व देशांतील लोकमतहि त्यांचेविरुद्ध जाईल अशी अटकळ काँग्रेस पुढाऱ्यांनीं बांधलेली असावी. म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीवर या प्रसंगीं विशेष जबाबदारी होती. मुंबईच्या जनतेनें चिडून ए. आय्. सी. सी. च्या बैठकीच्या जागीं गोंधळ करूं नये यासाठीं व त्याचबरोबर मुंबईच्या जनतेमधील असंतोषाला योग्य वाट करून देईल असा कार्यक्रम आंखणें जरूर होतें. यासाठीं समितीनें दोन कार्यक्रम आखले. ए. आय्. सी. सी. च्या बैठकीच्या वेळीं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठीं एक सर्वपक्षीय परिषद भरवून आणावयाची, संयुक्त महाराष्ट्रवादी जनतेचा एक प्रचंड मेळावा भरवावयाचा व मुंबई शहरामध्यें मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह संघटित करावयाचा असें समितीनें ठरविलें.

या दिवशीं मुंबईमध्यें जो सत्याग्रह झाला तो अभूतपूर्व होता. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यामधून २००० चे वर सत्याग्रही मुंबईला आले होते. त्यांत बेळगांवची १०१ सत्याग्रहींची शेतकरी तुकडी विशेष उठून दिसत होती. खानदेशामधून एक सत्याग्रही तुकडी पायीं प्रवास करीत मुंबईला आली होती. मुंबईमधल्या कार्यकर्त्यांनीं या सर्व लोकांची जी व्यवस्था केली होती त्यांत संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला जनतेचें किती उत्स्फूर्त सहाय्य होतें तें दिसून आलें. निरनिराळे शेकडों लोक बाहेरून आलेल्या सत्याग्रहींची व्यवस्था लावण्यासाठीं व त्यांना मुंबईमध्यें मार्गदर्शन करण्यासाठीं स्वयंस्फूर्तीनें पुढें आले व २००० लोकांचा हा सत्याग्रह अत्यंत शांततेनें पार पडला.

यावेळीं मुंबईच्या जनतेनें देखील आपलें मत संघटितपणें व मोठ्या प्रभावीपणानें व्यक्त केलें. पं. नेहरू ए. आय्. सी. सी. च्या बैठकीसाठीं आले तेव्हां ते जाण्याच्या रस्त्यावर दादरपासून गिरगांवापर्यंत दुतर्फा काळीं निशाणें घेऊन हजारों लोक मूक निषेध व्यक्त करीत उभे होते. पं. नेहरूंना हें दृश्य अगदीं नवखे होतें. पं. नेहरू मुंबईमध्यें असतांना त्यांच्या सभेला जेमतेम ५०००० लोक

हजर होते. तर त्याचवेळीं शिवाजी पार्कवर झालेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या मेळाव्याला दोन लाखावर लोक हजर होते. पंडित नेहरूंच्या सभेसाठीं हजारों पोलीस व चारी बाजूंनीं बांबूचें कुंपण अशी व्यवस्था होती. तर शिवाजी पार्कवर औषधालादेखील पोलीस नव्हते. ए. आय्. सी. सी. च्या दिवशीं समितीनें आंखलेलीं सर्व निदर्शनें अत्यंत शांततेनें व शिस्तीनें पार पडलीं. फक्त मरीन ड्राईव्हवर—जेथें कॉंग्रेस समितीचें अधिवेशन भरलें होतें—थोडे अनिष्ट प्रकार झाले. कांहीं लोकांनीं कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या मोटारींवर दगडफेक केली. सुमारें १०–१५ हजार लोकांचा समुदाय पंडित नेहरूंच्या सभेमध्यें प्रवेश मिळविण्यासाठीं सारखी खटपट करीत होता. तर त्यांना अडविण्यासाठीं शेकडों लाठीधारी पोलीस आपली शिकस्त करीत होते. त्यांनीं लाठीमार व अश्रूधूर यांचाहि उपयोग केला. पण येथें एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे कीं, या दिवशीं मुंबईत जे कांहीं थोडे अतिरेकाचे प्रकार झाले त्यांचा रोख सरकार व कॉंग्रेस यांच्या विरुद्ध होता, गुजराथी लोकांच्या विरुद्ध मुळींच नव्हता.

ए. आय्. सी. सी. च्या वेळीं मुंबईमध्यें झालेली सर्वपक्षीय परिषद् मात्र तितकीशी यशस्वी झाली नाहीं. या परिषदेला महाराष्ट्रांतून सर्वपक्षीय लोक आले होते हें खरें. पण समितीनें सर्व अखिल भारतीय पक्षांना आपापल्या पार्लमेंटमधील सदस्यांना व विविध प्रांतांतील अन्य पुढाऱ्यांना या परिषदेला पाठवावें असें सुचविलें होतें. परंतु श्री. ए. के. गोपालन, श्रीं. वि. घ. देशपांडे, व श्री. एच्. व्ही. कामत हे तिघे सदस्य सोडल्यास अन्य सदस्यांनीं फक्त शुभेच्छा पाठविल्या होत्या. त्यामुळें या परिषदेचा सर्व भारतीयांचा पाठिंबा महाराष्ट्राच्या मागणीला मिळविण्याचा जो मूळ उद्देश होता तो फारसा सफल झाला नाहीं.

जूनच्या मुंबईमधील सत्याग्रहाप्रमाणें ता. २६ जुलै १९५६ रोजीं दिल्ली येथें लोकसभेसमोर २००० महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांनीं केलेल्या सत्याग्रहाला देखील या चळवळीमध्यें महत्त्वपूर्ण स्थान आहे. दिल्लीच्या या सत्याग्रहामध्यें सुमारें ३०० स्त्रिया आल्या होत्या. त्यांच्यापैकीं कांहींजण तर लेकुरवाळ्या होत्या. या निदर्शनाचा परिणाम लोकसभेमधील सदस्यावर जरी कांहीं झाला नाहीं तरी दिल्लीमधील नागरिकांना महाराष्ट्राचें दुःख कांहीं प्रमाणांत दिसून आलें. महाराष्ट्रीय हे गुंड व स्त्रियांवर अत्याचार करणारे आहेत या कॉंग्रेसी प्रचाराला दिल्लीच्या सत्याग्रहानें चांगलेंच उत्तर दिलें. इतक्या स्त्रिया व मुलेबाळें हजारों मैलांचें अंतर तोडून येथें येतात त्याअर्थीं यांचें गाऱ्हाणें रास्त असलें पाहिजे अशी दिल्लीमधील सामान्य माणसाची भावना झाली.

२६ जुलैनंतर ता. १ ऑगस्ट रोजीं पं. नेहरू लोकमान्य टिळकांच्या पुण्य तिथीसाठीं पुण्याला आले होते. त्या दिवशीं समितीमार्फत १००० सत्याग्रहींनीं पुणें शहरांत सत्याग्रह करून लोकमान्यांना श्रद्धांजली अर्पण केली. महाराष्ट्रानें केलेल्या या प्रचंड त्यागाचें प्रत्यंतर त्या दिवशीं पं. नेहरूंच्या भाषणांतहि दिसून आलें. मुंबई कोठेंहि गेली तरी आपल्याला त्याचें दुःख नाहीं, आपण त्या प्रकरणीं महाराष्ट्राची वकिली करावयास तयार आहों असे उद्‌गार पं. नेहरूंनीं काढले. परंतु पं. नेहरूंचे हे उद्गार हवेंतच विरले गेले. कारण यानंतर चारच दिवसांनीं ता. ५ ऑगस्ट १९५६ रोजीं महाद्विभाषिकाचा कायदा लोकसभेनें मंजूर केला व ५ कोटी मराठी आणि गुजराथी बांधवांचे लोकशाही हक्क हिरावून घेतले.

या द्विभाषिकाची प्रतिक्रिया महाराष्ट्रापेक्षांहि गुजराथमध्यें जास्त प्रखर झाली. अहमदाबादमध्यें विद्यार्थ्यांनीं व तरुणांनीं स्वयंस्फुर्तीनें हरताळ पाळून द्विभाषिक राज्याचा धिःकार केला. त्यालाहि मोरारजी सरकारनें गोळीबारानें उत्तर दिलें. अहमदाबादमध्यें तरुणांच्या कवट्या फुटल्या; परंतु या हुतात्म्यांच्या रक्तामधून महागुजराथ जनता परिषद निर्माण झाली व गुजराथी जनतेचाहि लोकशाही हक्कासाठीं लढा सुरू झाला. महाराष्ट्रानेंदेखील द्विभाषिकाला सर्वत्र विरोध केला व ता. २९ व ३० सप्टेंबर रोजीं मुंबई येथें एक प्रचंड द्वैभाषिकविरोधी परिषद बोलवून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची पुढची योजना आखण्यांत आली.

## *लढ्याचें दुसरें पर्व : निवडणूका*

द्वैभाषिकाची योजना ही लोकसभेनें मान्य केली आहे व महाराष्ट्रामधून लोकसभेवर निवडून गेलेल्या बहुतेक सर्व सदस्यांनीं या योजनेला पाठिंबा दिल्यामुळें ही योजना लोकशाही मार्गानेंच आली आहे व लोकसभा ही सर्वभौम असल्यामुळें आतां ती सर्वांनीं मान्य करावी असा प्रचार कॉंग्रेसचे लोक करूं लागले. म्हणून या द्वैभाषिकविरोधी परिषदेनें महाराष्ट्राचें लोकमत द्वैभाषिकासंबंधीं व्यक्त करण्यासाठीं सार्वत्रिक निवडणुकांचा उपयोग करण्याचें ठरविलें. महाराष्ट्रांतील लोकमताचा द्वैभाषिकाच्या विरोधी कौल व्यक्त करण्यासाठीं सर्व संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनीं एकजुटीनें निवडणुका लढविण्याचा निर्णय या परिषदेनें घेतला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा एक भाग म्हणूनच या निवडणुका लढवाव्या व संयुक्त महाराष्ट्रवादी मतांमध्यें कोणतीही फूट पडूं द्यावयाची नाहीं असा निर्धार या परिषदेनें व्यक्त केला.

गेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्यें मह[illegible]रांपुढें होता.

ग्रंथालय संग्रहालय, पुणे, स्थळ
अनुक्रम ....२३३३.३.... दि: ........

संयुक्त महाराष्ट्र कीं द्विभाषिक राज्य. द्विभाषिक राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची नियुक्ति झाली होती. त्यामुळें कॉंग्रेसवाल्यांनीं गैरप्रचार सुरू केला. शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला आहे, आपणाला महाराष्ट्रच काय पण वर गुजराथहि मिळाला आहे; परंतु समितीचे पुढारी ब्राह्मण आहेत, त्यांना शेतकऱ्यांचें नवें नेतृत्व पहावत नाहीं असल्या भाकडकथा कॉंग्रेसवाल्यांनीं प्रसृत करण्यास सुरुवात केली. निवडणुकांमध्यें त्यांनीं जातीचा, पैशाचा, अधिकाराचा दुरुपयोग केला. पण मराठी जनतेनें त्यांच्या सर्व कारवाया हाणून पाडल्या. महाराष्ट्रांत पूर्वी कधींहि दिसली नाहीं अशी अपूर्व एकी या निवडणुकीमध्यें दिसून आली. मराठी जनतेनें जातपात विसरून या निवडणुका आपल्या म्हणून लढविल्या. आतांपर्यंत महाराष्ट्रांत उमेद्वाराच्या जातीला बरेंच महत्त्व असे. पण या निवडणुकीमध्यें लोकांनीं हे जातीपातीचे बंध तोडून टाकले. संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फें उभे राहिलेले उमेद्वार सर्व जातींचे होते. पण मतदारांनीं त्यांना आपले समजून निवडून दिले. नौशेर भरुचासारखा मुंबईचा पार्शी वकील, त्याला धड मराठी बोलतांही येत नाहीं. पण खानदेशमधील जनतेनें हरिभाऊ पाटसकरांच्यासारख्या मंत्र्याचा पराभव करून भरुचांना निवडून दिले. उत्तर रत्नागिरीमध्यें जगन्नाथराव भोसल्यासारख्या मंत्र्याला प्रेमजीभाई आसर या एका कच्छी उमेद्वारानें पराभूत केलें. पुण्यामध्यें एस. एम्. जोशी यांचेविरुद्ध बाबूराव सणसांनीं नाना प्रकारचा असत्य व खोडसाळ प्रचार केला. पण मतदारांनीं त्यांचे सर्व डाव उधळून टाकले. नाशिकसारख्या क्षेत्रामध्यें गोविंदराव देशपांड्यांचेविरूद्ध श्री. दादासाहेब गायकवाड यांचेसारख्या दलितवर्गीय पुढाऱ्याला निवडून दिलें. पांढरपेशा स्त्रियांनीं देखील दादासाहेबांचेसाठीं कसोशीनें प्रयत्न केले. आतांपर्यंत सर्वसाधारण जागेवर दलितवर्गीय निवडून आल्याचें उदाहरण नाहीं. पण संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानें सहासात दलित पुढाऱ्यांना सर्वसामान्य जागेवर निवडून दिलें. अशा तऱ्हेनें पश्चिम महाराष्ट्रामध्यें जनतेनें लढाईच्या इर्षेनें या निवडणुका लढविल्या. लोकसभेच्या २३ जागांपैकीं २१ जागीं समितीचे उमेदवार निवडून आले. एक यशवंतराव सोडून सारे महाराष्ट्रीय मंत्री पराभूत झाले. कित्येक कॉंग्रेस उमेदवारांचें डिपॉझिटहि जप्त झालें. कोल्हापूर, रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांत एकहि कॉंग्रेस उमेद्वार निवडून आला नाहीं. पुणें, नगर, नाशिक या जिल्ह्यांत एकेकच कॉंग्रेस उमेद्वार कसाबसा निवडून येऊं शकला. या निवडणुकीनें दोनतीन गोष्टी सिद्ध झाल्या. (१) कॉंग्रेससारख्या जबरदस्त पक्षाचाहि जनता निवडणुकीमध्यें पराभव करूं

शकते ही गोष्ट सिद्ध झाल्यामुळें मराठी जनतेचा आत्मविश्वास व लोकशाहीवरील श्रद्धा वाढीला लागली. (२) या निवडणुकीमध्यें मराठी जनतेनें जातीय प्रचाराला थारा दिला नाहीं, दलित उमेदवारांना सर्वसाधारण जागेवर निवडून दिले व अशा तऱ्हेनें महाराष्ट्रामध्यें सामाजिक एकजिनसीपणाची भावना वाढीला लागली.

## *लोकमताचा कौल*

परंतु पश्चिम महाराष्ट्रामध्यें जरी काँग्रेसचा इतका जबरदस्त पराभव झाला असला तरी विदर्भ व मराठवाड्यांत अनेक कारणांमुळें समितीस चांगलें यश मिळालें नाहीं. विदर्भांत संयुक्त महाराष्ट्रवादी उमेदवारच एकमेकांविरुद्ध उभे राहिले. हें जरी असले तरी या निवडणुकींनीं महाराष्ट्राचें लोकमत द्वैभाषिकाच्या विरुद्ध आहे व मुंबई शहरांतील जनता संयुक्त महाराष्ट्रांत सामील होण्यास राजी आहे या दोन्ही गोष्टी सिद्ध झाल्या हें खालील आंकड्यावरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| मुंबई शहरांत काँग्रेसला मिळालेलीं मतें | : | ५,७४,७३९ |
| मुंबई शहरांत समितीला मिळालेलीं मतें | : | ६,२५,८७२ |
| पश्चिम महाराष्ट्रांत काँग्रेसचीं मतें | : | २२,३८,१४२ |
| ,, समितीचीं मतें | : | ३०,५७,०५५ |
| मराठवाडा— काँग्रेसचीं मतें | : | ६,८२,२०५ |
| ,, समितीचीं मतें | : | ५,१७,००० |
| विदर्भ— काँग्रेसचीं मतें | : | १८,२०,८९३ |
| ,, समितीचीं मतें | : | ११,२४,००० |
| ,, प्र. सो. पार्टीचीं मतें | : | २,१३,००० |
| एकूण मराठी मुलखांत काँग्रेसचीं मतें | : | ५३,१५,९७९ |
| ,, संयुक्त महाराष्ट्राचीं मतें | : | ५५,३६,९२७ |

यावरून मतांचे बाबतींत सर्व मराठी मुलखांत काँग्रेसपेक्षां संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना मतें अधिक मिळालीं आहेत. जागांचा प्रश्न विचारांत घेतला तर मुंबई राज्यांतील मराठी मुलखांत काँग्रेसला १३४ व समितीला १३० जागा मिळाल्या पण म्हैसूर राज्यामध्यें व मध्यप्रदेशामध्यें जो मराठी मुलूख गेला आहे तेथें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर ७ लोक निवडून गेले आहेत; म्हणजे एकूण मराठी मुलखांत काँग्रेसपेक्षांहि संयुक्त महाराष्ट्राला जागाहि जास्त मिळाल्या आहेत.

या सार्वत्रिक निवडणुकानंतर मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुका झाल्या व य

निवडणुकीमध्यें समितीनें १३० पैकीं ७२ जागा पटकावल्या व मुंबईचें लोकमत निर्विवादपणें सिद्ध केलें. सार्वजनिक निवडणुकीमध्यें समितीच्या लोकांनीं जनतेच्या भावनांना चिथावणी देऊन मतें मिळविलीं असें कॉंग्रेसवाले सांगतात. पण गेल्या एका वर्षांत झालेल्या अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व पुणें, कोल्हापूर, सातारा, जळगांव, मिरज, पनवेल, इचलकरंजी वगैरे नगर-पालिकांच्या निवडणुका यांतून महाराष्ट्राचें लोकमत निसंशयपणें व्यक्त झालें आहे. नागपाडा भागांतील पोट-निवडणुकीमध्यें तर कॉंग्रेसची जागा समितीनें जिंकून लोकमताचा वारा कोणीकडे वाहातो आहे हें दाखवून दिलें आहे.

मराठी जनतेनें अशा रीतीनें आपलें मत स्पष्टपणें व्यक्त केलें असतांना व गुजराथमध्यें देखील द्वैभाषिकाच्या विरोधी असें लोकमत बऱ्याच मोठ्या प्रमाणांत असतांना कॉंग्रेसश्रेष्ठी व भारत सरकारनें या लोकमताचा आदर करून संयुक्त महाराष्ट्र व महागुजराथ या दोन्ही मागण्या कबूल करावयास पाहिजे होत्या. पण तसें करण्याऐवजीं अट्टाहासानें व केवळ पोलीसी शक्तीच्या सहाय्यानें हें द्विभाषिक चालविण्याचा राज्यकर्त्यांचा हेका दिसतो.

कॉंग्रेस श्रेष्ठींना कदाचित् असेंहि वाटत असावें कीं समितीमध्यें सामील झालेल्या पक्षोपपक्षांची एकजूट टिकणार नाहीं. आज ना उद्यां त्यांच्यामध्यें फूट पडेल व मग आपला कार्यभाग सिद्ध होईल. समितीच्या नेत्यांनीं हा धोका ओळखून समितीचें ऐक्य दृढ करण्याचा पवित्रा टाकला व त्या दृष्टीनें पहिलें पाऊल म्हणून मुंबई विधानसभेंतील सर्व संयुक्त महाराष्ट्रवादी आमदारांनीं एका गटांत राहिलें पाहिजे व एका शिस्तीनें वागलें पाहिजे असें ठरविण्यांत आलें. या कामीं प्रजा सोशालिस्ट पार्टीच्या अखिल भारतीय कार्यकारिणीचें धोरण कांहीं काळ अडथळा आणणारें होतें. महाराष्ट्राचा प्रश्न त्यांना नीट समजला नाहीं म्हणून म्हणा किंवा अन्य कांहीं कारणास्तव त्यांनीं विधानसभेंतील प्रजा सोशालिस्ट सदस्यांनीं आपला स्वतंत्र गट करावा असा आदेश दिला. पण महाराष्ट्रांतील प्रजा समाजवादी पक्षानें साथी जोशी यांचें नेतृत्वाखालीं खंबीर भूमिका घेतली. पक्ष-शिस्तीपेक्षां लोकनिष्ठा श्रेष्ठ मानून त्यांनीं नम्रपणें अखिल भारतीय कार्यकारिणीचा आदेश पाळण्यास नकार दिला व जरूर तर पक्ष सोडण्याची तयारी दर्शविली. महाराष्ट्रीय साथींच्या या तीव्र भावना पाहून राष्ट्रीय कार्यकारिणीनें महाराष्ट्रामध्यें एक शिष्टमंडळ पाठवलें व त्यांनी येथील परिस्थितीचें अवलोकन करून महाराष्ट्र पक्षाच्या धोरणास अखेर मान्यता दिली.

समितीमधील विविध पक्षोपपक्षांचें खबीर धोरण पाहून कॉंग्रेसनें जातीय

प्रचाराचा आश्रय सुरू केला. समितीचे पुढारी ब्राह्मण आहेत व शेतकऱ्याचा मुलगा मुख्य मंत्री झालेला त्यांना पाहवत नाहीं असा प्रचार खाजगी रीतीनें कॉंग्रेसवाले करूं लागले व उघडपणें समिती म्हणजे कम्युनिस्टांच्या हातचें बाहुलें आहे, त्यामुळें महाराष्ट्रांत कम्युनिस्टांचें वर्चस्व वाढणार असें ते सांगूं लागले. पण या दोन्ही गोष्टी धादांत खोट्या आहेत. समितीमध्यें जोशी व डांगे यांच्या जोडीला नाना पाटील, दत्ता देशमुख, उद्धवराव पाटील, माधवराव बागल, बी. सी. कांबळे, भाऊराव गायकवाड असे सर्व पुढारी आहेत व समितीचें काम सर्वांच्या विचारानें चालतें. कम्युनिस्टांच्या वर्चस्वाचा बागुलबुवा तर साफ खोटा आहे. समितीची सर्व चळवळ आतांपर्यंत सत्याग्रहाच्या व शांततेच्या मार्गानें चालली. मुंबई विधानसभेमध्यें किंवा निरनिराळ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्यें कम्युनिस्टांचें संख्याबळ इतरांपेक्षां जास्त नाहीं. पुणें कॉर्पोरेशन, पुणें जिल्हा लोकल बोर्ड, कुलाबा जि. बोर्ड, मिरज, इचलकरंजी या सारख्या समितीच्या हातीं असलेल्या नगरपालिका यांमध्यें तर एकहि कम्युनिस्ट नाहीं. या सर्व कारणांमुळें कॉंग्रेसवाल्यांचा प्रचार लंगडा पडून समितीचें बळ वाढूं लागलें आहे.

### *महागुजराथ जनता परिषद*

अशा परिस्थितीमध्यें महागुजराथ जनता परिषदेबरोबर वाटाघाटी सुरू करून व त्यामध्यें बरीच प्रगति साधून सं. म. समितीनें यशाची आणखी एक पायरी गांठली आहे. महाराष्ट्राची चळवळ ही संकुचितपणाची आहे, गुजराथी लोकांच्या विरुद्ध आहे असें म्हणणाऱ्यांना या वाटाघाटींनीं चांगलेंच उत्तर दिलें आहे. गुजराथी व मराठी लोकांनीं आपला प्रश्न एकमतानें सोडवावा असें पं. पंत लोकसभेंत म्हणाले होते. त्यांनाहि या वाटाघाटीमुळें आव्हान मिळालें आहे. आतांपर्यंत गुजराथमधले कोणीच मुंबईवरील महाराष्ट्राचा हक्क मान्य करीत नव्हते. पण महागुजराथ परिषदेनें समितीबरोबर झालेल्या वाटाघाटीमध्यें हा हक्क मान्य केला आहे. पूर्वी गुजराथ कॉंग्रेस व महाराष्ट्र कॉंग्रेस यांचे पुढारी एकत्र बसूं देखील शकले नाहींत. पण महागुजराथ परिषद व संयुक्त महाराष्ट्र समिति यांचे नेते एकत्र बसतात. मुंबईचें हें द्विभाषिक मोडून त्याचीं दोन एकभाषिक राज्यें करावीं व बाकीचे मतभेदाचे मुद्दे विचारविनिमयानें सोडवावे याबद्दल त्यांचें एकमत झालें आणि भारतसरकारनें जर आपली मागणी मान्य केली नाहीं तर दोन्ही संस्थांनीं आपल्या वज्रमुष्टी बनवून हें द्वैभाषिक मोडून काढावें अशी घोषणा महागुजराथ परिषदेच्या पुढाऱ्यांनीं केली व अशा तऱ्हेनें सं. म. समितीनें

गुजराथमध्यें महाराष्ट्राला खरे मित्र मिळविले. मराठी व गुजराथी खऱ्या अर्थानें 'भाई भाई' बनले व राष्ट्रीय ऐक्य अधिक समर्थ झालें. वस्तुतः संयुक्त महाराष्ट्र समितीनें महागुजराथ परिषदेच्या साहाय्यानें केलेल्या या प्रगतीचें प. नेहरू प्रभृतींनीं स्वागत करावयास पाहिजे होतें. परंतु पं. नेहरू तर त्याबाबत कांहींच बोलत नाहींत. आणि गुजराथ काँग्रेसवाले मात्र महागुजराथ परिषदेनें मुंबई महाराष्ट्राला विकली, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला तर गुजराथमध्यें खर्च करण्यास पैसा मिळणार नाहीं असा खोडसाळ प्रचार करीत आहेत.

विधानसभेमध्येंदेखील संयुक्त महाराष्ट्र समितीनें उत्कृष्ट काम करून द्वैभाषिक राज्यामध्यें महाराष्ट्राचें कसें नुकसान होत आहे तें सिद्ध केलें. गुजरातमध्यें दरडोई ३ रु. विकासखर्च होतो, तर महाराष्ट्रामध्यें तो केवळ १ रुपयाच्या आसपास होतो. एकूण मुंबई राज्यामध्यें मोठमोठ्या धरणयोजना १९ घेतल्या आहेत. त्यांपैकीं मराठी मुलखांत फक्त ७ तर गुजराथी मुलखांत १२. अन्य विकास क्षेत्रांतहि महाराष्ट्राला लोकसंख्येच्या मानानें वांटा मिळत नाहीं. सर्व आर्थिक सूत्रें गुजराथी मंत्र्यांचे हातीं आहेत व त्यामुळें यशवंतराव हे मुख्यमंत्री होऊनहि महाराष्ट्राचें कल्याण करूं शकत नाहींत या गोष्टीवर समिति .आमदारांनीं विधान-सभेमध्यें चांगलाच प्रकाश टाकला.

### *प्रतापगडचा मोर्चा*

सर्वच बाबतींत आपली बाजू घसरती आहे असें पाहिल्यावर काँग्रेसवाल्यांनीं आपलें आसन स्थिर करण्यासाठीं एक नवाच बूट काढला. प्रतापगडावर श्री शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचें अनावरण करण्यासाठीं पं. नेहरूंना बोलवून द्वैभाषिक जनतेच्या गळीं उतरविण्याचा डाव त्यांनीं रचला. तेव्हां समितीनें प्रतापगडावर नेहरू येतील तेव्हां शांतपणें निदर्शनें करून महाराष्ट्रांतील जनतेला द्वैभाषिक मान्य नाहीं असें दाखविण्याचे ठरविलें. समितीच्या या निर्णयाविरूद्ध काँग्रेसवाल्यानीं जहरी प्रचार केला. समितीला श्री शिवाजी महाराजांची अप्रतिष्ठा करावयाची आहे. प्रतापगडावर नेहरूंचा खून करण्यासाठीं नवा गोडसे अवतणार आहे. समितीला पुन्हा पेशवाई निर्माण करावयाची आहे असा धादांत खोटा प्रचार सुरूं झाला. सातारा जिल्ह्यांत अशा अर्थाचीं पत्रकें वांटण्यांत आलीं. समितीमधील जनसंघानें देखील प्रतापगडावर होणाऱ्या निदर्शकांना उघड विरोध केला. त्याचप्रमाणें श्री. खाडीलकर व डांगे. यांनींदेखील अखेरच्या घटकेपयत पं. नेहरूंशीं पत्रव्यवहार करून निदर्शनें होणार किंवा नाहीं याबद्दल द्विधा परि-

स्थिति निर्माण केली. परंतु मराठी जनतेनें काँग्रेसचा डाव ओळखला होता. प्रतागडावर पं. नेहरूंच्या सभेला लोक जमविण्यासाठीं काँग्रेसला खेडोपाडीं ट्रक्स पाठवून भाड्यानें लोक जमवावे लागले तर समितीच्या हांकेला ओ देऊन २५००० लोक स्वखर्चानें व कित्येक सायकलीवरून आणि पायानें प्रतापगडापाशीं आले होते. काँग्रेसनें निर्माण केलेल्या ब्राह्मणब्राह्मणेतर वादाला अशा तऱ्हेनें मराठी जनतेनें चोख उत्तर दिलें व हजारो लोकांनीं अत्यंत शिस्तीनें आणि शांततेनें निदर्शनें करून पं. नेहरूंना महाराष्ट्राची भावना व्यक्त करून दाखविली.

संयुक्त महाराष्ट्राचें लोण आतां हळूहळू पण निश्चितपणें मराठवाड्यांत आणि विदर्भांतहि पसरूं लागलें आहे. द्विभाषिक राज्यामागचा भांडवलशाहीचा डाव तेथील जनतेला हळूहळू उमगूं लागला आहे. परंतु त्याचबरोबर जनसंघानें समितीचे सदस्य होण्याचें नाकारून समितीच्या ऐक्यास तडे पाडण्यास सुरुवात केली आहे. असल्या फुटीर प्रवृत्तीपासून महाराष्ट्रीय जनतेला सावध केलें पाहिजे व समितीची संघटना अधिक मजबूत बनवली पाहिजे.

प्रतापगडाच्या निदर्शनाच्या वेळीं पं. नेहरूंनीं तर स्पष्ट सांगून टाकलें कीं द्वैभाषिकाचा निर्णय हा लोकसभेचा निर्णय आहे व तो बदलण्याची त्यांची तयारी नाहीं. यशवंतराव चव्हाणहि असेंच सांगतात कीं द्वैभाषिकाचा निर्णय बदलण्या-सारखी कोणतीहि घटना घडलेला नाहीं. अशा परिस्थितींत मराठी जनतेला दीर्घकालपर्यंत व प्रखर असा लढा देण्याची तयारी केली पाहिजे. हा लढा यशस्वी होण्यासाठीं प्रथम महाराष्ट्रानें विधायक शक्ति संपादन केली पाहिजे. ह्यासाठीं ज्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्यें समितीचें बहुमत झालें आहे तेथें आपण भरीव काम करून दाखवलें पाहिजे. खेडोपाडींच्या गोरगरिबांच्या अडचणी व अन्याय दूर करण्याच्या कामीं समितीनें पुढाकार घेतला पाहिजे. महागुजराथ परिषद व समिति यांना आतां संयुक्तपणें लढा करावा लागेल. या दोन संघटनांनीं सरकारला नोटीस देऊन लढ्याची तयारी केली पाहिजे व तेवढ्यानें भागलें नाहीं तर आगामी सार्वत्रिक निवडणुकांमध्यें सर्व मराठी मुलखामध्यें काँग्रेसचा पराभव करून द्वैभाषिक राज्य चालवणें अशक्य करून टाकण्याची तयारी आतां महाराष्ट्रानें केली पाहिजे.

# परिशिष्ट—१

## *द्विभाषक राज्यांत विकासखर्चाबाबत महाराष्ट्रावर होणारा अन्याय*

द्विभाषिक राज्याला महाराष्ट्रांतील जनतेचा विरोध आहे त्याच्या अनेक कारणांपैकीं एक महत्त्वाचें कारण असें आहे कीं या द्विभाषिक राज्यामध्यें होणारा विकासखर्च लोकसंख्येच्या प्रमाणांत न होतां गुजराथमध्यें वाजवीपेक्षां जास्त होतो व मराठी मुलखांत जरूरीपेक्षां कमी होतो.

आपला देश हा शेतीप्रधान आहे व शेती उत्पादनांत भरपूर वाढ हाच औद्योगिक विकासाचा पाया आहे. शेती उत्पादनांत वाढ होण्यासाठीं शेतीला हुकमी व कायम स्वरूपाचें पाणी मिळण्याची योजना झाली पाहिजे. मुंबई राज्यामध्यें फार मोठा भाग अनियमित पावसाचा व दुष्काळाचा आहे. या राज्याच्या गुजराथ भागांत दर दहा वर्षांमधून ४ वेळां व महाराष्ट्र भागांत दर दहा वर्षांतून ७ वेळां दुष्काळ पडत आला आहे. त्या दृष्टीनें या राज्यांत पाणी-पुरवठ्याच्या भरपूर योजना हातीं घेणें व त्यांचें प्रमाण सर्वत्र सारखें (लोक-संख्येच्या मानानें) ठेवणें जरूर आहे. परंतु जुन्या मुंबई राज्यामध्यें याबाबत महाराष्ट्रावर नेहमीं अन्याय होत आला आहे. पाणीपुरवठ्याप्रमाणें वहातुकीचे रस्ते वाढवणें हेंहि विकासाच्या दृष्टीनें फार महत्वाचें काम आहे. या दोन्ही कामावर पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें विभागवार कसा खर्च झाला, तें खालील आंकड्यावरून दिसून येईल.

| प्रदेश | लोकसंख्येचें प्रमाण | पाटबंधाऱ्यावरील खर्च | | | | रस्त्यावरील खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९५० ते ५५ | | १९५५–५६ | | १९४६ ते ५५ | | १९५५–५६ | |
| | | एकूण | टक्के | एकूण | टक्के | एकूण | टक्के | एकूण | टक्के |
| मुंबईराज्य | १०० | १८४२ | १०० | १०८० | १०० | १४५१ | १०० | ५८५ | १०० |
| कर्नाटक | १४ | ४३५ | २३ | १११ | १० | १६५ | ११·४ | ५८ | १० |
| गुजराथ | ३१ | ७९९ | ४२·४ | ७५० | ७० | ७९० | ५४·४ | ३३३ | ५७ |
| महाराष्ट्र | ५४ | ६५८ | ३४·६ | २१९ | २० | ४९५ | ३४·२ | १९५ | ३३ |

वरील आकड्यांवरून द्विभाषिक राज्याच्या कारभारांत महाराष्ट्राच्या विकासाकडे कसें दुर्लक्ष झालें व विकास खर्चाच्या बाबतींत महाराष्ट्रावर किती अन्याय झाला तें दिसून येतें. जुन्या मुंबईराज्यामध्यें श्री. मोरारजीभाई देसाई मुख्य मंत्री होते व आतां श्री. यशवंतराव चव्हाण मुख्य मंत्री झाले आहेत म्हणून महाराष्ट्रावरचा अन्याय दूर होईल अशी कोणाची कल्पना असेल तर ती कशी चूक आहे हें दुसऱ्या पंचवर्षीय योजनेमध्यें पाटबंधाऱ्यासाठीं नियोजित केलेल्या रकमांवरून दिसून येईल.

द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें नव्या मुंबई राज्यांत एकूण मोठ्या व मध्यम आकाराच्या अशा १९ योजना हातीं घेण्यांत येणार आहेत. यांपैकीं गुजराथी विभागांत १२ व मराठी विभागांत फक्त ७ आहेत. मराठी विभागाची लोकसंख्या गुजराथच्या दुप्पट असूनहि महाराष्ट्राच्या वांट्याला गुजराथपेक्षां ५ योजना कमी आहेत; त्याप्रमाणें या सर्व योजनांवर एकूण ७१ कोटी १४ लक्ष रुपये खर्च होणार आहे. लोकसंख्येच्या प्रमाणांत या खर्चाची वांटणी केली असती तर महाराष्ट्राच्या वांट्याला ४८ कोटी व गुजराथच्या वांट्याला २४ कोटी अशी वांटणी झाली असती. पण प्रत्यक्षांत महाराष्ट्राच्या वांट्याला ३० कोटी ७ लक्ष व बाकीचे ४१ कोटी ७ लक्ष गुजराथच्या वांट्याला अशी अन्याय्य वांटणी झाली आहे.

या वांटणीमध्यें अगोदरच असलेली विषमता पुढें कामें पुरीं झाल्यावर आणखी वाढण्याचा संभव आहे. कारण उकाई योजना मंजूर करून घेतांना तिचा संभाव्य खर्च फक्त ७॥ कोटी रु. झाला होता. प्रत्यक्षांत तो १७ कोटीवर जाणार आहे. त्यामुळें गुजराथमध्यें होणाऱ्या खर्चाचें प्रमाण वाढून महाराष्ट्राच्या विकासाकडे दुर्लक्षच होण्याचा संभव आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रमांक 23333 वि: [illegible]
क्रमांक 99.32 नों: दि: [illegible]

# परिशिष्ट—२

## *भाषिक राज्यांच्या प्रश्नावर श्री. जयप्रकाश यांचा अभिप्राय*

"...ज्या आधारावर प्रांत बनवावयाचे त्यापैकीं भाषा हा एक महत्त्वाचा आधार असला पाहिजे. भारताची नैसर्गिक रीत्याच भाषिक गटांत विभागणी झाली होती...मुख्य भाषांचे विभाग कांहीं फार नव्हते. एकच भाषा बोलणारे व एका सलग भागांत राहाणारे लोक हे देशाशीं एकनिष्ठ असूनहि त्यांच्या स्वतःच्या कांहीं आवडीनिवडी आहेत व आपलें जीवन आपल्या इच्छेप्रमाणें व्यतीत करण्याची त्यांची इच्छा आहे. अशा परिस्थितींत भाषा हा एक महत्त्वाचा आधार मानून प्रांतांची पुनर्रचना करणें यापेक्षां अधिक नैसर्गिक गोष्ट कोणती आहे?"

"आजपर्यंत अनेक वर्षें भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्यांत येईल असें स्पष्टपणें मानण्यांत आलें आहे. आणि याच समजुतीवर भाषिक गटांच्या आकांक्षा वाढविण्यांत आल्या, आतां या आशाआकांक्षा निष्फळ करणें धोक्याचें ठरणार आहे. **शिवाय भाषिक राज्यांच्या मागणींत राष्ट्रविरोधी किंवा राष्ट्राच्या ऐक्याला धोका आणणारी अशी कोणतीच गोष्ट नाहीं.**"

"लोकांच्या या नैसर्गिक भावनांबद्दल आपण संकुचितपणाचा आक्षेप घेणें किंवा तो एक राष्ट्रविरोधी गुन्हा मानणें बरोबर होणार नाहीं. भाषेचा प्रश्न दडपून टाकणें धोक्याचें ठरेल असा इशारा मला द्यावासा वाटतो. उलट त्या मार्गानें जाण्यांतच राष्ट्रीय ऐक्याला धोका आहे."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 23332 दि: [illegible]
क्रमांक 9932 नों: दि: [illegible]

REFBK-0009753